# अनुक्रमणिका


**4**
अध्यक्षीय- जयंत पाटील
राज्यघटनेची मूल्ये
तुडवताहेत पायदळी

**5**
प्रबंध संपादकीय- दिलीप वळसे पाटील
हेचि फळ मम काय आले तपाला!

**6**
संपादकीय- डॉ. सुधीर भोंगळे
अमृतकाळाचे 'हलाहल'

**10**
शरद पवार यांची पत्रकार परिषद,नागपूर
केंद्र सरकार सर्वसामान्यांना
महागाईच्या संकटात लोटतेय

**18**
शरद पवार यांची पत्रकार परिषद,नाशिक
आम्ही बांधलेली राजकीय बांधणी अजिबात
विस्कळीत होणार नाही- शरद पवार

**20**
अजित पवार यांची पत्रकार परिषद,मुंबई
राज्यात ओला दुष्काळ जाहीर करा

**28**
संसदेचे महत्त्व नष्ट करण्याचा डाव?
- अगस्त्य दास

**32**
जीएसटी खरंच झाला गब्बरसिंग टॅक्स?
अनंत बागाईतकर

**40**
भाजपकडून प्रादेशिक पक्षांचा शिडीसारखा वापर
- व्यंकटेश केसरी

**46**
असंसदीय शब्द व अभिव्यक्ती स्वातंत्र्य
फिरस्ता

**52**
आधुनिक भारत आणि
नवभारत : ग्रँड सिद्धांत
- प्रकाश पवार

**44**
डॉ. सुधीर भोंगळे सत्कार समारंभ,नागपूर
१) वैज्ञानिक आणि शेतकऱ्यांमुळे
शेतीच्या क्षेत्रात मोठे परिवर्तन- शरद पवार
२) नदीजोड, अन्नदाता ते ऊर्जादाता
कार्यक्रम भोंगळेंनी हाती घ्यावा- नितीन गडकरी
३) पीक पद्धती बदलली तरच
शेती सुजलाम् सुफलाम्- डॉ. सुधीर भोंगळे

**90**
गुलामगिरीच्या खुणा पुसणार किती?
- हेमन्त टकले

**96**
कानोकानी-
घंटाकर्ण-(राजकीय किस्से)

**102**
शेवटचे पान-
पराभव आणि निष्ठा- -हेमन्त टकले



**संचालक**
हेमन्त टकले
**प्रबंध संपादक**
दिलीप वळसे पाटील
**संपादक**
**डॉ. सुधीर भोंगळे**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट,
मुंबई-४०० ०३८
०२२-३५३४७४००/०१
**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर
**मांडणी**
दिलीप रोडे


**वर्गणीचे दर-**
**वार्षिक रु. ५००/-**
**वर्गणीचा धनादेश**
**'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
या नावाने काढावा.
**www.ncp.org.in**
यावर मासिक उपलब्ध
**फोटो**
प्रशांत चव्हाण

**मुद्रक, प्रकाशक**
**हेमन्त प्रभाकर टकले** यांनी
**'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
च्या वतीने ओम साई मिलन एंटरप्रायझेस रूम नं. १०९, हाऊस नं. ३२३, सिद्धीविनायक महिमा सेक्टर १९/बी, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७०९
येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई-४०००२०
येथून अंक प्रकाशित केले.


राष्ट्रवादी





# राज्यघटनेची मूल्ये तुडवताहेत पायदळी



प्रबंध संपादकीय



# हेचि फळ मम काय आले तपाला!



## संपादकीय



# हल’

समाजातील वंचित वर्गांच्या मदत व साह्यासाठी कल्याणकारी राज्यव्यवस्थेत सरकारी अनुदानांची किंवा अर्थसाह्याची संकल्पना विकसित करण्यात आली. याला इंग्रजीत सब्सिडी असे म्हटले जाते. अन्नधान्य, आरोग्य, प्राथमिक शिक्षण, पाणी पुरवठा, वीज अशा मूलभूत क्षेत्रात प्रामुख्याने सब्सिडी म्हणजेच अनुदाने किंवा अर्थसाह्याची संकल्पना राबवण्यात येते. परंतु लोकशाहीत कधीकधी या बाबी अमर्यादपणे अमलात येऊ लागतात. याला लोकप्रियतावाद(पॉप्युलिझम) म्हटले जाते. याची अनेक उदाहरणे देता येतील. उदाहरणार्थ शेतीसाठी फुकट वीजपुरवठा हा एक प्रकार अलीकडच्या काळात रूढ झाला. दक्षिणेतील राज्यांनी एक वेगळा प्रकार सुरु केला होता. एनटी रामाराव हे महालोकप्रिय अभिनेते होते व नंतर राजकारणात प्रवेश करुन नेते झाले. त्यांनी गरीब जनतेसाठी एक रुपया किलोमध्ये तांदूळ उपलब्ध करुन देण्याची घोषणा त्यांच्या निवडणूक जाहीरनाम्यात केली आणि त्याआधारे त्यांना अफाट बहुमत मिळाले. सुरुवातीला योजना अमलात आली पण सरकारी तिजोरीवर भार पडू लागला. मग तांदळाची किंमत दोन रुपये करण्यात आली. वगैरे वगैरे. पंजाबमध्ये प्रथम अकाली दलाने आणि नंतर त्यांचेच अनुकरण करीत काँग्रेसने शेतकऱ्यांना फुकट वीजपुरवठा करण्याचे धोरण अवलंबिले. परिणामी पंजाबची अर्थव्यवस्था भिकारी झाली आणि अजुनही ती पूर्णपणे सावरलेली नाही. तमीळनाडू हे राज्यही असेच लोकप्रिय घोषणांसाठी प्रसिध्द आहे. एमजीआर(एमजी रामचंद्रन) यांनीही त्यांची लोकप्रियता टिकविण्यासाठी अतिस्वस्त दरात तांदूळ पुरविणे, प्राथमिक शाळेतील मुलांना मोफत माध्यान्ह भोजन(त्यांनी मुलांबरोबर भोजन करतानाचे फोटो काढून भरपूर प्रसिध्दी मिळवली होती) या योजना राबविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या वारसदार जयललिता यांनी टेलिव्हिजन सेट देण्याची घोषणा केली होती. नीतीशकुमार यांनी शाळेत जाणाऱ्या मुलींना सायकली देण्याची तर उत्तर प्रदेशात अखिलेश यादव यांनी विद्यार्थ्यांना लॅपटॉप देण्याची घोषणा केलेली होती. या नेत्यांनी काही काळ या योजना चालवल्या परंतु आतापर्यंतच्या अनुभवानुसार त्या कालांतराने बंद पडत गेल्या. दिल्लीत अरविंद केजरीवाल यांनी पाणी व वीज या दोन नागरी गरजांसाठी विशिष्ट मर्यादेपर्यंत मोफत देण्याची घोषणा करुन त्या यशस्वीपणे अमलात आणून दाखवल्या आहेत. अर्थात दिल्ली राज्याचे क्षेत्र एका महानगरापुरते मर्यादित असल्याने ते शक्य झाले ही बाब येथे नमूद करणे आवश्यक आहे. अशाच काही घोषणा २०१४च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी करण्यात आल्या होत्या. त्यातील सर्वात लोकप्रिय घोषणा होती ती सर्व नागरिकांच्या खात्यांमध्ये १५ लाख रुपये जमा करण्याची !

परदेशातील काळा पैसा परत आणल्यानंतर तो इतका असेल की प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख रुपये जमा करण्यात येतील असे विश्वप्रिय ब्रह्मांडनायकांनी जाहीर केले होते. त्यानंतर त्यांचे क्रमांक दोन यांनी ही घोषणा म्हणजे केवळ ‘निवडणुकीतली चलाखी’ (चुनावी जुमला) असल्याचे स्पष्टीकरण देऊन सुटका करुन घेतली होती. अर्थात निवडणुका, निवडणुकांचे राजकारण जोपर्यंत अस्तित्वात आहे तोपर्यंत हा ‘स्पर्धात्मक लोकप्रियतवाद’(काँपिटिटिव्ह पॉप्युलिझम) व त्याच्याशी निगडित सवंग राजकारणही चालू राहणार आहे.

या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडेच केलेल्या विधानावरुन मोठा गदारोळ झाला. ‘देशातली रेवडी संस्कृति’ बंद झाली पाहिजे आणि मतदारांपुढे सवलती किंवा फुकटातील सुविधांची आश्वासने देऊन मते मागण्याचा प्रकार बंद झाला पाहिजे अशी टिप्पणी त्यांनी केली. उत्तर प्रदेशातील जलौन येथे जलदगति महामार्गाच्या एका भागाचे उद्घाटन करताना त्यांनी या ‘रेवडी संस्कृती’वर जोरदार टीका केली. असे विधान करुन पंतप्रधानांना कोणते संकेत द्यायचे आहेत अशी चर्चा सुरु होणे स्वाभाविक होते. काहीतरी सनसनाटी विधाने व घोषणा करण्याची सवय राज्यकर्त्यांना असतेच परंतु त्यातून ते काही संकेतही देत असतात. पंतप्रधानांनी सवलतींच्या फुकटेगिरीवर टीका करताना लोकांना सवलतींचा सुकाळ संपल्याचेच जवळपास सुचविले असल्याचे मानले जाते आणि लोकांनी कोणतीही वस्तु किंवा सेवा यासाठी रोकडा मोजला पाहिजे हाच संदेश पंतप्रधानांनी दिला असावा असे मानले जाते. परंतु टाळीबजाव भाषणबाजीने मनोरंजन होते. वास्तव हे वेगळेच असते. एखाद्या सिनेमात टाळीबजाव डायलॉग मारुन एखादा नायक बाजी मारुन जातो. पण पुढे काय ? हा प्रश्नच महत्वाचा आहे. पंतप्रधानांनी रेवडीसंस्कृतीच्या टिप्पणीच्या निमित्ताने त्यांच्या सरकारचा रोखठोक धंदेवाईक दृष्टिकोन स्पष्ट केला आहे.

रेवडी संस्कृतीची संकल्पनेचे प्रथम सुयोग्य आकलन आवश्यक आहे. निवडणुका जिंकण्यासाठी ज्या सवंग व फुकटेगिरीच्या घोषणा केल्या जातात त्याला जर रेवडी संस्कृती म्हणायचे असेल तर तो फार मर्यादित दृष्टिकोन झाला. कारण

राज्यांच्या पातळीवर लोकांना आकर्षित करण्यासाठी मर्यादित सोयी-सुविधांच्या घोषणा केल्या जात असतात. परंतु त्या पलीकडे जाऊन राजसत्तेकडून म्हणजेच लोकनियुक्त सरकारकडून लोकांना विविध सवलती दिल्या जातात त्याचा समावेश कशात करायचा हा प्रश्न अनुत्तरित राहतो. सरकारतर्फे जी आर्थिक व वित्तीय पावले उचलली जात असतात त्यावरुन त्या सरकारचा अनुदाने, सवलती, अर्थसाह्य किंवा सब्सिडींच्या बद्दलचा दृष्टिकोन किंवा भूमिका स्पष्ट होत असते. सवलती या मूलतः समाजातील कमकुवत-दुर्बल व वंचित वर्गांना देण्याची प्रथा राहिलेली आहे. समाजातील ज्येष्ठ नागरिकांसाठीही काही सवलती सरकारतर्फे दिल्या जात असतात जेणेकरुन या वर्गांचे जीवन, राहणीमान व उपजीविका सुसह्य व्हावी. हा हेतु उदात्त आहे हे निःसंशय ! प्रत्यक्षात काय होते याची असंख्य उदाहरणे देता येतील. अगदी एक ताजी माहिती आहे. रेल्वेचे तिकिट काढल्यानंतर अपरिहार्य कारणास्तव प्रवास रद्द करावा लागला तर संबंधित तिकिट रद्द करुन त्यातील काही रक्कम कापून उर्वरित रक्कम परत केली जात असे. आता या नव्या घोषणेनुसार रेल्वे तिकिट काही कारणाने रद्द करावे लागले तर जीएसटीची रक्कम परत करण्यात येणार नसल्याचे जाहीर करण्यात आले आहे. ही बाबही मान्य ! करोना काळात रेल्वेसेवा मोठ्या प्रमाणात विस्कळित झाली होती. ती आता बहुतांशी पूर्ववत सुरळीत झाली आहे. परंतु त्या काळात रेल्वेतर्फे दिल्या जाणाऱ्या सर्व सवलती रद्द करण्यात आल्या होत्या त्या पूर्ववत करण्यात आलेल्या नाहीत. त्याचे सर्वात मोठे उदाहरण ज्येष्ठ नागरिकांना रेल्वे प्रवासात दिली जाणारी सवलत होय. ज्येष्ठ नागरिकांना रेल्वे तिकिटात ४० तर महिलांना ५० टक्के सवलत देण्यात येत असे. करोनाचे कारण पुढे करुन रेल्वेने सर्वच सवलती रद्द केल्या. त्या पुन्हा सुरु करण्यात आलेल्या नाहीत. ज्येष्ठ नागरिक तसेही प्रवास कमीच करतात पण त्यांना प्रवास करावाच लागला तर त्यासाठी सवलत देणे काहीच गैर नाही आणि त्याचा असा कोणताही प्रचंड आर्थिक बोजा सरकारी तिजोरीवर पडणारा नाही. परंतु सरकारने ती सवलत पुन्हा चालू केलेली नाही. आता याला रेवडी म्हणायचे की आणखी काय ? ते ही भाषा वापरणारेच सांगू शकतील. परंतु कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेत समाजातील कमजोर घटकांना आर्थिक न्याय देणे अपेक्षित असते आणि एक जबाबदारी म्हणून या वर्गाकडे पाहणे आवश्यक असते. एकीकडे मोठ्यामोठ्या बाता मारायच्या, गमज्या करायच्या पण प्रत्यक्षात वेगळेच वागायचे अशी काहींची तऱ्हा असते. सध्या भारतात तेच पाहणे नशिबी आले आहे.

सामाजिक सुरक्षा व समाजकल्याणाबाबत पाश्चात्य देश व विशेषतः स्कँडेनेव्हियन देश (नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क) यांचे उदाहरण दिले जाते. या देशांमध्ये कल्याणकारी व्यवस्था अस्तित्वात आहेत. लहानसे देश आहेत आणि लोकसंख्याही मर्यादित असल्याने तेथे सामाजिक सुरक्षेच्या चांगल्या योजना शेवटच्या माणसापर्यंत पोहोचविणे शक्य आहे. भारतासारख्या महाकाय लोकसंख्या व आकाराच्या देशात ते कितपत शक्य आहे याचा ज्यानेत्याने विचार केला पाहिजे. विकेंद्रीत प्रशासनाच्या माध्यमातून ते होऊ शकते परंतु सध्या केंद्रीकरणावर असा काही भर आहे की प्रत्येक योजना व कार्यक्रमाचा धागा पंतप्रधानांपर्यंतच पोहोचला पाहिजे. त्यामुळेच आंध्र प्रदेशाच्या दौऱ्यावर असलेल्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी पंतप्रधान स्वस्त धान्य योजनेच्या पाकिटांवर पंतप्रधानांचा फोटो का नाही याची विचारणा संबधित अधिकाऱ्यांकडे करुन त्यांना धारेवर धरल्याचे प्रसिध्द झाले आहे. थोडक्यात योजना वगैरे गेली खड्ड्यात पंतप्रधानांचा फोटो का नाही आणि योजनेचे श्रेय पंतप्रधानांना देण्याचे बंधन न पाळल्याबद्दल मंत्रीमहोदया खवळल्या होत्या. याला सवंगपणा म्हणायचे की रेवडी संस्कृति म्हणायचे ? रेवडी संस्कृतीचा अर्थ म्हणजे एका हाताने रेवडी घ्या आणि दुसऱ्या हाताने 'मला मत द्या !' त्यामुळे या रेवडी संस्कृतीला नावे ठेवताना पंतप्रधानांची जीभ पुढे रेटली कशी गेली असा प्रश्न पडतो. पण कोडगेपणाने गोष्टी रेटण्याचे कसब व कौशल्य प्राप्त केलेल्या व्यक्तींना त्याच्याशी देणेघेणे नसते.

भारत हा कृषिप्रधान देश मानला जातो. आता स्वरुप बदलत चाललेले असले तरी कृषि हा अर्थव्यवस्थेचा अजुनही कणा मानला जातो. भारतातील बहुतांश शेती ही निसर्गाच्या लहरीवर म्हणजेच पावसावर अवलंबुन आहे. पाऊस वेळेवर व पुरेसा झाला तर पीकपाणी चांगले येते. पण पावसाचे मान कमीजास्त होताच त्याचा शेतीवर प्रतिकूल परिणाम होतो. शेतीवरच सर्वस्वी अवलंबुन असलेल्या शेतकऱ्याचे आयुष्य कठीण व दुरापास्त होऊन जाते. शेतकऱ्याचे हे दैन्य टाळण्यासाठी त्यांना सवलती देण्याची मालिका स्वायंत्र्यापासूनच सुरु आहे. त्यात बदल झालेला नाही. प्राप्तीकरापासून सवलत देण्यापासून त्याला आवश्यक अशा खत, पाणी, वीज, कीटकनाशके यांच्यावर सब्सिडी दिली जाते. यामुळे त्याला अन्नधान्य उत्पादनासाठी प्रोत्साहन मिळण्याबरोबरच तो पिकवीत असलेल्या अन्नधान्याचे उत्पादनमूल्य आटोक्यात राहते. या सवलती त्याला न दिल्यास आणि बाजारभावाने त्याला वरील गोषंची खरेदी करावी लागल्यास तो पिकवीत असलेल्या धान्याचे उत्पादनमूल्य किती होईल याची कल्पनाच केलेली बरी. त्या अवस्थेत ग्राहकाला ते कोणत्या किमतीला खरेदी करावे लागेल याचा अंदाजच लावता येणार नाही. त्यामुळे ही एक शृंखला आहे आणि ती व्यवस्थित चालण्यासाठी या सवलती दिल्या जातात. यामध्ये सर्वांचे समाधान सामावलेले आहे. पाश्चात्य देशात, अमेरिकेत शेतीवरील सब्सिडी मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळेच 'डब्ल्यूटीओ' - 'जागतिक व्यापार संघटने'च्या मंचावर आशियाई - विकसनशील देश व विकसित पाश्चात्य देश यांच्यात यावरुन मतभेद व संघर्ष कायम राहिला. पाश्चात्य देश त्यांच्या शेतीमालास जी सब्सिडी देतात त्या प्रमाणात विकसनशील देश देऊ शकत नाहीत व त्यामुळे त्यांचा शेतीमाल आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धेत टिकाव धरु शकत नाही. यामध्ये समानता आणण्यासाठी विकसित देशांनी शेतीची सब्सिडी कमी करण्याची मागणी भारतासह अनेक देशांनी लावून धरलेली होती. सांगण्याचा मुद्दा एवढाच की अर्थव्यवस्थेच्या

दृष्टीनेही सब्सिडी ही संकल्पना मान्य झालेली असताना त्याला नावे ठेवण्याची बाब रुचणारी नाही.

सब्सिडी, अनुदाने, आर्थिक सवलती व साह्याच्या संकल्पना नेहमीच वादग्रस्त राहिल्या आहेत. ज्यांना खरोखरच अशा साह्याची आवश्यकता आहे त्यांनाच ते मिळाले पाहिजे अशी सर्वसाधारण भावना सर्वत्र व्यक्त होत असते. परंतु हे ठरविणार कसे ? त्यामुळेच या देशात जेव्हा आर्थिक सुधारणा, उदारीकरण, मुक्त व स्पर्धेवर आधारित खुल्या बाजारपेठेचे युग सुरु झाल्यानंतर सब्सिडी संकल्पना पुन्हा चर्चेत आली. त्यामुळेच नरसिंह राव पंतप्रधान व मनमोहनसिंग अर्थमंत्री असताना 'टार्गेटेड सब्सिडीज' किंवा 'लक्ष्यवेधी अर्थसाह्य व अनुदाने' अशी संकल्पना प्रचलित करण्यात आली. त्यासाठी असे वर्ग आणि घटक शोधून व निश्चित करुन केवळ त्यांच्यापुरतीच सब्सिडी मर्यादित ठेवणे यावर भर देण्यात आला. अगदी रेशनकार्डावर मिळणाऱ्या सवलतीच्या धान्यासाठी देखील हे निकष लागू करण्यात आले होते.

पेट्रोल-डिझेल, स्वयंपाकाचा गॅस यावरील सब्सिडी टप्प्याटप्प्याने कमी करण्याचे वेळापत्रक आखण्यात आले. त्यानुसार पेट्रोल-डिझेलवरील सब्सिडी संपविण्यात येऊन त्यांचे भाव तेलाच्या आंतरराष्ट्रीय किमतींशी जोडण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. असे असले तरी ग्राहकांना ज्या प्रमाणात ही इंधने स्वस्तात मिळणे अपेक्षित होते ते मिळत नसल्याचे स्पष्ट झाले. राज्य आणि केंद्र सरकारकडून त्यावर आकारले जाणारे कर व शुल्क त्यास कारणीभूत आहेत. म्हणजे ग्राहकांच्या खिशावरील ताण कायमच राहिला.

आता भारतात खुली व उदार अर्थव्यवस्था, बाजारपेठेवर आधारित अर्थव्यवस्था बहुतांशाने स्थिरावलेली आहे. सब्सिडींचे प्रमाण कमी करण्यावर एक सर्वसंमत भूमिका तयार झालेली आहे. परंतु ज्या वर्गांना सब्सिडीची आवश्यकता आहे त्यांच्यासाठी ती चालू ठेवण्याबाबतही सर्वसंमती आहे. सब्सिडीची आवश्यकता असलेले समाजघटक व वर्ग हे प्रामुख्याने कमजोर व दुर्बळ आहेत. त्यांना सब्सिडी देण्याबाबत वर्तमान राज्यकर्त्यांनी चलाख्या सुरु केल्या आहेत. या राज्यकर्त्यांनी सवलतीच्या विविध योजनांचे सरलीकरण करण्याच्या नावाखाली केंद्र सरकार पुरस्कृत योजनांची संख्या कमी केली आहे आणि काही योजना परस्परात विलीनही केल्या आहेत. यातून राज्यांचा वाटा कमी करण्यात आला आहे. त्यांच्यावर केवळ अंमलबजावणीची जबाबदारी टाकण्यात आली आहे. म्हणजेच केंद्र सरकार पुरस्कृत योजनांच्या अंमलबजावणीची फुकटची हमाली राज्यांनी करायची आणि त्याचे श्रेय स्वतःकडे म्हणजेच या देशात सरकार म्हणून ज्या व्यक्तीचा उदोउदो केला जातो त्या व्यक्तीला द्यायचे आणि निवडणुकीत मते मागायची अशी ही नवी कार्यपध्दती प्रचलित करण्यात आली आहे. केंद्र सरकार सवलती देते परंतु राज्य सरकारे (विरोधी पक्षांची) त्यात खोडे घालतात व गरीबांना मदत करु देत नाहीत असा विषारी प्रचार केला जातो. करोना काळात केंद्र सरकारतर्फे करोनाग्रस्तांना मोफत धान्यासाठी 'पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजना' सुरु करण्यात आली होती. आता एकीकडे अर्थव्यवस्था सुरळीत असल्याचे दावे केले जात असूनही ही योजना पुढेही चालू ठेवण्यासाठी पंतप्रधानांचा व त्यांच्या सल्लागारांचा आग्रह आहे. करोना संपूनही ही योजना चालू ठेवण्याचे औचित्य काय असा प्रश्न येथे उपस्थित होतो. मग पंतप्रधानांचा ही योजना चालू ठेवण्यासाठी अट्टाहास का ? इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्राने यासंदर्भात दिलेल्या बातमीनुसार या योजनेला सहाव्यांदा मुदतवाढ देण्याबाबत पंतप्रधान कार्यालयात विचारविनिमय सुरु आहे आणि बहुधा हा निर्णय लवकरच करण्यात येईल. या योजनेला मुदतवाढ देण्याचा मुद्दा विचारविनिमयासाठी आला असता अर्थमंत्रालयाच्या व्यय म्हणजेच एक्सपिंडिचर विभागाने त्यास विरोध केला होता. अन्न सुरक्षा आणि वित्तीय अशा दोन्ही आधारांवर त्यांनी मुदतवाढीची आवश्यकता नसल्याची नोट सरकारला सादर केली होती. करोनाची साथ आता जवळपास संपुष्टात आलेली असताना या योजनेची आवश्यकता नाही असे मत त्यांनी व्यक्त केले. अर्थात आता या मुद्याला राजकीय रंग दिला जाऊ लागल्याने आर्थिक व वित्तीय बाजूकडे सर्रास दुर्लक्ष करुन राजकीय लाभ कसा उठवता येईल या हेतुने आता सरकारने या योजनेला मुदतवाढ देण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. या योजनेला मुदतवाढ मिळाल्यास सरकारी तिजोरीवर ८५ हजार कोटि रुपयांच्या आसपास बोजा पडणार आहे. थोडक्यात सांगायचे झाल्यास राजकीय स्वार्थासाठी अर्थव्यवस्थेत गोंधळ घातला जात आहे.

करोना काळात अर्थव्यवस्थेची झालेली हानि अद्याप भरुन आलेली नाही. आता कोठे अर्थव्यवस्थेला गति प्राप्त होताना आढळत आहे. करसंकलनात वाढ आढळून येत आहे. परंतु सब्सिडीपोटी होत असलेला खर्च कमी झालेला नाही. उदाहरणच द्यायचे झाल्यास खतांवरील सब्सिडीचे देता येईळ. खत सब्सिडी सुमारे एक लाख कोटि रुपयांहून अधिक झाली असून अन्नधान्यावरील सब्सिडी आतापर्यंत ८० हजार कोटि रुपयांपर्यंत असल्याची माहिती मिळते. गेल्या काही दिवसात इंधनाच्या दरात झालेल्या प्रचंड दरवाढीमुळे लोकात पसरु लागलेल्या असंतोषाची झळ सरकारला बसू लागल्याने पेट्रोल-डिझेल, स्वयंपाकाचा गॅस, खते यावरील सब्सिडीत पुन्हा वाढ करण्यात आली आहे. खतांवरील सब्सिडी या आर्थिक वर्षाअखेर सव्वा दोन लाख कोटि रुपयांपर्यंत वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. वाढत्या सब्सिडी रकमेमुळे वित्तीय तूट आटोक्याबाहेर जाण्याची शक्यता व्यक्त होऊ लागली आहे. ताज्या अंदाजानुसार वित्तीय तूट ६.४० टक्क्यांपर्यंत जाण्याची शक्यता असून कोणत्याही मापदंडानुसार ही तूट प्रचंड मानली जाते. त्याचे अतिशय विपरीत परिणाम अर्थव्यवस्थेवर होऊ शकतात असे अर्थतज्ञांचे म्हणणे आहे. त्यामुळे एक लाख कोटि रुपयांची पंतप्रधान स्वस्त धान्य योजना आता बंद करण्यात यावी असे अर्थ मंत्रालयातील अधिकाऱ्यांचे पंतप्रधानांना सांगणे आहे. परंतु अर्थव्यवस्थेच्या आरोग्यापेक्षा मुंबई महानगरपालिका,

गुजरात, हिमाचल, कर्नाटक व अन्य काही राज्यांमधील विधानसभा निवडणुका आणि तेथे भाजपचा राजकीय कब्जा कसा निर्माण होईल एवढेच पंतप्रधानांना दिसत आहे व त्यामुळे त्यांचा ही योजना चालू ठेवण्याचा राजहट्ट सुरु आहे.

पंतप्रधानांनी ज्या 'रेवडी संस्कृति'चा उल्लेख केला त्या रोगाने ते व त्यांचा पक्ष देखील ग्रस्त आहेत. इतरांनी काही केले की त्याची निंदा करायची ही सुमारबुध्दींमध्ये आढळणारी नैसर्गिक विकृती आहे. इतरांना नावे ठेवताना आपल्या पायाखाली काय जळते आहे याचे भान सुमारबुध्दींना रहात नाही. निवडणुका आल्या की लोकांना ही भरमसाट आश्वासने द्यायची आणि सत्तेत आल्यानंतर ती सोयीस्करपणे विसरायची हा मतदारांना मूर्ख बनवण्याचा धंदा आता खूप झाला. या 'जुमलेबाजी'च्या विरोधात काही मंडळींनी लोकहित याचिका सर्वोच्च न्यायालयात सादरही केली आहे. तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठाकडे ती याचिका सुनावणीसाठी पाठविण्यात आली आहे. अवास्तव आश्वासने देऊन मतदारांची दिशाभूल करणे कितपत उचित व योग्य आहे आणि दिलेली आश्वासने पूर्ण न करणाऱ्या राजकीय पक्षांविरुध्द कोणती कारवाई करता येईल असे मूलभूत प्रश्न या याचिकेत उपस्थित करण्यात आले आहेत. कोर्टात यावर जे युक्तिवाद व्हायचे ते होत राहतील. कदाचित यामध्ये निवडणूक आयोगालाही भागीदार पक्ष म्हणून समाविष्ट केले जाऊ शकते. तसेच कोर्टाने यासंदर्भातील विचारविनिमयासाठी एक पॅनेल स्थापन करण्याची शिफारस केली आहे. त्यामध्ये नीती आयोग,विधि आयोग, रिझर्व बँक, विरोधी पक्ष यांच्या प्रतिनिधींच्या समावेशाची शिफारस त्यांनी केली आहे. यामध्ये सर्वांचीच भागीदारी आवश्यक आहे. या मुद्यावर तोडगा काढण्यासाठी सुप्रीम कोर्टाने संसदेला जबाबदारी दिली नाही हे विशेष सूचक व महत्वाचे आहे कारण तेथे पक्षांचे वर्चस्व असल्याने कदाचित उचित चर्चा न होता पक्षीय भूमिका घेऊन मूळ विषयाला वेगळेच वळण लागण्याची शंका कोर्टाला आली असावी. ते एक प्रकारे चांगलेच झाले.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी जो राजकीय पक्ष अशी आर्थिक सवलतींची आश्वासने देतो त्याने निवडणूक जाहीरनाम्यातच त्यासंबंधीची आर्थिक तरतूद कशी केली जाईल आणि त्यासाठी पैशाची जमवाजमव कशी केली जाईल याची माहितीही द्यावी असे सुचविले आहे. त्यांची ही सूचना म्हणजे 'धंद्याचे गुपित' फोडण्यासारखेच आहे. थोडक्यात हा वाद सहजासहजी सुटेल किंवा त्यातून समाधानकारक तोडगा लगेचच निघेल असे नाही. परंतु पंतप्रधानांनी अशी पिल्ले सोडण्याची सवय आहेच. 'एक देश, एक निवडणूक' ही कल्पना ते सातत्याने मांडून त्यावर चर्चेला तोंड फोडत असतात. हे कितपत व्यवहार्य आहे याची कल्पना त्यांनाही असावी पण एक वादाची फुसकुली सोडून ठेवायची असा हा भंपकपणा आहे. निवडणुकीत मतदारांवर आश्वासनांची खैरात करताना त्याचे गांभीर्य टिकविण्याची जबाबदारी राजकीय पक्षांवर आहे. अन्यथा निवडणुकीत काहीबाही आश्वासने द्यायची आणि मागाहून ती आश्वासने म्हणजे 'चुनावी जुमले' असल्याचे निर्लज्जपणे सांगायचे हे प्रकार बंद झाले पाहिजेत हे कुणीही मान्य करील. परंतु सत्तेत आल्यानंतर देखील आर्थिक कल्याणाच्या योजना व कार्यक्रम केवळ राजकीय लाभापोटी राबविण्याचा प्रकार हा प्रतारणेचाच आहे. विशेषतः सत्तेत आल्यानंतर राजकीय लाभासाठी केलेल्या सवलतींवर केल्या जाणाऱ्या उधळपट्टीमुळे प्रामाणिक कारदात्या नागरिकांच्या पैशाचा आपण अपव्यय करीत असल्याची जाणीव राज्यकर्त्यांना नसणे ही प्रतारणाच नव्हे तर राजकीय व्यभिचार आहे व मतांसाठीची निर्लज्ज सौदेबाजी आहे.

वर उल्लेख केल्याप्रमाणे या विषयावर चर्चा आवश्यक आहे कारण निवडणुकीपूर्वी मतदारांना आकर्षित करण्यासाठी वारेमाप आणि अव्यवहारी अशा आश्वासनांची खैरात करणे हा एकीकडे हास्यास्पद तर दुसरीकडे गंभीर चिंतेचा विषय होऊ लागला आहे. गरजू, कमजोर, दुर्बळ व वंचित समाजवर्गांना सवलती देणे ही गरज असते आणि तिची पूर्तता करण्याची जबाबदारी राजसत्तेवर असते. परंतु त्याचा अर्थ सवंग लोकप्रियता मिळविणे व त्यासाठी आर्थिक स्थिरतेशी तडजोड करणे हा नव्हे. युपीए काळात अन्न सुरक्षा योजना अमलात आणण्याची महत्वाकांक्षी योजना आखली गेली. तसा कायदाही केला गेला. जवळपास ६७ ते ७२ टक्के नागरिक त्यामध्ये समाविष्ट करण्याचे महत्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. परंतु आर्थिकदृष्ट्या ते कितपत व्यवहार्य होते याचा विचार केला गेला नाही. परिणामी त्या योजनेचे गांभीर्य नष्ट झाले आणि विचका झाला. हा अनुभव लक्षात घेऊनच अनेक अर्थतज्ञ सांगतात त्याप्रमाणे सरकारने मुख्यतः शिक्षण, आरोग्य यासारख्या प्राथमिक व अत्यंत महत्वाच्या मूलभूत गरजांवर लक्ष केंद्रित करावे. सवलती अशाच क्षेत्रासांठी दिल्या जाव्यात म्हणजे समाजाला त्याचा खरा उपयोग होऊ शकेल. अन्यथा एकीकडे आपल्या मतांसाठी विशिष्ट समाज व वर्ग डोळ्यासमोर ठेवून त्याच्यावर सवलतींचा पाऊस पाडायचा आणि उर्वरित समाजाला सवलतींपासून वंचित ठेवणे हे असंतुलित व असमतोल धोरण ठरते. त्याचप्रमाणे खासगीकरणासाठी चालना देताना खासगी उद्योधंद्यांना सवलती देताना सामाजिक सुरक्षा व कल्याणाचे उद्दिष्ट यांची पूर्तता त्यांच्याकडून केली जाते किंवा नाही यावर सरकारने लक्ष ठेवणे आवश्यक मानले जाते. कल्याणकारी राज्याची ती जबाबदारी असते. तसेच सवलती देताना पैसे वाया जाणार नाहीत याची खबरदारीही घ्यावी लागेल. कारण हा मिळणारा पैसा जनतेचा असतो, जनतेने तो करांच्या रुपाने सरकारी तिजोरीला दिलेला असतो आणि त्या पैशाचा अपव्यय होणार नाही ही जबाबदारीही राजसत्तेने पार पाडणे अपेक्षित असते. तेव्हाच 'रेवडी संस्कृती'वर टीकाटिप्पणी करण्याचा नैतिक अधिकार राज्यकर्त्यांना प्राप्त होईल.

माझा प्रयत्न असा आहे, की पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी जिल्ह्याजिल्ह्यात जावं आणि पक्षाच्या कामाचा आढावा घ्यावा. मध्यंतरी जयंतराव पाटील, पक्षाचे अध्यक्ष, ते राज्याच्या अनेक जिल्ह्यांमध्ये जाऊन आले. आत्ताही काल परवा ते जळगावला होते आणि त्यांचा खानदेशात दौरा चालू आहे. त्याच्या आधी अजित पवारांनी गडचिरोलीपासून काही महत्त्वाच्या जिल्ह्यांना भेट देऊन तेथील एकंदर स्थिती जी आहे, त्याची पाहणी केली. मी सुद्धा काही सिलेक्टिव्ह जिल्ह्यांमध्ये जातोय आणि त्याची सुरूवात आज ठाण्यापासून केलीय.

ठाणे हा महाराष्ट्राचा एक वेगळा जिल्हा आहे. विविध प्रश्न याठिकाणी आहेत आणि विधीमंडळाच्या सदस्यांची, त्यांचे मतदारसंघ जे आहेत, त्याचं जर चित्र बघितलं तर पुण्यानंतर सर्वात जास्त मतदारसंघ हे ठाण्यामध्ये आहेत. त्यामुळं ठाण्याकडं अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे, असा निष्कर्ष आमच्या सगळ्यांचा आहे. सुदैवानं

**ठाणे जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २९ ऑगस्ट रोजी कार्यकारिणीच्या बैठकीसाठी उपस्थित राहिल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन विविध घडामोडींवर भाष्य केले. त्याचा वृत्तांत...**











ठाण्यामध्ये ज्यावेळी आमचं सरकार होतं, त्यावेळेला राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीनं जितेंद्र आव्हाडांकडं महत्त्वाची जबाबदारी होती ठाण्याची. त्यांनी राज्यामध्ये ज्या पद्धतीनं काम केलं, त्याचा परिणाम हा पक्षाच्यादृष्टीनं आणि जनमताच्यादृष्टीनं आम्हाला अतिशय अनुकूल झाला. त्यामुळं साहजिकच आहे, त्याचा पक्षाला फायदा झाला.

आज आम्ही जो विचार करतो आहोत, अनेक प्रश्न आहेत, पण ते ठाण्याचेच आहेत असं नाही, ते राज्याचे आहेत. काही देशाचे आहेत. ज्यांच्या हातामध्ये देशाची सूत्रं आहेत, आणि ज्यांच्या हातामध्ये राज्याची सूत्रं आहेत, हे सगळे एका विचाराचे घटक आहेत. लोकांना काही विश्वास देण्यासंबंधीची भूमिका देशपातळीवर केंद्रातल्या सत्ताधारी पक्षानं केली आणि त्याचा जो काय अनुभव आहे, त्या अनुभवाची प्रचिती कधी मतदान करण्याची संधी ज्यादिवशी






# भाजपकडून संसदीय लोकशाहीवर हल्ला

**शरद पवार**

मतदारांना मिळेल, त्यावेळी निश्चितपणानं बघायला मिळेल. मग ते महाराष्ट्रात असेल किंवा देशपातळीवर असेल. शब्द आणि आश्वासनं ही फार देण्यात आलेली आहेत. त्या आश्वासनांची पूर्तता कितपत झाली याचा आढावा घेतला तर चित्र काही चांगलं नाही. मध्यंतरी आम्ही त्याची माहिती एकत्रित करायचा प्रयत्न केला, पहिल्यांदा तुम्हाला आठवत असेल, २०१४मध्ये निवडणुकीला सामोरं जाताना सत्ताधारी पक्षानं अच्छे दिन या प्रकारची घोषणा केलेली होती आणि ती कमिटमेंट त्यांनी केलेली होती. त्याच्यानंतर अच्छे दिनचं चित्र काय नागरिकांना जाणवलं नाही.

२०१९ला पुढच्या निवडणुकीच्या वेळेला अच्छे दिनचं विस्मरण झालं आणि न्यू इंडिया याप्रकारचा विश्वास

त्यांच्याकडून दिला गेला आणि त्यानंतर २०२४च्यासंबंधीचं आता एक नवीन आश्वासन देशाला दिलंय, फाईव्ह ट्रिलियन इकॉनॉमी ही या देशाची आम्ही करू. हा एक विश्वास त्याठिकाणी द्यायचा प्रयत्न केलेला आहे. आपण जर बघितलं या सगळ्याच्या संदर्भातली एकंदर स्थिती जे काही सांगितलं त्यातली एकही गोष्ट, कमी जास्त झालं असेल, मी काही नाही म्हणत नाही, पण शंभर टक्के त्याची पूर्तता झाली असं चित्र त्याठिकाणी दिसत नाही. हा एक यामागचा आपला अनुभव आहे.

ज्या कार्यक्रमांची आश्वासनं दिली, आता त्याच्यामध्ये २०१८मध्ये एक आश्वासन दिलं होतं, की २०२२पर्यंत देशातल्या सगळ्या ग्रामपंचायतींमध्ये इंटरनेटचं कनेक्शन देऊन ती सुविधा आम्ही देऊ आणि हा कार्यक्रम २०१८ला पूर्ण करू हे आश्वासन त्याठिकाणी दिलं होतं. घडलं काय हे मी आपल्याला सांगू इच्छित नाही. आपल्या सगळ्यांना ठाऊक आहे. कारण डिजिटल इंडिया यासंबंधीचा विश्वास हा देशाच्या नेतृत्वानी दिला खरा, पण त्याच्यामध्ये आपल्याला काही अनुभव दिसत नाही. आणि ज्यावेळेला असं सांगण्यात आलं, की देशातल्या सगळ्या ग्रामपंचायती, आता



यासंबंधीचा प्रश्न पार्लमेंटमध्ये विचारला गेला, आणि त्या खात्याचे मंत्री आहेत मनोज सिन्हा, त्यांनी सांगितलं, की हा कार्यक्रम आम्ही जाहीर केला, पण आम्ही अडीच लाख ग्रामपंचायतींमध्ये २०१९पर्यंत पोहचायचा प्रयत्न करू. पण अद्याप त्याची पूर्तता झालेली नाही. आणि आता २०२२ला देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी हा कार्यक्रम २०२५पर्यंत पूर्ण करू असं सांगितलं. याचा अर्थ दिलेलं आश्वासन याठिकाणी पाळलेलं नाहीये.

दुसरा अर्थ असा निघेल, त्याच्यामध्ये केंद्र सरकारनं माहिती अशी दिली आहे, की शंभर टक्के डिजिटल डिफिशिएन्शी देण्याचं आश्वासन २०२२पर्यंत पूर्ण केलं जाईल. पण आजची आकडेवारी बघितली, तर ३३ टक्केच्या आसपास महिला त्याच्यामध्ये पोहोचल्यात आणि ५७ टक्के पुरूषांना ही सुविधा उपलब्ध झालेली आहे. शंभर टक्क्याचं आश्वासन इथं पाळलं गेलेलं नाही. आणखी एक आश्वासन दिलं होतं, की २०२२पर्यंत प्रत्येक नागरिकासाठी टॉयलेटची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल. आता याची आकडेवारी केंद्र सरकारनीच जाहीर केलीय, आणि त्यानुसार बिहारमध्ये ५६.६ घरांच्यामध्ये टॉयलेट नाही. झारखंडमध्ये ४३ टक्के नाही. लडाखमध्ये ५८ टक्के नाही. ओडिशामध्ये ४० टक्के नाही आणि देश म्हणून बघितलं, तर साधारणत: ३० टक्के डिफिशिएन्सी आज आपल्याला टॉयलेटच्यासंबंधीची बघायला मिळते.

आणखीन एक घोषणा केली होती, २०२२पर्यंत या देशातल्या प्रत्येक





नागरिकाला छोटं मोठं का होईना घर दिलं जाईल. यासंबंधीचा प्रश्न हा पार्लमेंटमध्ये विचारला गेला. त्याच्या उत्तरात काय सांगितलं, तर कमिटमेंट काय होती, की २०२२पर्यंत प्रत्येकाला घर देऊ. आत्ता आपल्याला असं दिसतंय, की प्रत्येकाला घर हे काय मिळालेलं नाही. ५८ लाख घरं संबंध देशामध्ये या कालावधीत बांधण्यात आलेली आहेत. याचा अर्थ देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ३० टक्के लोकांना सुद्धा घरं

त्याठिकाणी दिली गेलेली नाहीत. हे उत्तर पार्लमेंटमध्ये देण्यात आलेलं आहे. त्याच्यानंतर सांगण्यात आलं, की प्रत्येकाला



२०२२पर्यंत पाण्याचं कनेक्शन दिलं जाईल. आत्ताच पार्लमेंटमध्ये त्याच्यामध्ये सांगण्यात आलंय, की २००२ची जी लिटिम आहे ती आम्ही २०२४पर्यंत वाढवतोय. म्हणजे हेही आश्वासन त्याठिकाणी पाळलं गेलेलं नाही.

आणखीन एक आश्वासन दिलं होतं, की २०२४पर्यंत प्रत्येक नागरिकाला २४ तास आणि आठवड्याचे सात दिवस वीज पुरवली जाईल आणि आत्ता त्याची माहिती जी दिसतेय, हा प्रश्न पार्लमेंटमध्ये विचारल्यानंतर, त्यावेळी याच्यासंबंधीचा रिव्हाईज कार्यक्रम घेतला जाईल आणि इलेक्ट्रिसिटी ही ६६ टक्के लोकांना आज देण्याची व्यवस्था झालेली आहे. कमिटमेंट होती एव्हरी इंडियन. त्यामध्ये ४४ टक्के लोकांना अद्याप वीज प्राप्त झालेली नाही, असं उत्तर पार्लमेंटमध्ये दिलेलं आहे. आता सगळी माहिती जर तुम्हाला द्यायची झाली तर आणखीन मला तासभर लागेल. या सगळ्या खात्यांची माहिती आम्ही गोळा केलेली आहे. त्याचा अर्थ एकच दिसतो, की या ज्या कमिटमेंट केलेल्या आहेत, त्या केंद्र सरकारच्या या सगळ्या काळामध्ये पाळल्या गेलेल्या नाहीत.

महिला...महिलांवरील अत्याचारासंबंधीची संख्या ही दिवसेंदिवस वाढतेय. अलिकडच्या काळामध्ये तुम्ही सगळ्यांनी त्याची माहिती छापली, गुजरातमध्ये श्रीमती बानो यांच्यावर अत्याचार झाला हे संबंध देशाला माहिती आहे. त्यांच्यावर बलात्काराचं संकट आलं, त्यांच्या कुटुंबातल्या दोन लहान मुलांची हत्या केली गेली आणि आणखीन सहा सात लोकांच्यावरसुद्धा असा दुर्धर प्रसंग त्यांच्या घरामध्ये आला. त्याच्यामध्ये खालचं कोर्ट, सेशन कोर्ट, हाय कोर्ट आणि सुप्रिम कोर्ट या सगळ्यांचे निकाल लागले, की जे कुणी याला जबाबदार आहेत त्या सगळ्या लोकांना कठोरातली कठोर शिक्षा त्याठिकाणी देऊ केली. त्यानंतर ती शिक्षा जन्मठेपेची झाली आणि ती आजन्म होती. त्यानंतर सुद्धा गुजरातच्या भाजपा सरकारनी हल्लीच आता निर्णय घेतला, आणि त्या लोकांना सोडण्यात आलं. आणि नुसतंच सोडण्यात आलं नाही, तर सोडल्याच्यानंतर त्यांचा जाहीर सत्कार केला गेला.

मला आश्चर्य वाटतं, की देशाच्या प्रधानमंत्र्यांचं भाषण कालच्या १५ ऑगस्टला मी बारकाईनं ऐकलं आणि त्याच्यामध्ये स्त्री वर्गाचा सन्मान याच्यामध्ये प्रधानमंत्र्यांनी अतिशय आग्रहानं भूमिका मांडली आणि ही सन्मानाची भूमिका मांडल्याच्यानंतर प्रधानमंत्री ज्या राज्यातनं येतात, त्याच राज्यामध्ये, त्यांच्याच विचाराच्या सरकारनी स्त्रियांच्यासंबंधी असा अत्यंत लाजीरवाणी, घृणास्पद गोष्ट करणाऱ्या आरोपींना सोडण्याचा निकाल केला. याच्यामध्ये लाल किल्ल्यावरील भाषणात स्त्रियांच्या सन्मानाची जी भूमिका मांडली त्या सन्मानाची प्रचिती गुजरातमधून या एका निर्णयाच्या माध्यमातून ही आपल्या सगळ्यांच्यासमोर आली हे अत्यंत चिताजनक अशा प्रकारचं चित्र आहे. अशा अनेक गोष्टी आहेत, की ज्या गोष्टी अशा सरकारमधून बघायला मिळतात.

एका बाजूनं या गोष्टी आपल्याला बघायला मिळतात आणि दुसऱ्या बाजूनं राजकीय नेतृत्वानं सतत काही ना काही कारणातून कुणावर खटले कसे घालता येतील, कुणाच्या मागं ईडी लावता येईल का, कुणाच्या पाठीमागं सीबीआय लावता येईल का हे प्रकार सतत चाललेले आहेत. आणि हे आपल्याच राज्यात चालले आहेत असं नाही, गुजरातमध्ये या तक्रारी आहेत, झारखंडमध्ये या तक्रारी आहेत. याच्यात दोन भाग आहेत. ज्याठिकाणी आज ज्यांच्या हातामध्ये केंद्राची सत्ता आहे, त्यांच्या हातात राज्याची सत्ता नाही अशा ठिकाणी सत्तेवर असलेल्या सरकारला सत्तेपासून दूर करण्याचं हाही एक उपक्रम भारतीय जनता पार्टीनं अनेक राज्यांमध्ये, की ज्याठिकाणी नॉन बीजेपी गव्हर्मेंट आहे, त्याठिकाणी घेतला गेला. उदाहरणार्थ, कर्नाटक. कर्नाटकमध्ये आज भाजपाचं

सरकार आहे. पण कर्नाटकमध्ये भाजपचं सरकार नव्हतं. त्या सरकारमध्ये काही लोक फोडले गेले आणि त्याच्यानंतर त्यांच्या मदतीनं सरकार बनवलं.

महाराष्ट्रामध्ये शिवसेनेचा एक वर्ग हा बाजूला केला गेला आणि उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालील सरकार घालवलं गेलं. मध्य प्रदेशमध्ये कमलनाथ यांच्या नेतृत्वाखाली सरकार होतं, पण त्यांच्या पक्षातले काही लोक फोडले गेले आणि त्यांच्या मदतीनं आज त्याठिकाणी भाजपाचं सरकार आणलं गेलं. हे चित्र आपल्याल्या अनेक ठिकाणी बघायला मिळतंय. सत्ता लोकांनी दिली नाही, तर लोकांनी निवडून दिलेल्या सदस्यांना फोडून, आमिषं दाखवून, त्यांना बाजूला करून ही सत्ता हातामध्ये घ्यायची हे सूत्र भारतीय जनता पार्टीनं केलेलं आहे आणि त्याचं महत्त्वाचं कारण असं दिसतंय, की देशामध्ये राज्य सरकारात त्यांना संधी मिळेल त्याचा विश्वास त्यांना नाहीये. आणि संधी आहे का नाही याचं चित्र संबंध देशातलं तुम्ही पाहिलं. कालच्या ज्या विधानसभेच्या निवडणुका झाल्या, केरळमध्ये काय आहे. नॉन बीजेपी गव्हर्मेंट आहे. तामिळनाडूमध्ये नॉन बीजेपी गव्हर्मेंट आहे. कर्नाटकमध्ये नॉन बीजेपी गव्हर्मेंट होतं. आंध्रमध्ये नॉन बीजेपी गव्हर्मेंट आहे. तेलंगणामध्ये नॉन बीजेपी गव्हर्मेंट आहे. महाराष्ट्रात नॉन बीजेपी गव्हर्मेंट होतं. गुजरात सोडलं. मध्य प्रदेशमध्ये नॉन बीजेपी गव्हर्मेंट होतं. त्याच्यानंतर ओडिशामध्ये नॉन बीजेपी गव्हर्मेंट आहे. झारखंडमध्ये नॉन बीजेपी गव्हर्मेंट आहे. पश्चिम बंगालमध्ये नॉन बीजेपी गव्हर्मेंट आहे. आपण जर बघितलं संबंध देशाचं, तर मोजकी राज्यं, गुजरात, आसाम अशी मोजकी तीन चार राज्यं जर सोडली तर भारतीय जनता पार्टीकडं राज्यांची सत्ता नव्हती, लोकांनी दिलेली नाही. याचा अर्थ लोकांचं मत त्या पक्षाच्यासंबंधी दिवसेंदिवस काय होतंय याची प्रचिती या सगळ्याच्या माध्यमातून आपल्यासमोर येते.



आणि म्हणून या मार्गानी सत्ता हाती येत नसेल, तर माणसं फोडणं, साधनांचा वापर करणं, ईडीसारख्या यंत्रणेचा वापर करणं आणि सत्ता काबीज करणं हे अत्यंत गंभीर चित्र आज या देशाच्यासमोर दिसतंय. त्यामुळे एक प्रकारचं आव्हान आहे. आम्ही प्रयत्न असा करतो आहोत, की देशातले नॉन बीजेपी जे काही राजकीय पक्ष आहेत, त्यांच्याशी सुसंवाद साधून या प्रकारे लोकशाहीच्या मार्गाने आलेली शासनं ही उद्ध्वस्त करण्याचे जे प्रयत्न चालू आहेत, त्याच्याबद्दल एक प्रकारचं जनमत तयार करता आलं तर ते करावं अशी चर्चा आम्ही जाऊन आता करणार आहोत. अजून केलेली नाही. पण करणार आहोत. याच्यामध्ये लक्ष घालायची गरज आहे. कारण संसदीय लोकशाही हिच्यावरच हा हल्ला केला जातोय.





दुसऱ्या बाजूनी राजकीय नेत्यांना विरोधातील असतील, त्यांना या ना त्या मार्गानं त्रास देण्याचं काम सुरू आहे. महाराष्ट्रामध्ये त्याची उदाहरणं आहेत. महाराष्ट्रामध्ये गृहमंत्री होते अनिल देशमुख. त्यांच्यावर काय झालंय ते






## सत्तेची जबाबदारी घेणार नाही....

**मी सत्तेतली कोणतीही जबाबदारी आता घेणार नाही. माझे वय ८२ आहे. मोरारजीभाई भाग्यवान होते. ते ८२व्या वर्षी प्रधानमंत्री झाले. मोरारजींचा कित्ता मी काय चालवू इच्छित नाही. मी या देशासमोरचे प्रश्न जे असतील, सामान्य लोकांच्या अडचणी असतील त्याची सोडवणूक करण्याच्यासाठी विविध राजकीय विचारांच्या लोकांना एकत्रित करण्याच्यासाठी पुढाकार घ्यावा हे सूत्र नेतृत्व माझे आहे. माझ्याकडं आज असावं याबद्दलचा माझा आग्रह नाही. मी आता सत्तेची जबाबदारी ही घेणार नाही.**

तुम्हाला ठाऊक आहे. पण गंमत अशी आहे, त्यांना अटक करण्याच्या आधी त्यांच्या घरावर रेड केल्या. किती रेड कराव्यात? त्यांच्या घरावर ईडीच्या ५० रेड झाल्या. सीबीआयच्या ४० झाल्या आणि इन्कम टॅक्सच्या वीस झाल्या. अशा मिळून ते आणि त्यांच्या जवळचे लोक, यांच्यावर ११० रेड झाल्या. एका व्यक्तीच्या कुटुंबात, त्यांच्या नातेवाईकांच्या, त्यांच्या जवळच्या सहकाऱ्यांवर किती रेड केल्या जातात याचा उच्चांक या देशामध्ये कधी घडला नव्हता, तो आज त्याठिकाणी झाला. आता त्यांच्याबद्दलचं कोर्टामध्ये चार्जशीट आपण देतो. पहिल्या चार्जशीमध्ये त्यांच्यावर जो आरोप केला, त्यामध्ये त्यांनी शंभर कोटी रूपयांचा घोटाळा केला असा आरोप त्यांच्याबद्दल केला गेला. नंतर ते दुरूस्त केलं. सविस्तर माहिती घेऊन, तपास केल्यावर तो शंभर कोटीचा आकडा ४ कोटी आणि ७ लाखावर आला. आणि आता फायनल जी चार्जशीट दिली, त्याच्यामध्ये १ कोटी, ७१ लाख झालं. म्हणजे १०० कोटीनी सुरूवात केली आणि आत्ता १ कोटी ७१ लाखावर येऊन पोहोचली. ज्यावेळी कोर्टामध्ये या सगळ्या गोष्टी येतील, त्यावेळी ती एक कोटीचीही रक्कम नाही हे त्याच्यामध्ये सिद्ध होईल. आज त्याच्यावर मी काय भाष्य करू इच्छित नाही. पण एका राज्याच्या गृहमंत्र्यांच्यावर, जे सार्वजनिक जीवनामध्ये जवळपास ८-९वेळा सतत विजयी झालेले आहेत, लोकांचं समर्थन आहे अशा व्यक्तीच्या आणि जवळच्या लोकांच्यावर ११० रेड टाकणं आणि ॲलिगेशन शंभर कोटीवरून शेवटी १ कोटी ७१ लाखावर येणं याचा अर्थ एकंदर ही सगळी यंत्रणा कशा पद्धतीनं अपोझिशनला अडचणीत आणण्याच्यासाठी वापरली जाते याचं हे उत्तम उदाहरण आहे.

हीच गोष्ट नवाब मलिकांच्या बाबतीमध्येसुद्धा आहे. आणि हीच गोष्ट सामनाचे संपादक संजय राऊत यांच्याबद्दलचीही आहे. इतर राज्यातसुद्धा अशाच प्रकारे या सगळ्या यंत्रणेचा वापर हा केला जातोय आणि एक नवीन चित्र अलिकडच्या काळात असं काही दिसलं नव्हतं ते आपल्याला या देशात, या राज्यात दिसायला लागलेलं आहे, ही चिंताजनक गोष्ट आहे.



## विरोधी पक्षनेते अजित पवार यांचे विधानसभेतील भाषण

सध्या राज्यात एवढी गंभीर परिस्थिती निर्माण झाली की, अनेक भागातील जमिनी खरवडून गेल्या आहेत. एनडीआरएफ व एसडीआरएफच्या नॉर्मनुसार आपण काहीही मदत करु शकत नाही. या करिता विशेष बाब म्हणून आपल्याला निर्णय घ्यावा लागेल. वाहून गेलेल्या,खरवडून गेलेल्या जमिनीमध्ये २४ वर्षात काही पिकणार नाही. काही ठिकाणी दुसऱ्या जमिनीतील गाळ वाहून तिसऱ्याच्या जमिनीत गेला. तेथेही अतिशय बिकट परिस्थिती निर्माण झाली. सोयाबीन, कापूस ,बाजरी, तूर, मका ही सर्व पिके अडचणीत आहेत. अधिवेशन सुरु होण्यापूर्वी कॅबिनेटच्या बैठकीमध्ये शासनाने घोषणा केली की, एनडीआरएफच्या दुप्पट मदत जाहीर केली जाईल. मात्र ही मदत अतिशय तुटपुंजी आहे.




# कोरडवाहूसाठी हेक्टरी ७५ हजार तर फळपिकांसाठी दीड लाख रुपये मदत द्या

### विधानसभेतील विरोधी पक्षनेते अजित पवार यांची मागणी

# पूरग्रस्तांना सरकारची मदत तुटपुंजी



"सन २०२२ च्या माहे जुलै-ऑगस्ट महिन्यात प्रामुख्याने विदर्भ व मराठवाड्यासह राज्यातील इतर भागात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाली असून जिरायती व बागायती पिकांचे, घरांचे, पशुधनाचे नुकसान झाले असणे, तसेच सुमारे १२५ पेक्षा जास्त लोकांना आपल्या प्राणास मुकावे लागले असणे, विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ, तसेच मराठवाड्यातील नांदेड, परभणी, हिंगोली व बीड आदि जिल्ह्यात सर्व पिके वाहून व सडून गेलेली असणे, सोयाबीन, कापूस व तूर सारख्या नगदी पिकांचे तसेच नगदी पिकांबरोबरच केळी, संत्रा व तत्सम फळपिकांचेही नुकसान झालेले असणे, राज्यातील काही भागात, विशेषत: बीड, उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यात सोयाबीन पिकावर गोगलगायीचा व हळदया (यलो मोबॅक) रोगाचा प्रादुर्भाव झाला असून शासनाकडून प्रतिबंधात्मक उपाययोजना न झाल्यामुळे सोयाबीन उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता असणे, पीक नुकसानीबरोबरच हजारो ठिबक व तुषार सिंचन संच वाहून गेले असून त्यात मातीचा गाळ जाऊन ते नादुरुस्त झालेले असणे, शासन निर्णयानुसार पुढील ७ वर्ष नवीन संच बसविण्यास अनुदान देय नसल्यामुळे शासनाने सदरची अट शिथिल करण्याची आवश्यकता असणे, अतिवृष्टीत राज्यातील हजारो हेक्टर शेतजमीन वाहून व खरडून गेल्याने त्या पुर्णपणे नापीक होण्याची भीती निर्माण झाली असणे,

अनेक विहिरी गाळाने भरुन नादुरुस्त झाल्या असणे, मोठे ओढे व नदी, नाले यांनी आपली पात्रे बदलल्याने काठावरील सुपीक जमीन नापीक झाली असणे, सततच्या पावसाने काही जिल्ह्यातील पुलांचे तसेच पांदण रस्ते, ग्रामीण व प्रमुख जिल्हा मार्ग मोठ्या प्रमाणावर नादुरुस्त झाले असून मोठ्या खड्ड्यांमुळे अपघात होणे, अनेक गावे अजुनही तालुक्याच्या संपर्कात आलेली नसणे, अनेक गावात विजेचे खांब अद्यापही पडलेले असणे आणि ट्रान्सफॉर्मर व विद्युत वाहिन्या नादुरुस्त होऊन वीज वितरण व्यवस्था पुर्णत: कोलमडलेली असणे, पुराचे पाणी घरात शिरल्याने घर, जनावरांचे गोठे, दुकान, टपऱ्या यांची मोठया प्रमाणावर पडझड होणे, बराच काळ पाणी घरात राहिल्याने काही घरे पुर्णपणे ढासळलेली असून गाई-गुरांसह इतर पशुधन पाण्यामध्ये वाहून गेलेले असणे, मजुरांना या सर्व काळात व पुढील काही काळ मजुरी मिळणार नसल्यामुळे विशेष बाब म्हणून मजुरांना त्यांच्या झालेल्या नुकसानीसाठी आर्थिक मदत करण्याची आवश्यकता असणे, शासनाने तातडीने लक्ष न दिल्याने नाउमेद होऊन अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या असणे, अनेक भागातील धरणे पूर्ण क्षमतेने भरुन ओसंडून वाहत असून भविष्यात पूरपरिस्थिती निर्माण झाल्यास या भागाचे पुन्हा नुकसान होण्याची शक्यता असणे, जलसंपदा विभागाने आताच पूर परिस्थिती नियंत्रणाचे नियोजन करणे आवश्यक असणे तसेच कोकणामध्ये ऐन पीक लावणी करण्याच्या वेळी जवळपास १५ दिवस पाऊस नसल्याने भात व नागली पिकाची रोपे सुकून जाणे, तर महाराष्ट्रातील काही भागामध्ये पर्जन्यमान कमी असल्याने झालेली पिकांची हानी व संभाव्य पाणीटंचाई निर्माण होणे, एकंदरीतच विदर्भ, मराठवाडा व इतर भागातील अतिवृष्टीमुळे पिके, फळपिके, शेतजमीनी, रस्ते, विजव्यवस्था, घरे यांच्या नुकसानीसाठी शासनाने जाहीर केलेली मदत अत्यंत तुटपुंजी असून अनेक घटकांचा त्यात समावेश झालेला नसणे, अतिवृष्टी झालेल्या भागात अद्यापही रु. ५० हजार सानुग्रह अनुदानाचे वाटप न करणे, शासनाने कोरडवाहूसाठी हेक्टरी ७५ हजार रुपये तसेच फळपिकांसाठी हेक्टरी दीड लाख रुपयांचे तसेच सर्व घटकांचा समावेश करुन त्यांना ठोस मदत जाहीर करण्याची आवश्यकता, शेतकऱ्यांनी खरीप हंगामाकरीता पीक कर्ज घेतलेले असून अतिवृष्टीमुळे कर्ज परतफेड करणे त्यांना शक्य नसणे, या हंगामासाठी घेतलेल्या कर्जाचीही कर्जमाफी करण्याची लोकप्रतिनिधींची व शेतकऱ्यांची आग्रही मागणी असणे, तथापि, शासनाकडून याबाबत दुर्लक्ष होत

असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेली नाराजी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

विदर्भ, मराठवाडा, कोकणासह राज्यातील जवळपास २८ जिल्ह्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे, जमिनीचे, घरांचे, घर साहित्यांचे, पशु धनांचे, रस्ते, विजेचे खांब व इतर नुकसान झालेले आहे. उक्त नुकसानीसंदर्भात शेतकऱ्यांना व जनतेला मदत देण्याबाबतचा प्रस्ताव आज सभागृहामध्ये मांडण्यात आलेला आहे. उक्त प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

महाराष्ट्र राज्याने आजपर्यंत दुष्काळ, गारपीट, चक्रीवादळ, भूकंप अशा प्रकारची अनेक नैसर्गिक संकटे पाहिलेली आहेत. अशा प्रकारची अतिवृष्टीहोण्यामागे काही कारणे असू शकतात. सध्या Global warming चे संकट जगातील पूर्ण देशांवर आहे. वेगवेगळ्या भागामध्ये सरासरीपेक्षा किती तरी जास्त पाऊस पडत आहे. असे असताना जगातील काही देशामध्ये दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. महाराष्ट्रातील काही भागामध्ये ढगफुटी होते तर काही भागांमध्ये प्रचंड पाऊस पडतो आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसह जनतेचे अतोनात नुकसान होत आहे. आज आपण २१ व्या शतकामध्ये असलो तरी अनेक बाबींवर आजही शेतकऱ्यांवर अवलंबून आहोत. आपल्या देशामध्ये शेतकरी अन्नधान्याच्या उत्पादनासह भाजीपाला व फळांचे उत्पादन घेत आहे. देशाला नव्हे तर जगाला अन्नधान्य पुरवेल, असा आपला मजबूत शेतकरी आहे.. ...

मागील दीड-दोन महिन्यांच्या काळात महाराष्ट्रामध्ये काही राजकीय घटना घडलेल्या आहेत. त्या घटनांच्या खोलामध्ये मी आज जाऊ इच्छित नाही. परंतु तसा प्रसंग असेल तेव्हा मी त्या विषयावर बोलेन... ...

महाविकास आघाडी सरकार चांगल्या पद्धतीने काम करीत असताना विद्यमान माननीय मुख्यमंत्री यांच्या मनामध्ये वेगळे विचार आले. त्यामुळे त्यांनी वेगळी भूमिका घेऊन नवीन सरकार स्थापन केले व स्वत: राज्याचे मुख्यमंत्री झाले. सरकार स्थापनेच्या काळामध्येच राज्यामध्ये अतिवृष्टी होत होती.



आज अतिवृष्टीमुळे राज्यातील सर्व जनता हवालदिल झाली आहे. आजही मोठया प्रमाणात राज्यात पाऊस सुरु आहे. गडचिरोली, भंडारा, गोंदिया या भागात बराच पाऊस पडत आहे. येथील नद्या ओसंडून वाहत आहेत. येथील धरणे भरली आहेत. हीच स्थिती जायकवाडी धरण येथे आपण बघत आहोत. नाशिकमधील वरच्या भागातील सर्व धरणे भरली आहेत. जायकवाडी धरण भरले आहे. मराठवाड्यातील येलदरी, सिध्देश्वर, निम्न तेरणा ही धरणे भरली आहेत. कोयना

धरण भरले आहे. कोल्हापूर, सातारा, सांगली येथील धरणे भरली आहेत. जायकवाडी धरण जसे मराठवाड्याला वरदान ठरले आहे तसेच वरदान ठरणारे उजनी धरणही भरले आहे. ही सर्व धरणे भरली आहेत. आता ऑगस्ट महिना सुरु आहे. हवामान खात्याने सांगितले आहे की, सप्टेंबर, ऑक्टोबर पर्यंत राज्यात पाऊस सुरु राहील. शिवाय कोकणात देखील पाऊस पडत आहे. मागील काळात अतिवृष्टीमुळे कोकणातील रायगड, रत्नागिरी, चिपळूण, महाड या शहरांचे अतोनात नुकसान झाले होते. मागील वेळी सरकारने तेथील नद्यांमधील गाळ काढण्याचा मोठा कार्यक्रम हाती घेतला. मात्र या कार्यक्रमास उशीर झाला. वेगवेगळया परवानग्या वेळेत घेता





आल्या नाहीत. उशीर झाल्यामुळे नद्यांमधील सर्व गाळ निघाला नाही. या संबंधी चर्चा करीत असताना एक गोष्टी मी लक्षात आणून देऊ इच्छितो. राज्याचे प्रमुख म्हणून आपण आताच यांत्रिकी विभागाला सूचना करावी. पाऊस कमी झाला की, या भागातील उर्वरित गाळ काढावा. यामुळे चिपळूण, महाड, रत्नागिरी, रायगड येथील गावांमधील पूर ओसरण्याकरिता किंवा पाणी न येण्याकरिता मदत होणार आहे. या करिता आपण जातीने लक्ष घालावे. आम्ही देखील आपल्याला या करिता आठवण करुन देऊ. कोकणवासियांची ही अतिशय गरज आहे. मागील काळात पाऊस पडायचा व पाणी यायचे. यामुळे या भागातील लहान -मोठे दुकानदार, घरे, रुग्णालये यांना नुकसान सोसावे लागले. त्यावेळी कोरोनाचे सावट असताना रुग्णालयात पाणी गेल्यानंतर काही रुग्ण दगावले होते. हे आपण अनुभवलेले आहे. त्यावेळी माननीय मंत्री श्री.उदय सामंत तेथे गेले होते. अशी स्थिती पुन्हा एकदा कोकणावर व महाराष्ट्राच्या इतर भागात येता कामा नये. या करिता ही बाब गांभीर्याने घेतली पाहिजे. पावसाळा संपल्यानंतर उर्वरित गाळ काढला पाहिजे, अशी माझी नियम २९३ अन्वयेच्या चर्चेच्या अनुषंगाने मागणी आहे.

शासनाने लक्षात घेतले पाहिजे की, आता राज्यातील बहुतांश धरणे पूर्ण भरली आहेत. राज्याचे माननीय मुख्यमंत्री या पूर्वी गडचिरोली जिल्ह्याचे पालक मंत्री होते. या जिल्ह्यामध्ये वैनगंगा, पैनगंगा नदीचे पाणी जाते. वर्धा नदी वैनगंगेला मिळते, इरई नदीला मिळते. ही नदी पुढे गोदावरीला मिळते. मराठवाड्यातून गोदावरी नदी वाहते नंतर ती तेलंगणा व आंध्र प्रदेशमध्ये शिरते. अशा नद्या ओसंडून वाहत आहेत. आज तारीख १८ ऑगस्ट असताना धरणे पूर्ण भरली आहेत. मुख्यमंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, अजूनही मोठया प्रमाणात पाऊस आला तर धरणातील पाणी, धरणाच्या फ्री कॅचमेंट एरियामधील पाणी तसेच, कॅचमेंट एरियामधील पाणी एकत्रित होऊन वाहणार आहे. तेव्हा नदी काठावरील सर्व तालुक्यांना, गावांना व शहरांना धोका निर्माण होणार आहे. या निमित्ताने मी आपल्याला मागणी करु इच्छितो. माझ्या माहितीनुसार, माननीय उप मुख्यमंत्री यांच्याकडे जलसंपदा विभाग आहे. पावसाळा संपेपर्यंत पाटबंधारे विभागाचे अधिकारी, एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर पातळीवरील एखादा अधिकारी रात्री धरणावर असलाच पाहिजे. जर रात्री अचानक पाऊस सुरु झाला व तो अधिकारी धरणावर नसेल तर अशा वेळी दरवाजे कमी-जास्त करण्याकरिता खालच्या अधिकाऱ्यांनी काही चूक केली तर त्याची जबरदस्त किंमत राज्यातील खालच्या भागातील लोकांना मोजावी लागेल. ही बाब सरकारने गंभीरतेने घेण्याची गरज आहे.

तेलंगणा राज्यात प्राणहिता नदीवर मेडीगट्टा धरण बांधले गेले आहे. या करिता कशा प्रकारे परवानग्या दिल्या हे कळत नाही. १६५ टीएमसी पाण्याचा वापर तेलंगणा राज्य करते. त्यांनी प्रचंड मोठया मोटर्स बसवल्या आहेत. हा त्यांचा अधिकार आहे. या बाबत मी जास्त बोलू शकत नाही. जसे आलमट्टी धरणाचे पाणी वेळेवर सोडले नाही तर पाण्याचा फुगवटा सांगली जिल्ह्यात व इतर शहरांमध्ये निर्माण होतो तशा प्रकारे मेडीगट्टा धरणाचे दरवाजे योग्य प्रकारे उघडले नाहीत तर त्या पाण्याचा फुगवटा गडचिरोली, गोंदिया जिल्ह्यात निर्माण होतो व यामुळे वैनगंगा, पैनगंगा नदीचे पाणी वाढते. तसेच




सिरोंचा भागात पाणी वाढते.

पूर्वी सांगण्यात आले की, या भागाची पाहणी करण्याकरिता माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आम्ही तेथे गेलो होतो. हे आपले कामच आहे. त्यांनी तेथे गेलेच पाहिजे. राज्यात चांद्यापासून बांद्यापर्यंत जेव्हा एखादे संकट येते तेव्हा राज्याच्या प्रमुखांनी जायचेच असते. या नंतर असे सांगण्यात आले की, या भागात भेट देण्यास विरोधी पक्ष उशिरा गेले. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री धर्मरावबाबा आत्राम आहेत की नाही, हे मला माहिती नाही. त्यावेळी सिरोंचा परिसरात २४ तास जाता येत नव्हते. मी सातत्याने विचारत होतो. आपल्याला देखील तेथे शेवटपर्यंत जाता आले नाही. आपण पुलावरुन या परिसराची पाहणी केली. आपल्या नंतर मी तेथे गेलो तेव्हा सांगण्यात आले की, सर्व पूल बंद आहेत. दळणवळण, वाहतूक बंद होते. हेलिकॉप्टर तेथे जाऊ शकत नव्हते. अशी परिस्थिती असल्यामुळे आपणा दोघांना तेथून परत फिरावे लागले. या नंतर आपण गडचिरोली येथे बैठक घेतली व निर्णय जाहीर केला. ज्या ज्या वेळी राज्यात किंवा आपल्या मतदारसंघात संकटे येतात त्यावेळी या सदनातील सदस्य तेथे जातच असतात. तेथे जाणे हे त्यांचे कर्तव्यच असते. प्रत्येक जण आपली जबाबदारी पार पाडत असतो. मी जेव्हा गेलो तेव्हाही मला सिरोंचा येथे जाता आले नाही. मला सांगितले की, तेथे जाण्यास २४ तास लागतील व दुसऱ्या राज्यातून जावे लागेल. यामुळे मी तेथे गेलो नाही. माझ्या आधी सन्माननीय सदस्य श्री. रोहित पवार व सन्माननीय सदस्य श्री.धर्मरावबाबा आत्राम गेले होते. त्यांना तेथे पोहचण्यास बराच वेळ लागला.

सध्या राज्यात एवढी गंभीर परिस्थिती निर्माण झाली की, अनेक भागातील जमिनी खरवडून गेल्या आहेत. एनडीआरएफ व एसडीआरएफच्या नॉर्मनुसार आपण काहीही मदत करु शकत नाही. या करिता विशेष बाब म्हणून आपल्याला निर्णय घ्यावा लागेल. वाहून गेलेल्या,खरवडून गेलेल्या जमिनीमध्ये २४ वर्षात काही पिकणार नाही. काही ठिकाणी दुसऱ्या जमिनीतील गाळ वाहून तिसऱ्याच्या जमिनीत गेला. तेथेही अतिशय बिकट परिस्थिती निर्माण झाली. सोयाबीन, कापूस ,बाजरी, तूर, मका ही सर्व पिके अडचणीत आहेत. अधिवेशन सुरु होण्यापूर्वी कॅबिनेटच्या बैठकीमध्ये शासनाने घोषणा केली की, एनडीआरएफच्या दुप्पट मदत जाहीर केली जाईल. मात्र ही मदत अतिशय तुटपुंजी आहे. अध्यक्ष महोदय,

मी आपल्या मार्फत माननीय मुख्यमंत्री व राज्याला सांगू इच्छितो. येथे दोन्ही बाजुला शेतकऱ्यांचे प्रतिनिधी बसलेले आहेत. सोयाबीनकरिता प्रति एकर खर्च ११,७०० रुपये येतो. कापसाचा प्रति एकर खर्च ११,५७० रुपये येतो. त्यामध्ये शेत नांगरणी, मोकळणी, पाच मारणे, रासायनिक खतांचा, साळी काढण्याचा, बियाण्यांचा, किटकनाशकांचा, डवरणीचा, निंदण करण्याचा, मजुरीचा खर्च, अशा सर्व प्रकारचा खर्च मिळून साधारणपणे एकरी अकरा ते साडेअकरा हजार रुपयांचा खर्च या दोन्ही पिकांकरिता येतो. सभागृहातील ज्या सन्माननीय सदस्यांना याबाबत माहिती आहे, त्यांनी सांगावे.

असे असताना शासनाने हेक्टरी केवळ १३,६०० रुपयांची मदत जाहीर केलेली आहे. त्यात शेतकऱ्यांनी काय करावे? यंदाच्या वर्षाचे खरीप पीक कर्जाचे वाटप झाले.... माननीय श्री.अब्दुल सत्तार आपल्याकडे आता कृषी मंत्रालय आले आहे, याबद्दल मी तर आश्चर्यचकितच झालो. तत्कालीन माननीय मंत्री श्री.दादाजी भुसे या खात्याचा कारभार फार बारकाईने पाहत होते. त्यांच्यावर अन्याय का केला गेला, हे मला माहीत नाही..... ठीक आहे, तुम्ही सांगितले.

मी त्यावेळेस पहायचो. सन्माननीय सदस्य श्री.दादाजी भुसे तुमचे काम खरेच चांगले चालले होते. जे चांगले आहे त्याला मी चांगलेच म्हणणार. पीक कर्जाच्या बाबतीत, पीक विम्याच्या बाबतीत आपल्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या तोंडाला अक्षरश: पाने पुसल्यासारखे झाले आहे. त्यांचा एकरी खर्च अकरा हजार रुपयांचा आहे. मात्र शासनाने त्यांना हेक्टरी केवळ साडेतेरा हजार रुपये दिले. त्या साडेतेरा हजार रुपयांमध्ये त्याने कसे जगावे, प्रपंच कसा चालवावा, वर्ष कसे घालवावे? खरिपाचे पीक तर गेलेलेच आहे. खरिपाचे पीक गेलेले असल्यामुळे शेतकऱ्यांना आता रब्बी पिकाची वाट पहावी लागणार आहे. मात्र रब्बी पिकाची वाट पाहत असताना काही काही भागामध्ये रब्बीचा पाऊस पडत नाही त्यामुळे तेथे पिके घेता येत नाहीत. त्या संदर्भात देखील सरकार म्हणून विचार केला गेला पाहिजे.

खूप ठिकाणी मोठे ओढे, नाले, काठावरच्या जमिनी मोठ्या प्रमाणावर खरडून गेल्या आहेत. नदीकाठच्या जमिनी तर खरडून गेलेल्याच आहेत. काही काही ठिकाणी तर खूप वाईट अवस्था आहे. वणी, यवतमाळ अशा महाराष्ट्रातील काही भागातील गावांची आम्ही पाहणी केली. WCL च्या कोळसा खाणीतून कोळसा काढताना निघालेल्या मातीचे अक्षरश: ढिगच्या ढिग ...... फ्लाय ॲश वेगळी... खाणीतून कोळसा काढायच्या आधी जी माती काढली जाते त्या मातीचे डोंगराएवढे मोठे भराव तेथे पडले होते. नदी किनारी त्या मलबा, मातीचा साठा करुन बांध घातले गेले. नदीचे पाणी त्यामुळे थोपवले जाते ते दुसऱ्या भागात शिरते. बरेच शेतकरी आम्हाला सांगत होते की, गेली ५० वर्षे अशा प्रकारचे पाणी आमच्या शेतात आले नव्हते ते आता आले. त्या बांधामुळे नदीची पाणी वहन क्षमता कमी झाल्यामुळे पाणी अडल्यामुळे पुराचे पाणी त्या गावांमध्ये शिरले. मुख्यमंत्री महोदय, त्या संदर्भातील सर्व्हे करावा लागेल. त्या गावांचा काही दोष नसताना त्या भागात नैसर्गिक खाणी असल्यामुळे ही सर्व अडचण त्या ठिकाणी निर्माण झालेली आहे.

हे धरणातले व पावसाचे पाणी अशा प्रकारे वाहून जात असताना शेतकऱ्यांची घरे-दारेही अक्षरश:वाहून गेली. काहींची घरे तुटली, मोडली त्यांना उघड्यावर झोपावे लागले. त्यांच्या मुलाबाळांचा संसार उघड्यावर आला. मी काही भागात फिरत असताना मला तेथील शेतकऱ्यांनी सांगितले की, आम्ही आता काय करायचे, जगायचे कसे, आम्ही काढलेले पीक कर्ज फेडायचे कसे? सरकारने याबाबतची भूमिका देखील स्पष्ट केली पाहिजे.

इरई धरणाबाबतचा प्रसंग तर खूपच गंभीर आहे. सन्माननीय सदस्य श्री. किशोर जोरगेवार आता सभागृहात उपस्थित आहेत. माननीय श्री.सुधीर मुनगंटीवार आता सभागृहात उपस्थित नाहीत. ते चंद्रपूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतात. आम्ही दोघांनी तसेच माननीय खासदार श्री. बाळू धानोरकर यांनी तेथे पाहणी केली. त्या इरई नदीवर ऊर्जा विभागाने धरण बांधलेले आहे. परंतु, त्या नदीमध्ये WCL च्या खाणीतील गाळ मोठ्या प्रमाणावर टाकला जातो.

मी उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे की, अक्षरश: तेथून घाण काढतात व नदीमध्ये टाकतात. त्यामुळे त्या नदीची पाणी वहन करण्याची क्षमताच संपलेली आहे. केवळ त्या भागातीलच नाही तर महाराष्ट्रातील अनेक भागातील अनेक नद्यांमध्ये राडारोडा टाकण्याचे प्रमाण वाढलेले आहे. शहरी भागात जेथे नवीन इमारतींची कामे सुरु होतात तेथे जुन्या इमारती पाडल्यानंतर त्यांचा राडारोडा नदीमध्ये टाकला जातो. त्यामुळे पाणी वाहण्यात अडथळे निर्माण होतात.

काही भागात WCL च्या खाणीतील माती किंवा मघाशी उल्लेख केलेली ॲश देखील नदीत टाकली जाते. नदीमध्ये ॲश मिसळल्याने नदीचे पात्र उथळ होते व नदीमध्ये झाडेझुडपे मोठ्या प्रमाणावर वाढतात. या सर्वांचा फटका बसून त्याचे बॅकवॉटर चंद्रपूर शहरामध्ये शिरत आहे. काही काही ठिकाणी तर इमारतींचे दीड मजले पाण्याखाली गेले होते. त्यांनी सांगितले की, आता तर दरवर्षी हे आमच्या मागे लागलेले आहे. तेथे अतिक्रमणे वाढलेली आहेत.

मुख्यमंत्री महोदयांकडे नगरविकास खात्याचा कार्यभार देखील आहे. त्यांना मला हे सांगावयाचे आहे की, काही

शहरात ओढे नाले आहेत तेथे अतिक्रमणे झालेली आहेत. तेथे टाऊन प्लॅनिंगचे काही ऐकले जात नाही. कोणी परवानग्या घेत नाही. बेकायदेशीर बांधकामे होत आहेत. आम्ही पाहणी करीत असतानाच तेथे प्लॉट पाडण्याचे काम सुरु होते. आम्ही त्यांना विचारले की, असे प्लॉट कसे काय पाडता? तेथे तहसीलदार की प्रांत अधिकारी होते, त्यांनी सांगितले की, आमची परवानगी नसतानाही ते असे करतात.

अशा प्रकारची प्रचंड बेकायदेशीर कामे महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात चाललेली आहेत. ज्यावेळेस पाऊस नसतो त्यावेळेस तुमच्या आमच्या ते लक्षात येत नाही. परंतु, अशा प्रकारची अतिवृष्टी झाल्यानंतर कारण नसताना निष्पाप लोकांना त्याचा फटका बसतो. त्यांना त्याची किंमत मोजावी लागते.

६५ मिलीमीटर पाऊस झाल्यानंतरच मदत करायची असे एनडीआरएफने ठरविलेले आहे. तुम्ही विचार करा, रोज पाऊस पडत होता. मात्र रोज पाऊस पडत असताना त्या भागातील पिके गेल्यानंतरही कधी कधी पंचनामे केले जात नाहीत. ते सांगतात की, नियमित पाऊस पडत असताना पंचनामे करण्याचे धोरण नाही. मुख्यमंत्री महोदय त्या धोरणामध्ये बदल करावे लागतील. अशा प्रकारची संकटे आल्यानंतर शेतकऱ्यांना त्या संकटातून बाहेर काढण्याकरिता नियमावर बोट ठेवून चालणार नाही. त्यामध्ये काही बदल करावेच लागतील. ते बदल या चर्चेला जे मंत्री महोदय उत्तर देणार आहेत त्यांनी जाहीर केले पाहिजेत.

WCL च्या कोळसा खाणीतून जे काही मटेरिअल निघत आहे त्यामुळे चंद्रपूरचे नुकसान होत आहे. माननीय श्री.चंद्रशेखर बावनकुळे पूर्वी ज्या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करावयाचे त्या कोराडीमध्ये देखील बांध फुटला व सर्व ॲश शेतकऱ्यांच्या शेतात गेली. अशा प्रकारचे फटके तेथे मोठ्या प्रमाणावर बसतात. मुख्यमंत्री महोदय आपण त्याचाही विचार सरकार म्हणून केला पाहिजे, अशा प्रकारची माझी आग्रही मागणी आहे.

मला एक गोष्ट लक्षात आणून द्यावयाची आहे की, मोठे ओढे, नाले यांना तर फटका बसतोच. काही वर्षे जमिनी नापिक राहणार आहेत, त्या शेतकऱ्यांना पुढच्या काळात तुम्ही उत्पन्नाचे काय साधन देणार आहात? आता सोयाबिन पिकाची फुले अपेक्षित होती, शेंगा लागणार होत्या, सततच्या पावसामुळे त्या उत्पादनावर देखील परिणाम झाला. तेथे अक्षरश: खुरटी रोपे राहिलेली आहेत. तिच गोष्ट कापूस पिकाच्या बाबतीत घडलेली आहे.

मागच्या काळात आपण शेतकऱ्यांना विहिरी पाडून दिल्या. त्या विहिरींमध्ये गाळ साठला. तो गाळ काढण्याकरिता इजीएसची, मनरेगाची मदत घेता येईल का, याबाबत देखील सरकारने विचार केला पाहिजे. काहींनी आरसीसीमध्ये विहिरी बांधलेल्या होत्या. पाण्याचा जोर एवढा मोठा होता की, त्या सर्व वाहून गेल्या. ते शेतकरी आता आपले कसे होणार या विवंचनेमध्ये आहेत. शेतकऱ्यांचे या नैसर्गिक संकटामध्ये नुकसान झालेले आहे. मला मुख्यमंत्री महोदयांना विनंतीपूर्वक सांगावयाचे आहे की, मनरेगामधून विशेष बाब म्हणून त्यांच्या विहिरींच्या दुरुस्तीबाबतचा निर्णय आपण घेतला पाहिजे. त्यांच्या खचलेल्या विहिरी पुन्हा दुरुस्त करुन दिल्या पाहिजेत. गाळ काढण्याकरिता त्यांना मदत केली गेली पाहिजे. त्यांचे ड्रिप व स्प्रिंकलर देखील वाहून गेले.

कृषी विभागाच्या धोरणानुसार ड्रीप व स्प्रिंकलर शेतकरी लाभार्थ्याला पुन्हा पाच वर्ष लाभ देण्यात येत नाही. ते पाच वर्षाच्या आत वाहून गेले तर त्यात त्याचा काही दोष नाही. म्हणून पाच वर्षाच्या आत ज्याचा उक्त सेट वाहून गेला त्यांच्यासाठी धोरणातील अट बदलावी लागेल. विदर्भ व मराठवाड्यामध्ये लॅण्ड होल्डींग मोठ्या प्रमाणात असल्याने नुकसान भरपाईसाठी २ हेक्टर वरुन ३ हेक्टर केली आहे व आता ती ४ हेक्टरपर्यंत वाढविली तर शेतकऱ्यांना मदत होईल.

सदरहू भागामध्ये अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात पाणी आल्याने लोकांनी जीव वाचविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांचे गोठे किंवा घरासमोरील बैल, गाय, म्हैस, शेळ्या, करडं, मेंढरे असे पाळीव प्राणी वाहून गेले. एनडीआरएफच्या तरतुदीमध्ये पाळीव प्राणी वाहून गेल्यास त्यांना शोधून त्यांचे शवविच्छेदन करण्याची तरतूद आहे. अशा प्रकारचे पाळीव प्राणी ५० कि.मी.अंतरापर्यंत वाहून गेल्यास त्यांचा शोध घेणे कठीण होते. सदरहू शेतकऱ्याकडे पाळीव जनावरे होती किंवा नाही याबाबत गावाचे सरपंच, ग्रामसेवक, कृषी विस्तार अधिकारी किंवा तलाठी यांना विचारणा करण्यात यावी. त्यांना शेतकरी खोटे सांगणार नाही व ते असे काही करीत नाहीत. पशुसंवर्धन विभागाने मागील वेळी पशुधनाचा सर्व्हे केला होता. नुकसान भरपाई देण्यासाठी त्याचाही आपण वापर केला पाहिजे. तसेच जनावरांचे शवविच्छेदन या ऐवजी पोलीस पाटील, सरपंच, स्थानिक शासकीय अधिकारी यांचा दाखला ग्राह्य धरावा.

अतिवृष्टीमुळे ग्रामीण, जिल्हा मार्ग तसेच त्यावरील पूल वाहून गेले. पाणंद रस्त्यांची त्रेधा तिरपीट उडाली आहे. यासंदर्भात काही तरी वेगळा निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. सरकारने २५ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या दिल्या आहेत. त्या मी बारकाईने पाहिल्या आहेत. त्यामध्ये मदत व पुनर्वसन विभागास मोठी रक्कम दिल्याचे दिसत नाही. एनडीआरएफची रक्कम केंद्र सरकारकडून मिळेल. त्यांची टीम सरकारने सांगितल्यानंतर राज्यात नुकसानग्रस्त भागाची पाहणी

करण्यासाठी २-३ दिवस आली होती. त्यांचा अहवाल प्राप्त होईल. त्यांची मदत कदाचित मिळेल. परंतु ग्रामीण व जिल्हा मार्ग वाहून, खरवडून गेले आहेत, खराब झाले आहेत. त्यांची तत्काळ दुरुस्ती करण्यात यावी.

पुरवणी मागण्यांमध्ये साधारणत: पन्नास कोटी रुपयांची विकास कामे शिंदे गटाच्या आमदार महोदयांच्या व भाजपच्या आमदार महोदयांच्या मतदारसंघासाठी देण्यात आले आहेत. भाजपच्या आमदार महोदयांनाही ५० कोटी रुपयांची कामे देण्यात आली आहेत. आपण विकास निधी देताना अशा पद्धतीने दुजाभाव करु नये. आपण मंत्रिमंडळामध्ये एकत्र असताना ज्या कामांना मंजुरी देण्यात आली होती त्यांना स्थगिती देणं बरं नव्हं, हे वागणं बरं नव्हं. कोणावर कधी

मदत करावी लागणार आहे.

अतिवृष्टीमुळे महावितरणच्या ट्रान्सफार्मरचे, खांबांचे व तारांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यासाठी ब्लॅक कॉटन सॉईल आहे. त्या भागातील खांब पुन्हा उभे करण्यासाठी ज्या भागातील गँगला काम नाही त्यांना नुकसानग्रस्त भागात पाठवावे लागेल. मागील वेळी कोकणात नुकसान झाले त्यावेळी सातारा, बारामती, पुणे परिमंडळातील गँग दुरुस्तीच्या कामासाठी कोकणामध्ये पाठविल्या होत्या. अशीच पद्धत आता विदर्भ व मराठवाड्यासाठी वापरावी, अशी माझी मागणी आहे. शेतकऱ्यांनी पीक कर्ज काढून पीक घेतले होते. परंतु अतिवृष्टीमुळे त्यांचे पीक वाहून गेले आहे. नैसर्गिक संकटाने त्यांचे नुकसान झाल्याने त्यांचाही सहानुभूतीने विचार




कोणता काळ, प्रसंग येईल सांगता येत नाही. सगळे दिवस सारखे नसतात. आपल्याला केव्हा पुन्हा एकत्र यावे लागेल, हे सांगता येत नाही. त्यामुळे आपण असे करु नये.

सरकारने ज्या कामांना स्थगिती दिली आहे त्यात त्या भागातील लोकप्रतिनिधी यांची काही चूक नाही. अतिवृष्टीने नुकसान झाले त्यावेळी भाजप, शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस असा भेदभाव झाला नाही. ज्यांचे नुकसान झाले त्यात त्या भागातील लोकांचा काही दोष नाही. ग्रामीण, जिल्हा मार्ग व पाणंद रस्त्यांसाठी लवचिक धोरण अवलंबून चांगल्या प्रकारे

करुन त्यांचे पीक कर्ज माफ करावे. अतिवृष्टीने घरांचे अंशत: व पूर्णत: नुकसान झालेल्या लोकांना पंचनामा करुन मदत देण्यात येते व ती द्यावीच लागते. परंतु काही मातीच्या घरांमध्ये तात्पुरत्या स्वरुपात पाणी जाऊन त्यांच्या भिंती ओलसर झाल्या आहेत. त्यांचा पंचनामा करता येणार नाही, असे नुकसानग्रस्त भागातील घरांचा पंचनामा करणाऱ्यांनी लोकांनी सांगितल्याचे त्यांनी आम्हाला सांगितले आहे. सभागृहातील काही सन्माननीय सदस्यांना माहिती आहे की, मातीच्या घरांचा ओलावा कमी झाल्यानंतर काही कालावधीनंतर ते पडतात.

आम्ही अनेक भागातील लोकांच्या घरांची पाहणी केली आहे. अशा मातीच्या घरांचा पंचनामा करण्याच्या सूचना मुख्यमंत्री महोदयांनी द्याव्यात, अशी माझी मागणी आहे.

अतिवृष्टीमुळे शासकीय शाळेच्या इमारतींचे नुकसान झाले आहे. काही भागात अद्यापही पंचनाम्यांच्या संदर्भातील परिस्थिती बिकट आहे. कारण त्या भागात गुडघ्या इतक्या किंवा कमरे इतक्या उंचीपर्यंत पाणी असल्याने पंचनामा करण्यासाठी जाता येत नाही. भंडारा, गोंदिया, गडचिरोली भागात अशी परिस्थिती अजूनही आहे. याबाबत सरकारने विचार करावा व शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार उभे आहे, हे कृतीतून दाखविण्यात यावे, अशी माझी आग्रही मागणी आहे.

मागील काळात तत्कालीन मुख्यमंत्री श्री.उद्धव ठाकरे, तत्कालीन माननीय मंत्री श्री.अशोक चव्हाण व



मी माननीय प्रधान मंत्री यांना भेटण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी एसडीआरएफ व एनडीआरएफचे निकष बदलण्यात यावे, अशी विनंती केली होती. ती बाब त्यांनी अतिशय सकारात्मकतेने घेऊन ते बदलण्यात येतील, असे सांगितले. कारण केंद्र सरकारने दिनांक ८ एप्रिल, २०१५ ते सन २०२० या काळासाठी राज्य आपत्ती निकषाचे दर ठरविले होते. आता सन २०२२ सुरु आहे. आता सदरहू निकषांचा कालावधी संपल्याने त्यामध्ये बदल करावा लागणार आहे. याप्रकरणी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे पाठपुरावा करुन नवीन दर निश्चित करावेत. आपले राज्य सरकार हे केंद्र सरकारच्या विचाराचे असल्याने आपली मागणी स्वीकारण्यास काही अडचण येणार नाही, असे आम्हाला वाटते.

अतिवृष्टीच्या काळात गोगलगाईमुळे खूप नुकसान झाले. विशेषत: मराठवाड्यातील उस्मानाबाद, बीड, लातूर या जिल्ह्यात गोगलगाईने सोयाबीन पिकाचा फडशा पाडला आहे. त्यामुळे शेतकरी अक्षरश: हवालदिल झाले आहेत. या भागात पाऊस उशिरा आला परंतु तो दमदार आला. शेतकऱ्यांनी मेहनतीने पेरणी केली होती व मोठ्या प्रमाणत पीक उगवले होते. त्यांचे गोगलगाईमुळे नुकसान झाले आहे. शंखी गोगलगाईमुळे नुकसान झाल्यास नुकसान भरपाई देण्याची तरतूद नाही. कृषी विभागाने क्रॉप सेफ औषधाच्या माध्यमातून कीड नियंत्रणाचा उपाय सूचविलेला आहे. परंतु तो समाधानकारक नाही. मला एक महत्त्वाची बाब लक्षात आणून द्यायची आहे. २०१७ मध्ये कापसावर बोंडअळीचा प्रादुर्भाव होऊन शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले होते. त्यावेळेसच्या सरकारने बोंडअळीचा समावेश पिकांवर होणारे किड हल्ले या प्रकरणात करून शेतकऱ्यांना मदत केली. तसेच आता गोगलगायमुळे पिकांचे नुकसान होत असल्यामुळे या पेस्टअॅटॅकचा समावेश नैसर्गिक आपत्तीने होणारे नुकसान यामध्ये करण्यात यावा आणि शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देऊन न्याय द्यावा, अशी माझी आग्रहाची मागणी आहे.

मी मराठवाड्यातील नांदेड व हिंगोली या परिसरात असताना एका विधवा भगिनीने मला भेटून माहिती दिली. आदल्या दिवशीच विजय पुंजाराम शेळके या तिच्या पतीने आत्महत्या केल्याचे तिने सांगितले. पावसाने होत्याचे नव्हते केले, शासकीय अधिकारी बोलायला तयार नाही. अक्षरश: ती खूप त्रासून गेली होती. पावसाने तिचे घर पडल्यामुळे ताडपत्री लावून दिवस काढत असल्याचे तिने सांगितले. "सर्पाला पाय आणि वाघाला गळा" देऊन जिवन जगणे

चालू असल्याचे त्या भगिनीने सांगितले. तिची व्यथा डोळ्यात अंजन घालण्यासारखी वाटते. मी टीका करीत नाही, परंतु या सरकारबद्दल सामान्य जनता अशा पद्धतीने बोलत आहे. माझी अशी सूचना आहे की, तातडीने त्यांना मदत मिळाली पाहिजे. अवकाळी पावसामुळे, अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत देऊन सरकार तुमच्या पाठिशी आहे, असा त्यांना विश्वास दिला पाहिजे.

तुम्ही पत्रकार परिषदा घेऊन माहिती देता. परंतु एक बाब अतिशय लाजिरवाणी घडली. महाराष्ट्राचा दौरा मुख्यमंत्री महोदयांना महत्त्वाचा वाटला त्याबद्दल काही दुमत नाही. परंतु या दौऱ्यामध्ये तुम्ही व तुमचे काही मंत्री जात असताना त्यांना क्रेनने मोठमोठे हार घालण्यात येत होते. तिथे माणसे मरतात, काही शेतकरी आत्महत्या करत आहेत आणि आपण काय करीत होता ? सध्या राज्याची परिस्थिती बिकट असून कोणीही अशा प्रकारचे सत्कार स्वीकारू नये, असा तुम्ही आदेश काढायला पाहिजे होता. राज्यातील शेतकऱ्यांवर संकट येते त्यावेळी सरकारने शेतकऱ्यांना धीर देण्याचे काम करायचे असते, सरकारने शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहायचे असते. सरकारने माझ्या अन्नदात्याच्या मनामध्ये, माझ्या बळीराज्याच्या मनामध्ये विश्वास निर्माण करायचा असतो. त्यातून शेतकऱ्यांना मोठे बळ मिळते, हे आपण विसरायला नको. मी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य सर्वश्री. अशोकराव चव्हाण, दिलीपराव वळसेपाटील, छगनराव भुजबळ यांना सांगू इच्छितो की, आपल्याला आठवत असेल २००३ च्या दुष्काळामध्ये आपल्या राज्यात पावसाचे प्रमाण अत्यल्प होते. पाऊस पडत नव्हता. तेव्हा काही जणांनी सांगितले होते की, दुबई सारखा कृत्रिम पाऊस पाडला तरी त्याचा काही फायदा होणार नाही. जगात दुबई व इतर देशात कृत्रिम पाऊस पाडला जातो. परंतु कृत्रिम पाऊस पाडून शेतकऱ्यांना दिलासा मिळत असेल तर आपण ते धाडस करू असे श्री. सुशिलकुमार शिंदे हे मुख्यमंत्री असताना आम्ही ठरविले आणि त्याकरिता १६ कोटी रूपये खर्च केले. काही भागात कृत्रिम पाऊस पडला.... (अडथळा)....एक मिनिट ऐका..मी माननीय मंत्री श्री. शंभुराज देसाई यांना सांगू इच्छितो की, आपण एकत्र काम केलेले आहे. सभागृहामध्ये भाषण सुरू असताना खाली बसून मध्ये बोलायचे नसते. ठीक आहे. या वर्षी पाऊस चांगला झाला. कोरडा दुष्काळ नाही, पण ओला दुष्काळ पडलेला आहे. तुम्ही कसे सांगता पाऊस चांगला झाला ? ओला दुष्काळ आहे हा. मी उदाहरण देत होतो. तुम्हालाही माहीत आहे तुमच्याच मतदार संघामध्ये विंडमील उभ्या केल्या. त्यावेळी काही लोक म्हणाले की, याची पाती मोठी आहेत आणि म्हणून ढगे आडली आहेत. असे सांगितले होते की, नाही ? काही जण पाती तोडायला निघाले होते की, नाही ? लोकांच्या मनामध्ये कधीकधी अशा प्रकारच्या शंका येतात, परंतु आपण समजून घ्यायचे असते. त्यामुळे आम्ही म्हणतो की, दुष्काळाच्या काळात कृत्रिम पाऊस पाडण्याचा प्रयत्न करून शेतकऱ्यांना आधार देण्याचा प्रयत्न झाला.

सध्याच्या घडीला शेतकऱ्यांवर येत असलेल्या प्रसंगामुळे तो आत्महत्या करीत आहे. मुख्यमंत्री महोदय तुमच्या मंत्रिमंडळातील काही मंत्री क्रेनद्वारे मोठमोठे हार गळ्यात घालून सत्कार स्विकारीत आहेत, फोटो सेशन करीत आहेत. हे बरोबर नाही. अजूनही पाऊस चालू असून शेतकरी आजही अडचणीत आहे. मी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. हरिभाऊ बागडे यांना सांगू इच्छितो की, आपल्यालाही हे मान्य करावे लागेल. ही सत्य परिस्थिती आहे. तुम्ही का बसून बोलत आहे ? तुमचे डोक्यावरील सर्व केस गेले..माझे देखील आता जायला लागले आहेत.

मला या निमित्ताने सभागृहाला सांगायचे आहे की, दररोज ३ शेतकरी आत्महत्या करीत आहेत. मी मुख्यमंत्री महोदयांनी शपथ घेतल्यापासून म्हणत नाही. कोणीही असते तर कदाचित घडले असते. परंतु आपण शपथ घेतलेल्या तारखेपासून आजपर्यंतच्या ४५ दिवसांच्या कालावधीत १३७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्या विधवा भगिनीने काय करायचे ? त्यांच्या मुलाबाळांनी काय करायचे ? त्यांना का आधार वाटत नाही ? आम्हाला सरकार उघड्यावर पडू देणार नाही, हे सरकार आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे सरकार आहे, असे माननीय मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी शपथ घेतल्यानंतर लोकांना का वाटत नाही ?

उस्मानाबाद तालुक्यातील बिजनवाडी येथील स्व. लक्ष्मण भगवान निकम या शेतकऱ्याने दिनांक १९ जुलै, २०२२ रोजी संध्याकाळी ६.०० वाजता घरासमोरील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या करून जिवनयात्रा संपविली. १५ दिवसांपासून पडत असलेला सततचा पाऊस, पेरलेले सोयाबीन उगवलेच नाही, अत्यल्प अशी दीड एकर जमीन, इतरवेळी दुसऱ्याच्या घरी जाऊन शेतमजुरी करणारा मी आता काय करणार हा विचार करून त्याने आत्महत्या केली. आजपर्यंत अशी १३७ प्रकरण घडलेली आहेत.

मी सकाळीच स्थगन प्रस्तावावर बोलत असताना मुख्यमंत्री महोदयांना सांगितले. त्यावेळी आपण सांगितले की, मी त्यातून काही ना काहीतरी मार्ग काढतो. त्याच प्रमाणे शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करण्याकरिता ठोस । भूमिका घेऊन योग्य उपाययोजना करावी. माननीय मंत्री श्री. अब्दुल सत्तार यांना आता कृषी खाते मिळाले आहे. तुमच्याकडून प्रचंड अपेक्षा आहेत. तुम्ही एकदा देशाचे

माननीय माजी कृषी मंत्री तथा खासदार श्री. शरदचंद्र पवार साहेबांना भेटावे. त्यांच्या अनुभवाचा लाभ घ्यावा. त्यामध्ये कमीपणा वाटू देऊ नये. त्यांनी १० वर्षामध्ये केंद्रात कृषी मंत्री असताना देशाला अन्नधान्यामध्ये स्वयंपूर्ण केले असून हे आपण पाहिले आहे. त्यांच्याकडे अनुभव आहे, त्यांनी आपल्यापेक्षा निश्चित काही उन्हाळे-पावसाळे जास्त पाहिले आहेत. त्यांना महाराष्ट्र बारकाईने माहीत आहे. इतरही काही नेते असतील त्यांना भेटावे. मी साहेबांनाच भेटावे असे म्हणत नसून या क्षेत्रातील मान्यवरांना भेटून त्यांच्याकडून काही चांगले घेण्याचा प्रयत्न करा. तसेच धोरण राबवित असताना बळीराजाला, शेतकऱ्यांना विश्वास आला पाहिजे की, खरोखर हे सरकार आमच्यासोबत आहे. शेतकऱ्यांनी आत्महत्येचा विचारही मनात आणता कामा नये, अशा पद्धतीचे वातावरण तुम्हाला कृतीतून सिद्ध करावे लागेल. त्याकरिता कर्ज काढा, केंद्रातून मदत घ्या, वित्त मंत्र्यांना भेटा.

काहीही करुन ऑगस्ट महिन्याच्या शेवटपर्यंत किंवा सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीला एक तारीख देऊन मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील मंत्री समितीची बैठक घ्यावी. त्यामध्ये माननीय सहकार मंत्री असतात. या समितीची बैठक लवकरात लवकर घ्यावी. माननीय मंत्री सर्वश्री शंभूराज देसाई, राधाकृष्ण विखे-पाटील यांचेही साखर कारखाने आहेत. साखर कारखान्यांची माहिती असलेले दोन मंत्री या सरकारमध्ये आहेत. पूर्वीच्या सरकारमध्ये ही संख्या अधिक होती. म्हणून मी सांगू इच्छितो की, या मंत्री समितीची लवकर बैठक घेऊन दिनांक १ ऑक्टोबरपासून साखर कारखाने सुरु करण्यात येतील असे जाहीर करावे. असे केले तरच यावर्षी ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा ऊस जाईल. मागील वर्षी दिनांक १ नोव्हेंबर रोजी कारखाने सुरु झाले होते. सन्माननीय सदस्य श्री. राजेश टोपे यांच्या कारखान्याचा ऊस शेवटपर्यंत संपला नव्हता. मागील वर्षीपेक्षा यावर्षी ऊसाची लागवड मोठ्या प्रमाणात आहे. याबाबत नोंद घेऊन आदेश निर्गमित करावेत. तसेच यासंदर्भात बैठक आयोजित करावी.



पुरग्रस्त भागामध्ये ओला दुष्काळा जाहीर करावा. ओला दुष्काळा जाहीर केल्यामुळे शेतकऱ्यांना मदत होते. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क यामुळे माफ होईल. ज्या भागामध्ये अतिवृष्टीमुळे जमिनी खरडून गेल्या आहेत, पिके वाहून गेली आहेत, काही ठिकाणी पिके सडून गेली आहेत, अशा ठिकाणच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करावे. काही भागामध्ये सातत्याने पाऊस पडत असल्यामुळे शेतकरी, शेतमजुरांना एक रकमी मदत करावी. कोरोना काळात सरकारने पॅकेज दिले होते. त्यावेळेस शेतकऱ्यांना, शेतमजुरांना घराबाहेर पडता येत नसल्यामुळे गहू, तांदूळ दिले होते. सन्माननीय सदस्य श्री. छगन भुजबळ यांनी शिवभोजन थाळी देण्याचा प्रयत्न केला होता. सध्या अतिवृष्टीमुळे शेतमजुरांना काम नाही. त्यामुळे ते मोठ्या विवंचनेमध्ये आहेत. आदिवासी क्षेत्रामध्ये पूर्वी खावटी कर्ज दिले जात असे. परंतु आता खावटी अनुदान देण्यात येते. मागील वेळेस जे खावटी अनुदान दिले त्याचा उपयोग झाला नाही. ते अनुदान हे पैशांच्या स्वरुपामध्ये द्यावे, अशी मी विनंती करतो. मागील काळात जे दिले होते त्याचा उपयोग झाला नाही. आपणच ते केल्यामुळे झाकली मूठ सव्वालाखाची, असे म्हणावे लागेल. म्हणून मी सांगू इच्छितो की, खावटी अनुदानातून पैसे दिले जावेत. आदिवासी समाजातील मजूर, महिला यांना आज खावटी अनुदानाची आवश्यकता आहे. यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद आहे. माननीय आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित हे सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. त्यांनाही मी ही बाब सांगितली असती. याबाबत राज्य सरकारने निर्णय घेतला पाहिजे.

एसडीआरएफचे निकष बदलण्यासंदर्भात मी सांगितले होते. जुलै महिन्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्यामुळे मजुरांना काम मिळाले नाही. त्यांचाही विचार केला पाहिजे. सरकार अंशत: किंवा बाधित झालेल्या घरांना नुकसानभरपाई देत असते. त्या निकषामध्ये काही प्रमाणात बदल करावे लागतील. ज्या घरांना ओलावा आहे, त्यांचाही यात समावेश केला पाहिजे. नादुरुस्त रस्ते, नादुरुस्त वीज वाहिन्या, ट्रान्सफॉर्मर यांची तातडीने दुरुस्ती केली पाहिजे. शेतकऱ्यांना

वाऱ्यावर सोडले जाणार नाही, अशा प्रकारच्या घोषणा वारंवार केल्या जात आहेत. परंतु मदतीचा हात आखडता घेतला जात आहे. असे करु नये. राज्य सरकारने भरीव मदत केली पाहिजे. ज्यावेळेस ऊसासंदर्भातील बैठक आयोजित केली जाईल तेव्हा कोजनचा एक विषय मी मांडेल. याबाबत आताच माहिती देऊन मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. अलमट्टी धरण, मेडीगट्टा यासोबतच जी शहरे पाण्यात जातात त्यांचाही विचार मुख्यमंत्री महोदयांनी केला पाहिजे. मध्यंतरीच्या काळात आम्ही माननीय उप मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांना भेटलो होतो. त्यांनी आम्हाला सांगितले की, हे ४० आमदार कोठेच जाणार नाहीत. त्यांचीच कामे मुख्यमंत्री महोदय करणार आहेत. विरोधी पक्षाचे एक दिवसतरी मुख्यमंत्री महोदयांना ऐकू द्यावे. या नवीन ४० लोकांसाठी एक वेगळे कार्यालय उघडले आहे. त्यामुळे त्यांनी काळजी करु नये. या ४० लोकांनाच जास्त सांभाळावयाचे आहे. उर्वरित लोकही आहेत.





मुख्यमंत्री महोदयांच्या उत्तराकडे राज्यातील जनता अपेक्षेने पाहत आहे. मुख्यमंत्री महोदयांनी आता हयगय करु नये. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. छगन भुजबळ यांनी पांढरी दाढी, काळी दाढी याबाबत सांगितले. याबाबत मी अधिक काही बोलणार नाही. परंतु राज्यातील शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे. शेतकरी मोठ्या अपेक्षेने राज्य सरकारकडे पाहत आहे. शेतकऱ्यांना मदत केली नाही तर तो मोठ्या प्रमाणात आत्महत्या करेल, ही आपणास शोभणारी बाब नाही. आपण सर्वजण जनतेचे प्रतिनिधीत्व करीत आहोत. आपल्या कार्यकाळामध्ये शेतकरी आत्महत्या करीत असतील तर ती आपणा सर्वांसाठी अतिशय लाजिरवाणी बाब आहे. या सर्व बाबींचा आपण योग्यप्रकारे विचार केला पाहिजे. राज्यातील जनता, शेतकरी यांना विश्वास दिला पाहिजे की, हे राज्य सरकार निष्क्रिय नाही. हे सरकार खऱ्या अर्थाने सर्वाबाबत विचार करीत आहे आणि कोणत्याही परिस्थितीत निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशा प्रकारचे वातावरण नजीकच्या काळात निर्माण करावे लागेल. मी ज्या अपेक्षा याठिकाणी व्यक्त केल्या आहेत त्यांची पूर्तता राज्य सरकारने केली पाहिजे. ही बाब मुख्यमंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणातून सांगितली पाहिजे. या मागण्या मान्य केल्याशिवाय विरोधी पक्ष स्वस्थ बसणार नाही. ही आमची आग्रही भूमिका आहे.

मी एक बाब मुख्यमंत्री महोदयांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो. मध्यंतरी काही साखर कारखाने आणि काही सहकारी संस्थांच्या निवडणुका सुरु होत्या. ही बाब माननीय मंत्री श्री. शंभूराज देसाई यांनाही माहिती आहे. काही ठिकाणी निवडणुका झाल्या आहेत. सर्वकाही झालेले आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनीही मान्य केले आहे. याबाबतची नस्ती मुख्यमंत्री महोदयांच्या कार्यालयात आहे. त्यावर त्यांनी स्वाक्षरी केली तर त्या निवडणुका होतील. कारण या निवडणुकांची प्रोसिजर यापूर्वीच सुरु झाली आहे. काही ठिकाणी लोकांनी मतदानही केले आहे. काही ठिकाणी केवळ मतमोजणी करणे शिल्लक आहे. यात अनेक गोष्टी आहेत. याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या कार्यालयात विचारणा करावी. त्या नस्तीवर मुख्यमंत्री महोदयांनी स्वाक्षरी केली तर सहकारी संस्थांचे काम होईल. याबाबत त्यांनी सकारात्मक विचार करावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आपण मला या प्रस्तावावर बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो. धन्यवाद !

# राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे विधानसभेतील भाषण

याठिकाणी काही विषय मांडत असताना आपल्या सर्वांना यासाठी निदर्शनास आणून देऊ इच्छितोय, की हे सरकार झालेलं आहे, हे सरकार होत असताना अनेक प्रश्न तयार झाले. सुप्रीम कोर्टात आता केस गेलेली आहे. काय होईल ते होईल. दहाव्या शेड्युलप्रमाणे, पण अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्र्यांनी इथं त्यादिवशी भाषणात सांगितलं, पहिल्यावेळी भाषण केलं त्यावेळी, की मोका लागला आणि मोका लागला तर मी कसा फोन करीन असं काहीतरी, पण मी काय त्याच्यावर फारसं बोलत नाही. पण, अध्यक्ष महोदय, आपण मुख्यमंत्री म्हणून निर्णय घेत असताना देवेंद्र फडणवीस साहेबांना विश्वासात घेऊन निर्णय घ्यावेत. अशी आमची अपेक्षा आहे आणि मला वाटतं, की तसं तुम्ही घेत असाल. पण बरेचसे निर्णय त्यांना माहित नाहीत असंच दिसतंय बऱ्याचवेळी. म्हणजे तुम्ही तुमचं हे दाखवायला लागलेला आहात. कणखरपणा दाखवायला लागलेला आहात. ते गृहमंत्री असले, तरी महाराष्ट्रातल्या मुख्यमंत्र्याचा फोन गेला तर गृहमंत्र्याचं थोडंच कोण ऐकतं. दिलीप वळसे पाटील साहेबांना विचारा. मुख्यमंत्र्यांनी जर एखाद्या पोलिस स्टेशनला, एखाद्या आयपीएसला फोन केला, की नाही हे असं असं करा, तर कितीही गृहमंत्र्यांनी सांगितलं तरी मुख्यमंत्र्यांचच ऐकलं जातं.

त्यामुळं मुख्यमंत्र्यांनी गृहखात्याच्या कोणत्याही अधिकाऱ्याला फोन केला, पोलिस दल फार हुशार असतं. ज्याची सत्ता आहे, जो एक नंबरला आहे, त्याच्या नजरेवर पोलिस खातं काम करतं. उपमुख्यमंत्र्यांच्या नाही. पण महाराष्ट्रातली लॉ अँड ऑर्डर सिच्युएशन ही कायम ठेवण्याचा प्रयत्न, सक्षम ठेवण्याचा प्रयत्न आपलं सरकार करेल या अपेक्षेनं हा आजचा प्रस्ताव आम्ही आणलाय. आमचे बच्चू कडू कुठे गेले? आता अडीच वर्षे तुमच्या सह्यावरच ते दिवस काढतील बहुतेक. त्यांना काय स्कोप नाही. अपक्षांना कुठल्याही स्कोप नाही हा एक चांगला कार्यक्रम तुमचा आहे हां. अपक्ष, छोटे पक्ष नो एन्ट्री. कारण तुमची संख्याच तेवढी झालेली आहे. हां दिलेला शब्द तुम्ही पाळणार आहात, पण कधी पाळणार याच्याविषयी विषय नाहीये. तुम्ही २०२४नंतरही पाळाल. काही अडचण नाही आमची. पण बच्चू कडू माझे राज्यमंत्री होते. मला त्यांची फार काळजी. आता त्या बच्चू कडूंच्यावर अन्याय होणार नाही यासाठी तुमचा वेळ, अलिकडे तुम्ही एवढे घेरलेले आहात, त्यामुळं त्यांना तुम्ही आता कॅबिनेट करा आणि तुम्ही जे राज्यमंत्री कराल त्यांना ते किती अधिकार

## नव्या सरकारने कायदा-सुव्यवस्थेकडे लक्ष द्यावे

**राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची मागणी**



देतात याचा अभ्यास तुम्हाला करता येईल भविष्यात.

आपण महाराष्ट्रातल्या जनतेसमोर हे सरकार स्थापन करताना शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस ही अनैसर्गिक युती होती असं सतत सांगता. आपण ज्यावेळी आमच्याबरोबर सरकारमध्ये होता, त्यावेळी असा कधी शब्द नाही काढला. ज्यावेळी आम्ही तिन्ही पक्ष एकत्रित आलो, म्हणजे भारतीय जनता पक्ष सोडून कुणीही देशात एकत्रित आलं की त्यांची अनैसर्गिक युती. भारतीय जनता पक्षाबरोबर ज्यांनी युती केली, ती नैसर्गिक युती. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस प्रतिभाताई पाटील यांच्यावेळी, बाळासाहेब ठाकरे यांनी त्यावेळी दिलदारपणानं मराठी माणूस राष्ट्रपती पदावर बसतोय म्हटल्यावर बाळासाहेब ठाकरेंनी स्वत: घोषित केलं, प्रणव





**राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात २४ ऑगस्ट रोजी सभागृहातील अंतिम आठवडा प्रस्तावावर तुफान भाषण करून सत्ताधाऱ्यांवर शब्दांचे फटकारे, टोले हाणले आणि शालजोडीतून जोरदार प्रहार केला. त्यांचे हे भाषण....**

मुखर्जींच्यावेळी पण तीच भूमिका घेतली. त्यामुळं शिवसेनेचा रोल हा राष्ट्रवादी आणि काँग्रेसला विरोध करण्याच्यापेक्षा हिंदुत्वाबद्दल त्यांचा वेगळा आग्रह होता, त्याबद्दल आजही त्यांचा आग्रह आहे, की त्याबद्दल काय बोलत नाही.

पण, आम्ही तिन्ही पक्ष एकत्रित आलो आणि अनेकवेळा निवडणुका झाल्यानंतर देखील युत्या होतात. निवडणुका झाल्यानंतर जी युती झाली ती अनैसर्गिक. स्वर्गिय बाळासाहेब ठाकरे यांच्या घरात जाऊन तुमच्या प्रमुख नेत्यानं जी आश्वासनं दिली त्याची पूर्तता झाली नाही. त्यामुळं शिवसेनेनं वेगळी भूमिका घेतली. अध्यक्ष महोदय, गोरे मला विचारतायंत, की मी त्या बैठकीत होतो का. पण ते गोरे माझ्या बैठकीत त्यावेळी होते हे राहिलं बाजूला. अध्यक्ष महोदय, माझ्या बैठकीत म्हणजे काँग्रेसच्या आणि काँग्रेस आणि आमची बैठक एकच आहे.

अध्यक्ष महोदय, आपल्याला यानिमित्तानं या सरकारचं वर्णन एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस या दोघांचं सरकार स्थापन झालं. पण अध्यक्ष महोदय, माझ्याकडे एकदा एकनाथ



शिंदे साहेबांची एक क्लिप आली होती. त्यात ते भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेचं सरकार असताना त्यांनी एका स्टेजवर भाषण केलं चिडून, की महाराष्ट्रातल्या शिवसैनिकांच्यावर भारतीय जनता पक्षाकडून जो अन्याय या सरकारमध्ये चाललेला आहे, तो मला सहन होत नाही आणि उद्वेगानी त्यांनी आपल्या हाताने नेऊन उद्धवजींच्या हातात राजीनामा दिला. ही क्लिप मी बघितली. अध्यक्ष महोदय, शिवसैनिकांच्यावरचा अन्याय आणि वेदना या त्यावेळी तुम्हाला सहन झाल्या नाहीत. पण स्वर्गिय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा चिरंजीव उद्धवजी ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदावरून खाली खेचताना महाराष्ट्रातल्या शिवसैनिकांना जास्त वेदना झाल्या, त्या पाहून आज तुम्हाला कसं वाटतंय. किती वेदना झाल्या महाराष्ट्रातल्या शिवसैनिकांना. मला वाटलं शपथ घेतल्यावर सीएम साहेब पहिल्यांदा जातील, बाळासाहेब ठाकरे यांच्या समाधीचं दर्शन घेतील. नंतर गेले, बऱ्याच वेळांनी. काही दिवसांनी.

अध्यक्ष महोदय, आम्हाला सगळ्यांना अपेक्षा होती, की देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होतील. एवढं सगळं ते सूरत, अरे ती सूरत, शिवाजी महाराजांनी किती वेळा लुटली. सतरा वेळा सूरत छत्रपती शिवाजी महाराजांनी लुटली. त्या सुरतेला तुम्ही शरण व्हायला गेलात. स्वारी करायला नाही, लुटायला नाही. शरण व्हायला गेला. तुमची जी शरणागती सुरतेत झाली, त्यानं महाराष्ट्राची मान खाली गेली. तुम्ही सुरतेतून गुवाहाटीला गेला, आता मला सांगा, एवढी चांगली ठिकाणं, डोंगर, हाटील, कामाख्या देवीलाच नमस्कार करायला गेला होता तुम्ही. तुम्ही काय यांना डोंगर, झाडी दाखवायला नव्हता गेला. पण त्यांनी त्यातनंही डोंगर, झाडी, हाटील बघितलं. पण हा सगळा प्रवास जो आहे, हा प्रवास करून येताना आम्हाला वाटायचं, की देवेंद्रजी मुख्यमंत्री होतील. त्यामुळं अध्यक्ष महोदय, देवेंद्रजी फडणवीस आज गृहमंत्री झाले. म्हणून या प्रस्तावावरच बोलतोय मी. बाहेर बोलत नाही.

मुख्यमंत्री होणारा नेता आमचा, खरं तर माझी भारतीय जनता पक्षाबद्दल नाराजी आहे, महाराष्ट्राचा एक वाढणारा नेता, आम्ही बघत होतो, की ते काही दिवसांनी पंतप्रधान होण्याच्या शर्यतीत जातील पुढच्या चार, सहा आठ वर्षांनी. त्यांना सीएम इन वेटिंग केलं डायरेक्ट. म्हणजे ज्या नेत्याला पंतप्रधान होण्याचा योग भविष्यकाळात येऊ शकतो असं आम्ही

समजत होतो, त्या नेत्याला या महाराष्ट्राचं उपमुख्यमंत्री करून महाराष्ट्राच्या एका नेत्याचा अपमान भारतीय जनता पक्षानी केलेला आहे हे तुमच्या लक्षात कसं येत नाही. महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये आतापर्यंत ज्या वेगानं त्यांची प्रगती चाललेली आहे, आम्हाला असं वाटायचं, की पण अजितदादा हे महेश शिंदे माझ्या सहीच्या पत्राने विरोधी पक्ष नेते झाले. कारण गट नेत्याने पत्र द्यायचं असतं. आमच्यात काय प्रॉब्लेम नाही. पत्र दाबून ठेवायला लागतं का कधी. आपण लिहिलेलं पत्र आपणच दाबून ठेवायचं असतं का.

पण अध्यक्ष महोदय, महेश शिंदे काय म्हणतायंत, तर सही दिली का घेतली. गाडी पुन्हा मार्गावर आणतो. म्हणून सोडून देतो त्यांना. अध्यक्ष महोदय, देवेंद्र फडणवीस जे सांगतील, ते मोदी साहेब ऐकतात असं आमचा, आता आम्ही समज करून घेतो. कारण मधी पूर्ण खात्री होती.


पण अध्यक्ष महोदय, खातेवाटपात काय झालं. आमच्या चंद्रकांत दादांच्यावर किती अन्याय. उच्च व तंत्र शिक्षण खातं चंद्रकांतदादांना दिलं. एकच ध्रुवतारा तुमच्या मंत्रिमंडळामध्ये आहे. एकच ध्रुवतारा, तो म्हणजे गुलाबराव रघुनाथराव पाटील. पाणी पुरवठा व स्वच्छता खातं तुमचं बदलेलं नाही. कुणालाही बदलता आलेलं नाही. सगळ्यांचे बदलले. तुमचं नाही. आमचे शंभूराज देसाई, सारखी तुमची किती बाजू घेत होते. त्यांना एक्साईज डिपार्टमेंट दिलं. कसं काय चांगलं. एक्साईज खातं चांगलं आहे? अरे एखाद्या वाढणाऱ्या नेत्याला एक्साईज खातं म्हणजे, तुम्हाला ते चांगलंच वाटणार, कारण गणेश नाईकांच्याकडं ते खातं होतं. त्यामुळं तुम्हाला ते चांगलंच वाटणार. गणेश नाईकांच्याकडं ते खातं गेल्यामुळं मंदाताई, गणेश नाईकांच्याबद्दल आमच्या अत्यंत चांगल्या भावना आहेत. ताई बरोबर आहे की नाही. तुम्ही मला कितीतरी वेळा आजही तुमच्या भावना व्यक्त करता आणि आजही, मला सांगता, की वेळ आल्यानंतर बघा, की मी काय करते.

त्यामुळं अध्यक्ष महोदय, या प्रस्तावात महाराष्ट्राच्या नव्या सरकारने ज्या गोष्टी सरकार म्हणून करण्याची गरज आहे, त्या महाराष्ट्रातल्या या सगळ्या लॉ अँड ऑर्डरच्या व्यवस्था सुधारण्याचं काम या सरकारनं झपाट्यानं करावं. गृहखात्याविषयी अनेक सूचना होत्या. पण माननीय उपमुख्यमंत्री महोदय याठिकाणी नाहीयेत. त्यामुळं याठिकाणी मी पटलावर ठेवेन किंवा लिहून कळवतो. पण, अध्यक्ष



महोदय, मला याठिकाणी एवढंच सांगायचंय, की आपल्या सर्वांच्या प्रयत्नाने हे नवं सरकार आलंय, हे सरकार किती दिवस चालणार याविषयी आम्हाला काही मतलब नाही. जेवढे दिवस आपण सगळे चालवाल, तेवढे दिवस ते चालेल. आपल्यात मतभेद होणार नाहीत. तुमच्यात आणि देवेंद्रजींच्यात मतभेद होणार नाहीत. तुमच्या ४० जणांच्यात आणि उरलेल्या १०६ जणांच्यात मतभेद होणार नाहीत हे सगळं मान्य आहे.

मी आता शेवटचाच मुद्दा मांडतो, की एकनाथ शिंदे बाहेर निघून आले. एकनाथ शिंदे साहेब हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तिसऱ्या नंबरच्या, शेवटच्या रांगेत उभे राहिले. हा महाराष्ट्राचा अपमान आहे. हा महाराष्ट्राचा अपमान आपण सहन करता कामा नये. तुम्ही सहन करणार नाही, याची मला खात्री आहे. पण त्यादिवशी तुम्ही तिथून बाहेर यायला पाहिजे होतं. त्यात आणखी एक करेक्शन सांगतो. तुम्ही ज्यावेळी एकटे गेलात, त्यावेळी तिसऱ्या नंबरला होता. ज्यावेळी दोघे गेलात, त्यावेळी देवेंद्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री केलेत, नाराज




साहेब दिल्लीला गेले. औरंगजेबाच्या दरबारामध्ये छत्रपती शिवाजी महाराज दुसऱ्या रांगेत उभे राहिले, तर ते दरबार सोडून झालेत, त्यांना जरा प्रॉमिनन्स दिल्यासारखं, चुचकारण्यासाठी त्यांना पुढं आणून बसवण्यासाठी तुमच्याबरोबर त्यांना आणून

बसवलं. हा फरक आहे.

पण अध्यक्ष महोदय, चंद्रकांत पाटील हे भारतीय जनता पक्षाच्या कार्यकारिणीची जी काही बैठक होती, त्यावेळी म्हटले काय, तर आम्ही मनावर दगड ठेऊन एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री केलेलं आहे. भारतीय जनता पक्षाने मनावर दगड ठेऊन आमच्या एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री केलं असेल, तर मी मुख्यमंत्र्यांना सांगतो, इकडे या, मनावरचे दगड आणि अशी कुठलीही भानगड न ठेवता तुम्हाला या बाजूनंही मुख्यमंत्री होण्याची संधी या बाजूनं द्यायला मला वाटत नाही, की कुणी नकार देईल. तुमच्यातले सगळे गुण पाहता आम्ही तुम्हाला नक्कीच संधी देऊ.

त्यामुळं अध्यक्ष महोदय, मी माझा शेवटचा मुद्दा मांडतो आणि माझं भाषण पूर्ण करतो. हिंदुत्त्वासाठी आपण सरकार केलं असं म्हणता. पण हे हिंदुत्त्व, शिवसेना हिंदुत्त्व हा शब्द स्वर्गिय बाळासाहेब ठाकरे यांनी खरं म्हणजे पहिल्यांदा कॉईन केलं. त्यामुळं शिवसेनेपासून हे हिंदुत्त्व कधी लांब जाणार नाही. पण अध्यक्ष महोदय, बीड जिल्ह्यामध्ये हिंदु देव-देवतांच्या जमिनी लाटण्याचा एक सामूहिक कार्यक्रम चाललांय, तो रोखण्यासाठी काही केसेस झाल्यात. आणि अध्यक्ष महोदय, आपल्याकडून आज त्याचं इन्व्हिस्टिगेशन करणारा आयोग तुम्ही बदललेला आहे. हिंदु देव-देवतांचं जे, त्याठिकाणचं ट्रस्ट आहे, त्याच्या ताब्यात असणाऱ्या जमिनी लुटलेल्या आहेत. त्याची चौकशी आमच्या सरकारने चालू केली होती. जवळपास आता पूर्णत्वाला आलेलं, तिथला आयओ बदलण्याचं पाप हे राज्याच्या गृह विभागानं का केलं. काय गरज आहे. आता जवळपास तपास संपत आलांय. चार्जशीट फाईल होणार आहे किंवा त्याची पुढची पावलं पडणार आहेत. अशावेळी तो आयओ बदलण्याचं पाप केलंय, याचा अर्थ तुमच्या काळातल्या ज्या गोष्टी आहेत किंवा तुमचे जे सहकारी आहेत, त्यांना वाचवण्याचं काम आत्तापासून, म्हणजे डे वनपासून जर आपण सुरू केलं, तर अध्यक्ष महोदय, माझा प्रश्न आहे, की त्याठिकाणी आपण एक आयपीएस पंकज कुमार हे एसआयटी नेमलेली होती, त्याचं चांगलं काम करत होते, पण त्यांना बदलावं म्हणून प्रवीण दरेकर यांनी पत्र दिले आणि त्यांना लगेच बदलून, त्यांच्या जागी दुसऱ्या अधिकाऱ्याची नेमणूक १९ ऑगस्ट २०२२ला केली.

अध्यक्ष महोदय, हे प्रमाणिक अधिकारी हिंदु देव-देवतांच्या जमिनीच्या अपहाराची प्रामाणिक चौकशी करत असेल तर तुम्हाला त्याला बदलावेसे का वाटते. आणि म्हणून अध्यक्ष महोदय, माझी आपणाला विनंती आहे, आपण सगळ्यांनी, मागच्या आमच्या काळात ज्या चौकशा चालू आहेत, त्याचा आयओ बदलण्याचं काम करणं म्हणजे तुमचं इंटेशन कुठंतरी बिघडलेलं आहे असं वाटतं. आशिष जयस्वाल बिचारे, किती दिवस चांगला कोट शिवून फिरतायंत, ते कुठं जाऊन बसले. आमच्या चिमणआबांच्या शेजारी. तिकडे एक लाईनच तयार झालेली आहे, हे संजय शिरसाट आमचे इथेच बसलेले आहेत. ही लाईन आहे समदुःखी, एकच रांग करा अशी. आमचे शिवेंद्रबाबा भोसले, ते तर साताऱ्याचा पालकमंत्री होणार म्हणून आमच्यातून तिकडे गेलेत. तुम्ही तिकडे गेलेले आहात, पण कधीतरी इकडे येणार आहात. वातावरण महाराष्ट्राचे बदलेल, त्यावेळी तुम्ही इकडे येऊन बसाल, याच्यात काय शंका नाही. पण मी तुमच्या हिताचं सांगतोय. तुम्हाला सातारा जिल्ह्याचं पालकमंत्री त्यांनी करावं यासाठी तुमची शिफारस करतोय आणि माझं हे दोघं फार ऐकतात. तुम्हाला माहित नाही. सगळ्या सदस्यांना वाटत असेल, की आमचं नाव घेतलं, आमचं नाव कटेल आता, तर तसं नाहीये. उलट नोंद घेतलेली आहे त्यांनी आणि जो विस्तार आहे, कधी आहे विस्तार? त्या विस्तारामध्ये हे आमचे, एक सांगतो, असंतुष्ट आत्मे जेवढे जास्त वाढतात आसपास, तेवढी सत्तेला घरघर लागते. त्यामुळे सगळे हे जे असंतुष्ट आत्मे आहेत, त्यांनी त्याग केलांय, शिवसेना सोडली, हिंदुत्त्व शिवसेनेकडं राहिलं आणि तुमच्याबरोबर जे आलेत, त्या सगळ्यांना चाळीसच्या चाळीस जणांना मंत्री केलं तर तुमचं हे सरकार अडीच वर्षे काढेल. नाहीतर काही प्रश्न तयार होतील. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी हे सगळे सल्ले आहेत. हे सगळे आपापल्या मतदारसंघात जातात, काय परिस्थिती आहे बघा. आमचे आदित्य ठाकरेंचे दौरे बघा. आदित्य ठाकरेंचे दौरे एवढे लोकप्रिय झालेत, तिथले आमदार जरी बरोबर नसले तरी आदित्य ठाकरेंना तिथली लोकं त्याठिकाणी स्वागताला जमतायंत. ठीक आहे, तुमचा तो अंतर्गत प्रश्न आहे. तुम्ही आजही शिवसेना आहात. म्हणून मी तुमच्यात आणि त्यांच्यात वाद लावत नाहीये. त्यामुळं तुम्ही कधी एक व्हाल हे मला सांगता येत नाही. आणि ते देवेंद्रजींनाही कधी कळणार नाही. त्यामुळं आपल्या सगळ्यांना एवढीच विनंती करतो, की हा जो प्रस्ताव आहे, त्यातले जे मुद्दे आहेत, त्या सर्वांत सुधारणा करण्याचं काम राज्याचे उपमुख्यमंत्री करतील असा विश्वास बाळगतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.



# आंतरराष्ट्रीय राजकारण

जागतिक राजकारणाचे स्वरुप बदलतेच असते. काहीवेळेस हे बदल वेगाने घडताना दिसतात तर कधी त्याला संथगति प्राप्त होते. सध्या जागतिक राजकारणात संघर्षाचे वातावरण निर्माण झाले आहे. रशियाने युक्रेनवर थेट आक्रमण केले आहे आणि या दोन देशातील संघर्ष अद्याप थांबलेला नाही. रशिया व चीनने जागतिक राजकारणातील अमेरिकेच्या वर्चस्वाला राजकीय व आर्थिक अशा दोन्ही आघाड्यांवर आव्हान देण्याचे प्रयत्न चालविले आहेत. याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनीही या दोन देशांच्या विरोधात नवी फळी उभारण्याचे प्रयत्न चालविले आहेत. युक्रेन प्रकरणात त्यांनी रशियावर आर्थिक निर्बंध घातले आहेत. त्याचबरोबर चीनला आव्हान देताना त्यांनी तैवानची तळी उचलण्यास सक्रियतेने सुरुवात केलेली आहे. अमेरिकन संसदेच्या स्पीकर नॅन्सी पेलोसी यांनी चीनचा विरोध झुगारुन नुकतीच तैवानला भेट दिली. यामुळे अमेरिका-चीन संघर्षाचा एक नवा अध्याय सुरु होणार आहे. चीनच्या विरोधात अमेरिकेने ब्रिटन व ऑस्ट्रेलियासह 'ऑकस' या राष्ट्रगटाची स्थापना केलेलीच आहे. त्यामुळे पेलोसी यांच्या तैवानभेटीने अमेरिका विरुध्द चीन संघर्ष अधिक तीव्र व धारदार होऊ शकतो व तसा इशाराही चीनने दिलेला आहे. अफगाणिस्तानात आश्रय घेतलेला अल् - कायदाचा म्होरक्या आयमान अल् जवाहिरी याला काबूलमध्येच मारण्यात अमेरिकेला यश मिळाले आहे. वरवर जरी तालिबानने अमेरिकेचा निषेध केल्याचे दाखवले असले तरी ते एक नाटक आहे की काय असे वाटावे इतकी तालिबानची प्रतिक्रिया सौम्य स्वरुपात व्यक्त झाली आहे.





# तारेवरच्या कसरतीची गरज!

तथागत दास

अमेरिकेच्या शाब्दिक निषेधापलीकडे त्यांनी फारसे काही केलेले नाही. ओसामा बिन लादेन पाकिस्तानात रहात असताना त्याला ज्याप्रमाणे मारले त्याचीच पुनरावृत्ती या प्रकरणात झाली. त्यामुळे अमेरिका आणि तालिबान यांचे साटेलोटे कायम असल्याचे ध्यानात येते. बायडेन यांनी इस्रायलच्या दौऱ्यात इस्रायल आणि सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमीरात व आखाती देशांमधील सुन्नी देश यांच्यामध्ये मैत्री व सहकार्य वाढविण्यावर भर दिला. इस्रायल आणि सर्व सुन्नी इस्लामी आखाती देश यांचा क्रमांक एक शत्रुदेश इराण आहे व अमेरिकेलाही इराणचे अस्तित्व नकोसे आहे त्यामुळे बायडेन यांनी या सर्व देशांना इराणच्या विरोधात एकजूट करण्याचे आवाहन केले. संयुक्त अरब अमीरातीने इस्रायलबरोबरच्या संबंधात वाढ केलेलीच आहे. थोडक्यात अमेरिकेने युरोपीय व आखाती देश आणि आशियातील जपान, तैवान, सिंगापूर, थायलंड, फिलिपीन्स यासारख्या देशांच्या माध्यमातून एकीकडे रशिया व इराणला तर आशियामध्ये चीनला वेसण घालण्यासाठी पावले उचलली आहेत.

रशियाचे अध्यक्ष व्लादीमिर पुतिन यांनी प्रत्युत्तरादाखल इराणला भेट देऊन त्यांच्याबरोबरच्या संबंधांना उजाळा दिला आहे. रशिया आणि इराण हे दोन्ही देश तेलाचे मोठे निर्यातदार देश आहेत त्यामुळे त्यांचे आर्थिक हितसंबंधही जुळलेले आहेत. रशियाने सीरियामधील बशर अल असद यांच्या राजवटीला सक्रिय मदत करुन अमेरिका व पाश्चिमात्य किंवा युरोपीय देशांशी यशस्वी मुकाबला केला. 'आयएस' म्हणजेच दहशतवादी 'इस्लामिक स्टेट'



संघटनेच्या आडून सीरियातील बशर अल असद यांची राजवट अस्थिर करणे आणि तेथे इराक व लीबियाप्रमाणे आपल्याला धार्जिणी राजवट प्रस्थापित करण्याचे अमेरिका व युरोपीय देशांचे मनसुबे रशियाने हाणून पाडले. चीनला देखील इराणबरोबरच्या संबंधांची व्याप्ती वाढवलेली आहे. चीन व इराणमधील संबंधांची व्याप्ती वाढविताना चीनने इराणमध्ये गुंतवणुकीचा आगामी २५ वर्षांची दीर्घकालीन योजना आखून काही अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीची हमी इराणला दिली आहे. अफगाणिस्तान हा एक देश असा गुंतलेले आहेत. मध्य आशियातील इस्लामी देश देखील अफगाणिस्तानबद्दल सावधगिरी बाळगून आहेत. त्यामुळेच भारताच्या सीमेला लागून नसला तरी फार दूर नसलेल्या अफगाणिस्तानमधील घडामोडींवर देखील भारताला बारकाईने लक्ष ठेवावे लागणार आहे. अफगाणिस्तानात तालिबान राजवट प्रस्थापित होण्याची बाब अद्याप अनेक देशांच्या पचनी पडलेली नाही. त्यामुळे बेभरवश्याच्या अशा या कट्टरपंथीयांबरोबर राजनैतिक संबंध प्रस्थापित कसे करायचे आणि सहकार्य कसे करायचे या प्रश्नाचे उत्तर अजुनही








। अमेरिकन संसदेच्या स्पीकर नॅन्सी पेलोसी यांची तैवानला भेट

। चीनने तैवानवर केलेला हल्ला

आहे की ज्यावर सर्वच बड्या देशांचे लक्ष केंद्रित राहणार आहे. रशिया, चीन व इराण यांनी अफगाणिस्तानमध्ये लक्ष घातलेले आहे. तूर्तास अमेरिकेचा तालिबान राजवटीवर वरचष्मा आढळून येत आहे त्यामुळे बाकीच्या देशांना तेथे फारसा शिरकाव करता आलेला नाही.

अफगणिस्तानात अमेरिका व युरोपीय देशांप्रमाणेच रशिया, चीन व इराणचेही हितसंबंध मोठ्या प्रमाणात कुणाला मिळालेले नाही. भारताने अफगाणिस्तानमधील तालिबानपूर्व राजवटीत मोलाचे सहकार्य व मदत केली होती. मुख्यतः अफगाणिस्तानात नागरी सुविधा व पायाभूत सुविधांच्या निर्मितीमध्ये भारताने मोठी मदत केलेली होती. आता सर्वच अनिश्चितता व गोंधळाचे वातावरण आहे. भारताने नुकतीच परराष्ट्र मंत्रालयाच्या अधिकारी पातळीवरील शिष्टमंडळास तालिबानच्या नेत्यांशी बोलणी

करण्यासाठी पाठवले होते. अर्थात अतिसावधगिरी बाळगूनच भारतासारखे देश अफगाणिस्तानबाबत पावले टाकतांना आढळत आहेत. रशिया व चीनसारख्या देशांनी अफगाणिस्तानातील तालिबान राजवटीबद्दल सुरुवातीपासूनच अनुकूल भूमिका घेतलेली आहे. त्यांनी प्रामुख्याने आपल्या आर्थिक व व्यापारी हितसंबंधांना प्राधान्य देऊन तालिबान राजवटीशी संबंध प्रस्थापित केले आहेत.त्यांना इतर मुद्यांबाबत फारसा रस नसल्याचे आढळून येते. अमेरिका व अमेरिकेचे सध्याचे नेतृत्व यांच्या विषयपत्रिकेत आर्थिक व व्यापारी संबंधांच्या बरोबरीने मानवाधिकाराच्या मुद्यालाही प्राधान्य आहे. त्यामुळे तालिबानने अधिक शुध्द रीतीने शरिया कायदा व जीवनपध्दती लागू करण्याची जाहीर केलेला निर्णय हा सर्वच देशांच्या मनात चिंता उत्पन्न करुन गेला आहे. याच मालिकेत अफगाणिस्तानात अल् कायदा आणि आयएसकेपी म्हणजेच तालिबानविरोधी इस्लामिक स्टेट खोरासान प्रॉव्हिन्स हे अधिक सक्रिय होत असल्यानेही अमेरिकेच्या मनात चलबिचल सुरु झाली. त्याचेच पर्यवसान अल् कायदाचा म्होरक्या आयमान अल् जवाहिरी याला मारण्यात झाले. तालिबानने अफगाण भूमीचा वापर दहशतवाद्यांना करु देणार नाही असे आश्वासन दिले होते. अमेरिकेबरोबर त्यांनी दोहा येथे केलेल्या करारातही तसे नमूद करण्यात आले होते. परंतु त्याचा भंग तालिबानने केला असा आरोप अमेरिकेने केला आहे. थोडक्यात अमेरिकेने अफगाणिस्तानातून सैन्य माघारी घेतलेले असले तरी अफगाणिस्तानवर त्यांचे बारीक लक्ष आहे आणि मनात असेल तर अमेरिका केव्हाही अफगाणिस्तानात कारवाई करु शकेल असा इशाराच जवाहिरीला मारुन अमेरिकेने दिला आहे.



अल् जवाहिरी

भारताच्या नजीकच्या शेजाऱ्यांवरही नजर टाकणे आवश्यक आहे. पाकिस्तान आर्थिक दिवाळखोरी आणि अनिश्चित व अस्थिर राजकीय परिस्थितीचा मुकाबला करीत आहे. इम्रानखान यांना सत्तेवरुन घालविण्यात विरोधी पक्षांना यश आले असले तरी पंजाब प्रांताच्या प्रांतिक पातळीवर झालेल्या पोटनिवडणुकांमध्ये त्यांच्या पक्षाला मोठे यश मिळाले आहे. त्यामुळे त्या बळावर त्यांनी पाकिस्तानी संसदेच्या निवडणुका लवकरात लवकर घ्या अशी मागणी केलेली आहे.

पाकिस्तानाच सध्या माजी पंतप्रधान नवाझ शरीफ यांचे बंधू शहाबाज शरीफ हे विविध विरोधी पक्षांच्या संयुक्त सरकारचे नेतृत्व करीत आहेत. ते पंतप्रधान आहेत. आर्थिक दिवाळखोरीने कळस गाठल्याने त्यांनी आंतरराष्ट्रीय नाणेनिधिकडे मदत मागितली आहे. नाणेनिधिच्या अटींनुसार त्यांनी इंधनावरील सवलती बंद केल्या आहेत व त्यामुळे पाकिस्तानी रुपयाची घसरण अंशतः आटोक्यात आणण्याचे उद्दिष्ट तूर्तास साध्य झाले आहे. परंतु सध्याचे संयुक्त सरकार ही केवळ तात्पुरती किंवा संक्रमणकालीन व्यवस्था आहे. पाकिस्तानची संसद किंवा नॅशनल असेंब्लीची निवडणूक जेव्हा होईल त्यानंतरच तेथील राजकीय चित्र स्पष्ट होईल. राजकीय सत्ता दुर्बळ झाल्याने पाकिस्तानमधील न्यायसंस्था विलक्षण वर्चस्व गाजवू लागल्याचेही चित्र पाहण्यास मिळत असल्याचे निरीक्षकांचे म्हणणे आहे. पाकिस्तानात सरकार कुणाचेही आले तरी त्या सरकारला म्हणजेच त्या सरकारच्या नेत्याला पाकिस्तानच्या सर्वशक्तिमान लष्कराचा आशीर्वाद असणे आवश्यक असते. यामध्ये लष्कराबरोबर 'आयएसआय' या गुप्तचर संघटनेचाही समावेश असतो हेही ध्यानात ठेवणे आवश्यक आहे.



सध्याचे लष्करप्रमुख कमर जावेद बाजवा हे नोव्हेंबरच्या अखेरीला निवृत्त होणार आहेत. त्यांना मिळालेली मुदतवाढ तेव्हा संपत आहे. यापुढे त्यांना मुदतवाढ मिळणार नाही.

त्यामुळे पाकिस्तानी लष्कराची सूत्रे कुणाच्या हाती जाणार याकडे सर्वांचे लक्ष आहे. तूर्तास पाकिस्तानात कमालीचा गोंधळ, अनागोंदी व अराजकासारखी स्थिती आहे.

श्रीलंकेत तर आर्थिक दिवाळखोरीतून लोकांचा उठाव झालेला आहे आणि सत्तारूढ राज्यकर्त्यांना देश सोडून परागंदा व्हावे लागले आहे. तेथील अर्थव्यवस्था पार ढासळलेली आहे आणि त्यांनीही आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या साह्याने सावरण्याचे प्रयत्न सुरु केलेले आहेत. चीनने काही प्रमाणात आपला वरचष्मा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केलेला असला तरी अद्याप तेथील राज्यकर्त्यांनी चीनला फारशी दाद दिलेली नाही. ताज्या माहितीनुसार चिनी युध्दनौकेला श्रीलंकेच्या बंदरात फक्त इंधन भरण्यासाठी परवानगी देण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. परंतु भारताला सावध रहावे लागणार आहे. नेपाळ व बांगला देशात तूर्तास राजकीय स्थिरता आहे आणि अर्थव्यवस्थाही स्थिर आहेत त्यामुळे भारतावर त्यांच्याकडून फारसा दबाव





नाही. मालदीवमध्ये कट्टरपंथी राजकीय शक्ति वर डोके काढू पहात असल्याच्या बातम्या आहेत. भारताने मालदीव सरकारला आर्थिक साह्य पाठवून परिस्थिती सावरलेली आहे. भूतान हा अद्याप भारताचा मित्रदेश असला तरी डोकलाम पेचप्रसंगानंतर या देशाने काहीसे स्वतंत्र परराष्ट्र धोरण अमलात आणून चीनबरोबर संबंध सुरळीत करण्यास सुरुवात केली आहे. यामुळेच भारताच्या लष्करप्रमुखांच्या ताज्या परदेश दौऱ्यात ते प्रथम भूतानला भेट देणार आहेत. म्यानमारमध्ये लष्करी राजवट आहे आणि त्यांनी राजनैतिक संबंध जवळपास गोठविलेले आहेत.

या पार्श्वभूमीवर भारताला आपल्या आंतरराष्ट्रीय संबंधांची आखणी करावी लागणार आहे. भारताने आपल्या परराष्ट्रनीतीची सुरुवात अलिप्ततेने केली होती. त्याकाळात अमेरिका आणि सोव्हिएत युनियन या दोन महासत्तांमध्ये विभागलेल्या जागतिक राजकारणात भारताने अलिप्त राष्ट्र चळवळीच्या माध्यमातून जगातल्या दबलेल्या व मागास राष्ट्रांचे नेतृत्व केले होते. परंतु जागतिक घडामोडी आणि राजकारण चैतन्यशील व गतिमान असते आणि त्यात स्थित्यंतरे होत असतात. त्यामुळे बदलत्या परिस्थितीला सुसंसगत अशी परराष्ट्रसंबंध नीतीही अमलात आणावी लागते. भारतीय नेतृत्वाने विविध देशांमधील संघर्षात भूमिका घेण्याऐवजी प्रत्येक देशाबरोबर द्विपक्षीय पातळीवर सहकार्याचे संबंध प्रस्थापित करुन संघर्ष टाळण्याची आणि संघर्षाने द्विपक्षीय संबंध प्रभावित होणार नाहीत अशी खबरदारी घेतली. आखाती देशांमधील परस्पर संघर्षात कुणा एका देशाची बाजू घेण्याऐवजी भारताने प्रत्येकाशी स्वतंत्र पातळीवर द्विपक्षीय संबंध प्रस्थापित करुन आपले राजनैतिक तसेच व्यापारी व आर्थिक हितसंबंध जपले. इस्लामी देशांबरोबर परंपरागत संबंध राखतानाच १९९०च्या दशकात भारताने इस्त्रायलबरोबरही राजनैतिक संबंध प्रस्थापित केले ते याच भूमिकेतून.

अर्थात गतिमान वैश्विक राजकारणात परिस्थिती बदलत राहते. सोव्हिएत युनियनच्या विघटनानंतर जागतिक परिस्थितीही मोठ्या प्रमाणात बदलली. एक बलाढ्य आर्थिक शक्ति म्हणून चीनचा उदय झाला. जागतिक राजकारणातले प्राधान्याचे विषय बदलले. यामध्ये आर्थिक, व्यापारी आणि पर्यावरण, अण्विक तसेच मानवाधिकार यांचा समावेश झाला. यातून अनेक समान हितसंबंध जपणारे राष्ट्रसमूह स्थापन झाले. जी-७, शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन, ब्रिक्स, आसिआन, अलीकडेच स्थापन

झालेला 'क्वाड', ऑकस अशा अनेक गटांची नावे देता येतील. भारतही यामध्ये सहभागी आहे. परंतु हे राष्ट्रसमूह अन्य कुणाच्या हितसंबंधांच्या विरोधात काम करताना आढळत नाहीत. अलीकडे बायडेन इस्रायलमध्ये असताना त्यांनी अमेरिका, इस्रायल, भारत आणि संयुक्त अरब अमीरात या चार देशांमधील सहकार्याबाबत एक व्हर्च्युअल बैठक घेतली. हा गट नाही परंतु अमेरिकेचे उघड प्रयत्न हे इराणच्या विरोधात असल्याने भारताचा त्यामधील सहभाग हा काहीसा अनपेक्षित आणि भारताच्या आतापर्यंतच्या परराष्ट्रनीतीशी विसंगत असल्याचे मत व्यक्त होत आहे. हा भारतीय परराष्ट्रनीतीमधील बदल आहे काय असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतो.

२०१४ नंतर आलेल्या राज्यकर्त्यांनी आधीच्या भारतीय राज्यकर्त्यांना हिणकस ठरवून आपण स्वतः किती साहसवादी आहोत हे दाखविण्यासाठी आक्रमक





परराष्ट्रनीती आवलंबिली. २०१४ मध्ये एखाद्या राजाचा राज्याभिषेक असतो आणि त्या राज्याभिषेकाला इतर राजांना बोलावण्याच्या असलेल्या पुराणातील प्रथेचे पुनरुज्जीवन करण्यात आले आणि 'सार्क' म्हणजेच प्रामुख्याने भारताच्या लगतच्या शेजारी राष्ट्रांच्या प्रमुखांना बोलाविण्यात आले होते. परंतु तो केवळ देखावा होता आणि स्वतःची प्रतिमानिर्मिती आणि टिमकी बडविण्याचा प्रकार होता हे मागाहून घडलेल्या घटनांनी सिध्द केले. नेतृत्वाच्या साहसवादी भूमिकेमुळे शेजारी देश दुखावले गेले. नेपाळमध्ये करण्यात आलेल्या अगोचरपणामुळे त्यांनी चीनशी जवळीक साधायला सुरुवात केली. पाकिस्तान तर दुरावलेल्या स्थितीत आहे. डोकलाम पेचप्रसंगानंतर भूतानेही स्वतंत्र भूमिका घेणे पसंत केले. बांगला देश वगळता सर्व शेजाऱ्यांना आक्रमक धोरणामुळे दुखावण्यात आले. सुदैवाने नंतरच्या काळात परराष्ट्रमंत्रालयातील समंजस अधिकाऱ्यांमुळे यामध्ये दुरुस्ती करण्यात आली आणि तूर्तास हे संबंध सुरळीत झाले. परंतु एवढे दणके बसूनही नेतृत्वाचा साहसवाद संपला नाही. अमेरिका आणि इस्रायल या दोन देशांशी नको इतकी जवळीक सुरु झाली. याला खतपाणी घालणारे परराष्ट्र खात्यातील काही उच्चपदःस्थही होते. या प्रक्रियेत रशिया व चीन यांच्याबरोबरचे संबंध बिघडले. चीनबरोबरचे संबंध इतके विकोपाला गेले की गलवान खोऱ्यात चकमक होऊन वीस भारतीय जवानांना प्राणांची आहुति द्यावी लागली. अजुनही लडाखमधील चिनी घुसखोरीबाबत समाधानकारक तोडगा निघू शकलेला नाही. अमेरिकेच्या नको इतके कच्छपि लागणे आणि चीनला भारताची सीमा लागून आहे हे विसरुन चीनशी द्विपक्षीय संबंध चांगले ठेवण्यास प्राधान्य देण्याऐवजी अमेरिकेच्या नादी लागून चीनला दुखावण्यात आले. त्याचे परिणाम भोगावे लागत आहेत.

अमेरिकेत सत्ताबदल होऊन बायडेन प्रशासनाचा कारभार सुरु झाला. हे प्रशासन फारसे अनुकूल नसल्याचे पाहून रशियाबरोबरचे संबंध सुधारण्यात आले. परंतु क्वाड राष्ट्रसमूह,दक्षिण चिनी समुद्रातील निगडित राजकारण असो अजुनही भारतीय राज्यकर्त्यांना अमेरिकेची पडलेली भुरळ कमी होताना दिसत नाही. अमेरिका आणि इस्रायलच्या गटात सामील होण्याइतके धार्जिणेपण भारताला परवडणारे नाही. पूर्वीच्या राज्यकर्त्यांनी स्थापित केलेल्या परराष्ट्रनीतीमधील अनेक मूल्ये त्याज्य किंवा टाकाऊ नाहीत. समतोल तसेच मध्यममार्गी परराष्ट्र धोरणच भारताला उपयुक्त ठरणार आहे. त्यासाठी साहसवाद सोडून समंजस व परिपक्व दृष्टिकोनाची आवश्यकता आहे.

# प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचा जिल्हा संवाद दौरा वृत्तांत

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष जयंत पाटील यांनी २७ ते ३० ऑगस्ट या काळात पक्षबांधणीसाठी जळगाव, बुलढाणा, अकोला, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली आणि नागपूर असा ७ जिल्ह्यांचा संवाद दौरा केला. त्याचा हा संक्षिप्त वृत्तांत.**

**– निलेश बनकर**




## चौकशा लावून आवाज दाबण्याचा सरकारचा प्रयत्न

### जयंत पाटील यांचा आरोप

जळगाव दि. २७ ऑगस्ट – राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला भविष्यात मोठी संधी आहे. मात्र राष्ट्रवादी काँग्रेस हा सर्वात मोठा पक्ष होईल म्हणून राष्ट्रवादीच्या नेत्यांना बदनाम केले जात आहे. चौकशा लावून आपला आवाज दाबण्याचा प्रयत्न होत आहे. या दबावाला आपण कडाडून विरोध करू आणि सामान्य माणसाला न्याय मिळवून देऊ असा आत्मविश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी कार्यकर्त्यांना दिला.

लोकांमध्ये जा, त्यांचे प्रश्न जाणून घ्या, क्रियाशील कार्यकर्ते आपल्या भागात तयार करा, आपापसातील वाद बंद करा आणि आपली संघटना मजबूत करा असे आवाहनही जयंत पाटील यांनी यावेळी केले.

महाविकास आघाडीचे सरकार असताना परिवार संवाद यात्रा काढण्यात आली होती. तेव्हा या महाराष्ट्रात पवारसाहेबांना मानणारा एक मोठा वर्ग आहे ही गोष्ट जाणवली होती. एक मोठा विचार आपल्याकडे आहे. या आधारावर आपल्याला ही संघटना फार व्यापक करता येईल. यासाठी आपण सर्वांनी प्रामाणिक प्रयत्न करायला हवे असे मतही जयंत पाटील यांनी व्यक्त केले.

बुथ कमिट्या पूर्ण करा, संघटना सक्षम करा, सदस्यता नोंदणी पूर्ण करा. आपल्या पक्षाची वाढ कशी होईल यासाठी आपण प्रयत्न करायला हवे असे आदेश देतानाच जळगाव जिल्ह्यातील आपल्या अनेक उमेदवारांची थेट लढत ही शिवसेनेशी होती. शिवसेनेच्या निवडून आलेल्या आमदारांनी उद्धव ठाकरे यांच्याशी गद्दारी केली. पक्षांतर केलेले लोकांना कधीही आवडत नाही. त्यामुळे लोकांच्या मनात या आमदारांप्रती मोठा राग आहे. सुप्रीम कोर्टाचा निकाल सत्ताधाऱ्याच्या विरोधात गेल्यास काही महिन्यातच निवडणुका लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आपण संघटनात्मक बांधणी करत राहिले पाहिजे. आपले घड्याळ घराघरात पोहोचले पाहिजे असे सांगत प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचे आवाहन केले.

गुरुवारी राज्याचे अधिवेशन संपले. अनेक ठिकाणी अतिवृष्टीने शेतकरी त्रस्त होते. सरकार लक्ष देत नव्हते आम्ही सभागृहात संघर्ष केला आणि शेतकऱ्यांना मदत करण्यास भाग पाडले. त्यामुळे आता तुम्हीही जोमाने संघर्ष करा असे आवाहनही जयंत पाटील यांनी कार्यकर्त्यांना केले.

जळगाव येथे ज्या सूचना आल्या त्या सुचनांचा नक्कीच विचार केला जाईल असेही जयंत पाटील यांनी स्पष्ट केले.

## ... तरी आम्ही राष्ट्रवादी झिंदाबाद म्हणणार – एकनाथ खडसे

एकनाथ खडसेंच्या मागे सर्व यंत्रणा लावल्या आहेत. मिळेल ती चौकशी करत आहे, प्रचंड छळवणूक केली जात आहे. तरी आम्ही राष्ट्रवादी झिंदाबाद म्हणणार असे ठणकावून सांगतानाच हे सगळे बदनाम करण्याचे कारस्थान आहे. आम्ही याला भीक घालत नाही असा स्पष्ट इशाराही राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते आणि माजी मंत्री एकनाथ खडसे यांनी दिला.

या भागात आमदार निवडून आणण्यासाठी आतापासूनच तयारीला लागायला हवे, संघटनेचा पाया मजबूत करायला हवा, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सत्ता हस्तगत करायला हवी तेव्हा आपल्याला लोकहिताचे काम करून आपले आमदार निवडून आणू शकतो असे स्पष्ट मत एकनाथ खडसे यांनी मांडले.

एक काळ होता कॉंग्रेसचा दारुण पराभव झालेला होता. कॉंग्रेस लोकांच्या संपर्कात गेली आणि सर्व वातावरण ढवळून निघाले. आपल्यालाही तेच करावे लागेल. लोकांशी एकरूप व्हायला हवे. मतदारांच्या दरात जाऊन त्यांच्याशी संपर्क साधा. 'एक बूथ तीस युथ' सारख्या संकल्पना राबवा, लोकांच्या प्रश्नांची सोडवणूक करा आणि त्यांना आपल्या पक्षाचा सदस्य बनवून घ्या. सर्वसमावेशक कार्यकारिणी तयार करा असेही एकनाथ खडसे म्हणाले.

या जिल्ह्यात राष्ट्रवादी एकटी आहे. आपल्या विरोधात सर्व विरोधक आहेत पण आपण पुरून उरणार असल्याचे स्पष्ट करतानाच शरद पवार आजतागायत लढत आहेत. अहंमपणा विसरून जर आपण काम केले तर निश्चित लोकं तुमच्या मागे उभा राहणार आहेत असेही एकनाथ खडसे यांनी सांगितले.

प्रदेशाध्यक्ष झाल्यापासून जयंत पाटील हे संपूर्ण महाराष्ट्रात फिरत आहेत. पदाधिकारी जर असा कर्तव्यदक्ष राहिला तर नक्कीच आपली संघटना एका विशेष टप्प्यावर येईल अशा शब्दात जयंत पाटील यांचे विशेष कौतुक एकनाथ खडसे यांनी केले.

यावेळी जिल्हाध्यक्ष भैय्यासाहेब पाटील यांनी जिल्ह्यातील परिस्थितीचा आढावा व पक्षाच्या अडचणी



सांगितल्या. यावेळी आमदार अनिल पाटील, माजी मंत्री गुलाबराव देवकर, माजी आमदार सतीश पाटील, माजी आमदार राजीव देशमुख, दिलीप वाघ, रोहिणीताई खडसे, संतोष चौधरी, मनिष जैन, जिल्हाध्यक्ष भैय्यासाहेब पाटील, दिलीप सोनवणे, युवक अध्यक्ष रवींद्र पाटील, महानगर अध्यक्ष अशोक वंजारी आदींसह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## अकोला ग्रामीण व महानगरपालिका बैठक

**राजेंद्र शिंगणे–** येणाऱ्या मनपा निवडणूक व इतर निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही बैठक अत्यंत महत्त्वाचे आहे. पक्षाची ताकद निवडणूकीत आपल्याला वाढवायची आहे. आपल्याला लोकशाही टिकवायची असेल तर जनतेच्या दरबारात जायला हवे. गटतट सोडून एकत्र या आणि संघटना मजबूत करा, मला विश्वास आहे की यश हे आपल्यालाच मिळेल

**जयंत पाटील –** लोकसंपर्क वाढवा, बुथ अध्यक्ष नेमा, बुथ कमिटी करा. लोकांच्या दारात जावून भेटी द्या. पक्षाचे क्रियाशील सदस्य ज्या वॉर्डात जास्त तो वॉर्ड ताकदवान ठरेल आणि आपल्याला तिथे निवडणूक सोपी जाईल. त्यामुळे पक्षाचे अधिकाधिक सभासद करा. गल्लोगल्ली फिरून सभासद नोंदणी करा.

कार्यकर्त्यांची नियमित बैठक घ्या, सभासद नोंदणीचा आढावा घ्या. प्रत्येकाला जबाबदारी वाटून द्या. मोठी सभासद नोंदणीची मोहीम आखली तर जिल्ह्यात वातावरण निर्माण होईल. सत्ता नसली तरी या भागाचा विकास कसा होईल



त्यासाठी प्रत्येक शक्य गोष्ट करायला हवी. गाव वस्त्या पिंजून काढा. तयारी शंभर टक्के असायला हवी. आपली ताकद इथे आहे. एकेकाळी इथे मोठी ताकद होती ते दिवस परत आणा. गणपती झाले की सदस्य नोंदणीसाठी बैठका आयोजित करा.

महाविकास आघाडीचे सरकार होते तेव्हा लोकांना मदत करण्याचे काम आम्ही केले. विविध विभागातून निधी मिळवण्याचे काम आपण केले. आता आपले सरकार नाही म्हणून खचून जायचे नाही. उलट अधिक वेगाने काम करायला पाहिजे. हे सरकार कोणत्या परिस्थिती आले हे सर्वांना माहिती आहे. हे सरकार बेकायदेशीर आहे हे लोकांना आपल्याला पटवून सांगावे लागेल. हे लोकशाही विरोधात वागेल. यासाठी आपण प्रयत्नशील राहू. कठिण काळात आपण संघटनेच्या पाठिशी उभे आहात. ही फार सकारात्मक बाब आहे. कामाला लागा, आपल्या यश खेचून आणायचे आहे.

## अमरावती शहर

संजय खोडके यांनी या शहरात चांगल्याप्रकारे पक्ष बांधला आहे. लोकांसोबत संपर्क ठेवणे फार महत्त्वाचे आहे. लोकांसाठी सदैव उपलब्ध पाहिजे. संजय खोडके हे आपल्या बाईकवर फिरत असताना लोकांशी संवाद साधतात, त्यांच्या अडचणी असतील तर ते सोडवतात. सर्व काही असताना या शहरात राष्ट्रवादीचे नगरसेवक कमी निवडून येतात याबाबत

मला प्रचंड खंत आहे मात्र शहराची सध्याची परिस्थिती पाहता पुढच्या काळात या भागात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा झेंडा फडकेल याबाबत माझ्या मनात शंका नाही. सदस्य मोहीम मोठ्या प्रमाणात राबवा, कार्यकर्त्यांचा चांगला संच निर्माण करा. आज महागाई वाढली आहे, जनसामान्यांच्या मनावर



मोठे संकट आहे, २०२२ पर्यंत सर्वांना घरे देणार असे पंतप्रधान मोदी म्हणाले होते मात्र त्यांचा दावा काही खरा झालेला दिसत नाही. हे प्रश्न लोकांना सांगायला हवे, याबाबत लोकांचे प्रबोधन करायला हवे आणि प्रसंगी या प्रश्नासाठी संघर्ष करायला हवा.

अमरावती जिल्ह्यात पक्ष वाढवण्यासाठी आपण सर्वांनी विचार केला पाहिजे. आज देशात विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे. आपल्या हातात पर्याय आहे की जो सत्ताधारी पक्ष आहे त्यांच्याशी विचाराने लढाई करून यश आपल्या बाजूने खेचून आणायचे.

आपल्या जिल्ह्याला विचारांचा मोठा वारसा आहे, या जिल्ह्याने आपल्या विवेकाचा वापर करून अनेकदा चांगल्या लोकांना संधी दिली आहे. येणाऱ्या काळातही काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना आपण वर आणण्याचा प्रयत्न करा.

सध्या राज्यभरात सभासदांची नोंदणी केली जात आहे. जिल्ह्यात जास्तीतजास्त सभासदाची नोंद होईल याची खबरदारी घ्या. सर्व पक्षांपेक्षा जास्त सभासद आपल्या पक्षाचे पाहिजे. पक्षाच्या शिस्तेचे पालन प्रत्येकाने करायला पाहिजे. मला हे सत्कार, हारतुरे, फेटे यात काहीच इंट्रेस्ट नाही. आपली पार्टी वाढण्यात मला इंट्रेस्ट आहे. आपण सर्वांनी त्यासाठी प्रयत्न करावा. राजकारणात वेळ फार महत्त्वाचा, लोक राजकारणात आयुष्य घालवतात त्यामुळे वेळेचा उपयोग करून पक्षाच्या आणि आपल्या प्रगतीचा विचार आपण करायला हवा

लोकांना विषय समजून सांगा तरच लोकांचे प्रबोधन होईल आणि एक जन आंदोलन उभे राहील. येणाऱ्या निवडणुकीत स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा झेंडा फडकायला हवा यासाठी प्रयत्न करा. आपल्यात अचूक नियोजन पाहिजे, एकसंधपणा पाहिजे आपल्याला कोणीही पराजित करू शकत नाही.

## वर्धा जिल्हा

सभासद नोंदणी उत्साहपूर्ण वातावरणात पार पाडा. यामुळे मोठ्या प्रमाणात नोंदणी होईल. जिल्हा फ्रंटल, फादर बॉडी संघटनेच्या प्रत्येक माणसाने यात सहभागी व्हावे. आपण जर प्रयत्न केले तर या नोंदणी चांगल्या पद्धतीने होईल आणि पक्षाला कार्यकर्त्यांचा चांगला संच मिळेल. त्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून जिल्ह्यात चांगली वातावरण निर्माण करता येईल

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे अनेक जण आकर्षित होत आहे त्यामुळे पक्षात येणाऱ्या माणसाचे स्वागत करा. आपला



पक्ष वाढत आहे तो अधिक वाढायला हवा यासाठी प्रयत्न करा. पक्ष वाढविण्यासाठी जो काम करेल त्याच माणसाला पुढे आणण्याचे काम करा. आपली वैचारिक लढाई ही भाजपशी आहे. त्यामुळे विविध सेलच्या माध्यमातून आपले संघटन वाढण्याची गरज आहे. भाजपची सत्ता देशभर नाही, काही राज्यात तर त्यांची सत्ताही गेलेली आहे. त्यामुळे न डगमगता आपण लढा द्यायला. मला विश्वास आहे की चांगले यश आपल्याला या जिल्ह्यात मिळेल

## हिंगणघाट समुद्रपूर सिंदी(रे) विधानसभा क्षेत्र

हिंगणघाटच्या तरुणाईचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर प्रचंड विश्वास आहे, याची अनुभुती आज तरुणांची गर्दी पाहून आला. हा तरुण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे मोठ्या आशेने पाहत आहे. आपण त्यांच्या विश्वासाला तडा न जावू देता त्यांच्या मागे उभे राहिले पाहिजे, सर्व गटतट विसरून आपण सर्वांनी एकत्र यायला हवे. आपण एकत्र आलो तर ही जागा राष्ट्रवादी हमखास जिंकणार असे सांगून श्री. जयंत पाटील म्हणाले की, मागच्या आठवड्यात पावसाळी अधिवेशन पार पडले अतिवृष्टीने बेजार झालेल्या शेतकऱ्यांना मदत मिळावी, या भागात ओला दुष्काळ जाहीर करण्यासाठी सरकारला धारेवर धरले. सरकारने घाबरून घोषणा तर केली पण मी आज माहिती घेतली अजून एक दमडीही या शेतकऱ्यांना दिली गेली नाही

महाविकास आघाडीचे सरकार असताना शेतकऱ्यांना प्राधान्याने मदत केली जात होती. कर्जमाफी करून शेतकऱ्यांना दिलासा दिला जात होता मात्र हे सरकार आमदार सांभाळण्यात व्यस्त आहे. या सरकारचा महाराष्ट्र हा ४० आमदारांपूरताच मर्यादित आहे. त्यामुळे या सरकारला वठणीवर आणायला हवे

सरकारशी संघर्ष करायचा असेल तर कार्यकर्त्यांची मोठी फौज आपल्याला लागेल. त्यासाठी सभासद नोंदणी तात्काळ पूर्ण करा. सर्वांनी एकत्र येऊन सभासद नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी. आज महाराष्ट्राला सर्वात जास्त विश्वास हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर आहे. आपल्याकडे पवार साहेबांसारख्या ज्येष्ठ नेत्याचे विचार आहे. या विचारांच्या जोरावरच आपण हा पक्ष बांधायचा आहे. ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाने, तरुणांच्या ताकदीने हा गड आपण पुन्हा राष्ट्रवादीमय करू.

## चंद्रपूर आढावा बैठक

**जयंत पाटील–** राज्यात सत्तांतर झाले आहे, लोकांना हे फार काही पटलेले नाही. शक्यतो हीच बाब घेऊन लोकांपुढे गेले पाहिजे. जनसामान्यांच्या मनात आपल्याविषयी आपुलकी निर्माण करायला पाहिजे. सोशल मीडियाचा वापर करत जनमानसात वातावरण निर्माण करावे. काही जण फक्त उगवत्या सुर्याला नमस्कार करणारे आहेत. आपण त्यांच्याकडे दुर्लक्ष करून आपले काम चालू ठेवा. विरोधी पक्षातील नेत्यांना खोट्या आरोपाखाली बदनाम केले जात आहे. आपल्याला ईडी सीबीआय या १२ व्या खेळाडूसोबतही लढायचे आहे त्यामुळे विचलित व्हायचे नाही. त्यासाठी आपले संघटन मजबूत करा, सदस्यत्व नोंदणीची मोहीम सुरू करा आणि आपली ताकद वाढवा. या ताकदीच्या जोरावर आपण स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा झेंडा फडकवू.

यावेळी जिल्हाध्यक्ष राजेंद्र वैद्य,यांनी प्रास्ताविक भाषणात जिल्ह्यातील पक्षाच्या वाटचालीचा विस्तृत अहवाल



मांडला ! जिल्ह्यातील नगरपंचायत निवडणुकीत ६ पैकी एक जिवती नगरपंचायतीवर राष्ट्रवादी काँग्रेसचा अध्यक्ष, गोंडपिपरीत , गडचांदूर नगर परिषदेत सत्तेसह उपाध्यक्ष व सभापती पद असं चांगलं यश जिल्ह्यात राष्ट्रवादी पक्षाला मिळवून देत पक्षाला जिल्ह्यात बळकट करण्याचा अहोरात्र प्रयत्न करीत असल्याबाबत माहिती देत आगामी नगर पालिका व जिल्हा परिषद,नगर पंचायत निवडणुकीच्या तयारीचा दृष्टीने जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात वॉर्ड निहाय आणि ग्रामीण भागात पंचायत समिती निहाय बैठका,गाव पातळीवर चावडी बैठका,विविध आंदोलन,पूरग्रस्तांना नुकसान भरपाई मिळावी म्हणून चिमूर येथे भव्य मोर्चाचे आयोजन, इत्यादी पक्ष कार्याची माहिती दिली

## गडचिरोली आढावा बैठक

माजी राज्यमंत्री धर्माबाबा आत्राम, आ. मनोहर चंद्रीकापुरे, जिल्हाध्यक्ष रविंद्र वासेकर, महिला अध्यक्ष शाहीन हकीम, युवक लिलाधर भरडकर, विद्यार्थी अध्यक्ष चेतन पेंदाम काम करायला पाहिजे. एकमुखाची वज्रमुठ करा आणि लढा द्या

**आत्राम–** कोण येतंय कोण जातंय याचा विचार न करता आपल्या पक्षाला बळकटी कशी मिळेल याचा विचार आपण करायला हवा. येत्या काळात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आहे. या निवडणुकीत आपल्याला यश संपादित करून पक्षाची ताकद वाढवायची आहे. जिल्ह्यातील सर्वच भागात आपण काम केले तरच आपल्याला लोकसभेत तग धरता येईल. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा लोकांच्या मदतीसाठी नेहमीच तयार असते. मागे सिरोंचा येथे पूर आला त्यावेळी १८ तास प्रवास करून आम्ही पूरग्रस्तांच्या मदतीला धावून गेलो. भाजपचे लोक सर्व झाल्यानंतर तिथे आले आणि फोटो सेशन करून गेले.

**जयंत पाटील–** आपल्या पक्षाची नोंदणी सुरू आहे. या भागात चांगली नोंदणी व्हावी यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे. आपले राजकारण बेरजेचे असल्याने आपल्या पक्षाची दारं सदैव येणाऱ्यांसाठी उघडे आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत आपल्याला जास्तीत जास्त लोक



**आ. चंद्रीकापुरे (निरीक्षक)–** सत्ता येते सत्ता जाते, कोणीही ताम्रपट घेऊन जमलेला नाही. मात्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता हा पक्ष कोणत्याही परिस्थितीत टिकवून ठेवतात. कार्यकर्त्यांचे अनेक प्रश्न आहेत, समस्या आहेत, अडचणी आहेत, मात्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता कधी साथ सोडत नाही. आपण आपल्या संघटनेवर लक्ष केंद्रित करायला पाहिजे. या भागातील दोन्ही नगरपरिषदा आपण जिंकू शकतो. रडून उपयोग नाही आता लढावे लागेल. सध्याचे सरकार काही चांगल्या मार्गाने आलेले नाही. कपटाने आलेले गोष्टी फार काळ टिकत नाही अशा परिस्थितीत आपण तयारीला लागायला हवे. अंतर्गत गटबाजी सोडून एकदिलाने जिंकून आणायचे आहेत. जिल्ह्यातील पक्षाच्या संघटनेच्या परिस्थितीवर आपण चिंतन करायला हवे. क्रियाशील सदस्यांची संख्या आपल्याला वाढवायला पाहिजे. प्रत्येकाने आपापल्या भागात प्रयत्न करा. लोकांच्या मनात राष्ट्रवादी विषयी विश्वास निर्माण करा. पूर, अतिवृष्टीने तुमचा भाग त्रस्त आहे. मला समाधान आहे की या संकटाच्या काळात आपण त्या नागरिकांच्या सोबत उभे राहिलात. मला सर्व कार्यकर्त्यांचा अभिमान आहे. आपला पक्ष तरुणांचा पक्ष आहे, जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना धर्माबाबांसारख्या अनुभवी लोकांचे मार्गदर्शन आहे. मला खात्री आहे की आपण जिल्हा राष्ट्रवादीमय करू शकतो.

# शिवरायांच्या जीवनातील समतेची वाटचाल

प्रा. प्रकाश पवार



शिवरायांचे जीवन चरित्र मुख्यत: राजकीय स्वरूपाचे आहे. त्यांच्या जीवन चरित्रामध्ये सर्वात मोठे राजकीय स्वरूपाचे चार संघर्ष होते. त्या चार संघर्षाचे अधिष्ठान स्वराज्याबरोबर समता या मूल्याचे होते. एक, यापैकी पहिला संघर्ष राजकीय सत्तांच्या बरोबरचा होता. शिवरायांची राजकीय सत्तेची संकल्पना समता मूल्यावर आधारलेली होती. दोन, दुसरा संघर्ष त्यांचा ब्राह्मण्यवादाच्या विरोधातील होता (जातीसंस्था, वर्णव्यवस्था, ब्राह्मणवाद, परंपरागत क्षत्रित्व). यामुळे सामाजिक व धार्मिक समतेच्या विचारांचा युटोपिया त्यांनी अधोरेखित केला होता. तीन, शिवरायांच्या जीवनातील तिसरा संघर्ष सरंजामी व्यवस्थेच्या विरोधातील होता. ब्राह्मणवाद आणि सरंजामी व्यवस्था यांच्यामध्ये सातत्याने समझोते होत होते. यामुळे ब्राह्मण्यवाद आणि सरंजामी व्यवस्था या दोन शक्तींच्या विरोधात संघर्ष करताना शिवरायांना प्रचंड ताकद खर्च करावी लागली. राजकीय सत्तेच्या विरोधातील संघर्षापेक्षा ब्राह्मण्यवाद आणि सरंजामी व्यवस्था विरोधातील संघर्ष जास्त गुंतागुंतीचा व अवघड होता. तसेच हा संघर्ष स्थानिक वर्चस्वशाली शक्तीच्या विरोधातील होता. चार, शिवरायांच्या जीवनातील चौथा संघर्ष पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या विरोधातील होता. या चार विषमताप्रधान व्यवस्थांच्या विरोधातील संघर्ष अंतिमतः समता विचारांचे समर्थन करणारा ठरला. या चौकटीत शिवरायांच्या जीवनातील घडामोडी घडत गेल्या होत्या. यामुळे शिवरायांचे जीवन चरित्र समूहिक पातळीवर समतेसाठीची वर्ग व वैदिक–अवैदिक संघर्षाची जाणीव विकसित करते. शिवरायांनी सामूहिक राजकीय क्रांती घडवली. तसेच त्यांनी लष्करी क्षेत्रात क्रांतीकारी बदल केले व क्रांती घडवून आणली. राजकीय क्रांती आणि लष्करी क्रांती ही सामाजिक क्रांतीविना अपुरी ठरली असती. परंतु राजकीय क्रांती आणि लष्करी क्रांतीची गती प्रचंड असल्यामुळे सामाजिक क्रांती देखील समतेच्या अंगाने घडत गेली. कारण राजकीय क्रांती आणि लष्करी क्रांतीच्या पुढील सर्वात मोठी समस्या सामाजिक प्रतिगामित्व ही होती. यामुळे शिवरायांनी सामाजिक प्रतिगामित्वाच्या अंताचे त्यांचे म्हणून एक प्रारुप विकसित केले. त्यांनी सामाजिक प्रतिगामित्वाच्या अंताचे प्रारूप विकसित केले नसते तर राजकीय क्रांती आणि लष्करी क्रांती घडलीच नसती. यामुळे राजकीय क्रांती आणि लष्करी क्रांतीत शिवरायाचे सामाजिक क्रांतीचे प्रारूप दडलेले आहे. त्याचा शोध सकारात्मक पद्धतीने घेतला पाहिजे.

शिवरायांचे मुस्लिम सरदार व मावळे



## हिंदू मुस्लिम समता

सामाजिक क्रांतीचा पहिला मुद्दा हिंदू मुस्लिम समता हा ठरतो. हिंदू आणि मुस्लिमांमध्ये अनेक प्रकारचे सामाजिक भेदभाव होते. त्या भेदभावांवर शिवरायांनी त्यांचे एक प्रारूप म्हणून विकसित केले होते. या संदर्भात शिवरायांची स्वराज्याची संकल्पना आणि समता यांचे संबंध परस्परांना पूरक होते. स्वराज्याची संकल्पना आणि समता यांची व्याप्ती तत्त्वज्ञान आणि विविध प्रकारचे समाज यांच्याशी संबंधित होती. यापैकी पहिली व्याप्ती स्वराज्याची संकल्पना आणि मुस्लिम समाज यांच्यामध्ये समतेचे आणि बंधूभावाचे संबंध ही होती. या संदर्भातील चार वैशिष्ट्ये सुस्पष्टपणे दिसतात. एक, स्वराज्याची संकल्पना आणि मुस्लिम समाज यांच्यातील समतेचे नाते आणि बंधुभावाचे नाते घडवणे हे प्रचंड अवघड काम होते. परंतु या क्षेत्रात स्वराज्यातील समाजाचे मानसशास्त्र समता आणि बंधूभावाचे शिवरायांनी घडवले होते. मुस्लिम समाजाच्या अंतर्गत देखील विषमता प्रधान जातीव्यवस्था होती. शिवरायांनी मुस्लीम समाजातील जातीव्यवस्था अमान्य केली होती. पठाण, हबशी अशा जातीशी समतेचा व्यवहार केला. दोन, शिवरायांनी स्वराज्य आणि मुस्लिम यांच्यातील राजकीय सहभागाच्या पातळीवरील समता देखील घडवलेली होती. तसेच लष्करी सत्ता देखील

त्यांनी मुस्लिम पदाधिकाऱ्यांकडे देऊन राजकीय समता निर्माण केली होती. तीन, त्यांनी समतेचा विचार हिंदू मुस्लिम दोन धर्माच्या मध्ये देखील एकेश्वरवादी पद्धतीने घडवला होता. कुराणाचा आदर शिवराय करत होते. कुराणाची प्रत हा एकेश्वरवादाचा आशय होता. मोगल इतिहासकार खाफीखान यांनी नोंदवून ठेवले आहे की शिवाजीने आपल्या सैनिकांकरिता असा सक्त नियम केला होता की ज्या ज्या ठिकाणी जातील तेथे त्यांनी मशिदीस, कुराण ग्रंथास अथवा कोणत्याही स्त्रीस त्रास



देऊ नये. जर एखादा कुराणाचा ग्रंथ शिवरायांच्या हाती आला तर ते त्याबद्दल पूज्य भावना दाखवून तो आपल्या मुसलमान नोकराच्या स्वाधीन करत असत (पठाण इस्माईल, २०२१: ६२५). थोडक्यात शिवरायांनी हिंदू मुस्लिम समतेचा विचार स्वीकारलेला होता. चार, मुस्लिम स्त्रियांना शिवरायांनी समता आणि बंधूभावाचा सामाजिक अवकाश उपलब्ध करून दिला. मतितार्थ, शिवरायांनी हिंदू मुस्लिम समाजामध्ये समता आणि बंधूभावाचा विचार राबविला होता.

## हिंदू समाजांतर्गत समता

हिंदू समाज शिवरायांच्या काळात परंपरागत होता. हिंदू समाजात वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, ब्राह्मणवाद, परंपरागत क्षत्रियत्व आणि पुरुषसत्ता अशा पाच व्यवस्था वर्चस्वशाली कायमस्वरूपी राहिलेल्या आहेत. वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था ब्राह्मणवाद, परंपरागत क्षत्रियत्व आणि पुरुषसत्ता या पाच व्यवस्थांशी शिवरायांचा राजकीय संघर्ष झाला. शिवरायांनी या पाचही व्यवस्थांना नाकारणारे एक पर्यायी प्रारूप विकसित केले होते. त्या प्रारूपाचा गाभ्याचा अर्थ स्वातंत्र्य (स्वराज्य), समता आणि बंधुभाव यांचे नाते सातत्याने निर्माण करण्याचा होता. या तीन गोष्टींमध्ये समतेचे एक प्रारूप किंवा विचार सुस्पष्टपणे दिसतो.

## वर्णव्यवस्थेचा सिद्धांत अमान्य

शिवरायांनी वर्णव्यवस्थेचा सिद्धांत अमान्य करून समतेचे तत्व स्वीकारले होते. या संदर्भातील महत्त्वाची उदाहरणे त्यांच्या काळातील राजकीय प्रक्रियेत दिसतात. एक, शिवरायांनी अष्टप्रधान मंडळामध्ये राजा आणि सरसेनापती अशी दोन पदे मराठा जातीशी संबंधित नेमली होती. राजा आणि सरसेनापती या दोन्ही पदांना क्षत्रियत्व ही वर्णव्यवस्थेची पात्रता पूर्ण करावी लागत होती. राजा आणि सरसेनापती या दोन्हीही पदांवरील व्यक्तींना वर्णव्यवस्था क्षत्रियत्व देण्यास तयार नव्हती. शिवरायांनी आपल्या अधिकारात सरसेनापती पदाची नेमणूक केली. शिवाय त्यांनी राज्याभिषेक करून वर्णव्यवस्थेतील उच्च जातीचा ज्ञानाचा अधिकार अमान्य केला. यामुळे शिवरायांनी वर्णव्यवस्थेचा सिद्धांत अमान्य केला असे स्पष्ट होते (सुनील खिलनानी, २०१९: १५२-१५८). दोन, शिवरायांनी क्षत्रियत्वाचा अधिकार पठाण आणि मुस्लिम यांना दिला होता. हिंदू समाज व वर्णव्यवस्था क्षत्रियत्वाचा अधिकार हिंदू मधील कनिष्ठ जातींना देण्यास तयार नव्हती. शिवरायांनी मात्र क्षत्रियत्वाचा अधिकार म्हणजेच शस्त्र चालवण्याचा अधिकार पठाण आणि मुस्लिमांना दिला होता. ही घटना क्रांतिकारी होती. हा शिवरायांचा निर्णय समतेच्या संदर्भात क्रांतिकारी स्वरूपाचा होता. हा अधिकार शास्त्र देत नाही. तीन, वर्णव्यवस्थेने शस्त्र चालविण्याचा अधिकार ब्राह्मणेत्तरांना अमान्य केला होता. शिवरायांनी संरक्षणासाठी शस्त्र चालवण्याचा अधिकार क्षत्रियांना आणि बिगर क्षत्रियांना देखील दिला. यामुळे शिवरायांच्या लष्करामध्ये नागवंशी, मातंग, बेरड, रामोशी, भोई, कोळी अशा जातींचा समावेश होता. एका अर्थाने हे सामाजिक समतेचे तत्त्व होते. सामाजिक समता त्यांनी लष्करी व्यवस्थेत राबवली होती. सामाजिक समता लष्करी व्यवस्थेत राबविल्यामुळे वर्णव्यवस्था आणि

लष्करातील एक प्रकारचा श्रेष्ठत्वजनभाव त्यांनी संपुष्टात आणला होता. रामोशी समाजाचा छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात सहभाग होता. आजच्या पोलिसांचे काम त्यावेळी रामोशी करत असत. किल्ल्यांच्या तटाखालचा उतारावरचा मुलुख, बुरुज, किल्ल्यांच्या चोरवाटा यांच्या रखवालीच्या व रक्षणाचे जोखमेचे काम रामोशी समाज करत होता. शिवप्रभूंनी चेतवलेले स्वातंत्र्याचे स्फुल्लिंग रामोशांच्या अंतकरणात धगधगत होते, अशी नोंद डॉ. अरुण भोसले या विचक्षण इतिहासकारांनी केलेली आहे. (भोसले अरुण, २०२२: ४१). या नोंदीचा अर्थ रामोशी आणि शिवराय यांचे संबंध समतेचे आणि बंधूभावाचे होते. रामोशी समाजाचा शस्त्र चालवण्याचा अधिकार शिवरायांनी मान्य केलेला होता. हिंदू समाजातील वर्णव्यवस्था मात्र रामोशी समाजाचा शस्त्र चालवण्याचा अधिकार मान्य करत नव्हती. या अर्थाने जर रामोशी समाज आणि शिवराय यांच्या संबंधाकडे पाहिले तर शिवरायांनी भेदभावपूर्ण वर्णव्यवस्था विरोधी भूमिका घेतली होती, असा निष्कर्ष सुस्पष्टपणे काढता येतो. चार, शिवरायांच्या लष्करामध्ये अर्धवेळ लष्करी व अर्धवेळ शेती करणारे समूह होते. म्हणजे थोडक्यात कुणबी हा लष्करी पेशात प्रवेश घेऊ शकतो असे धोरण शिवरायांनी राबवले होते. कुणब्यासाठी लष्कराचा दरवाजा शिवरायांनी उघडलेला होता. म्हणजेच थोडक्यात अभिजात स्वरूपाची गुणवैशिष्ट्ये वर्णव्यवस्थेत कल्पिली होती. ही व्यवस्था शिवरायांनी अमान्य केली. त्यांनी सर्वसामान्य कुणबी समाजाला वर्णव्यवस्थेच्या नियमांपासून मुक्त केले. चार, गुप्तहेर यंत्रणा हे एक ज्ञानाचे क्षेत्र आहे. शिवरायांनी गुप्तहेर यंत्रणेमध्ये रामोशी आणि नागवंशी यांना सामील केले. यामुळे वर्णव्यवस्थेत ज्ञानी एक वर्ण असतो. ही परंपरागत संकल्पना शिवरायांनी मोडीत काढली होती. शिवरायांनी ज्ञान संकलनाचा आणि ज्ञानाचा राजकीय क्षेत्रात व्यवहार करण्याचा रामोशी व नागवंशी समाजाचा अधिकार मान्य केला होता.

## जातीसंस्था विरोधी भूमिका

भारतीय समाजात जातीव्यवस्था हे वास्तव आहे. परंतु जातीसंस्था काळानुसार बदलत केली आहे. महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांनी उत्तर पेशवाईत जातीसंस्था शोषणकारी जास्त बनते असा सिद्धांत मांडला आहे. उत्तर पेशवाईच्या आधी जातीसंस्था होती. परंतु तिने शोषणाचे आक्रमक स्वरूप धारण केले नव्हते. शिवरायांनी त्यांच्या काळात जातीव्यवस्थेवर आणि जातियविषमतेवर नियंत्रण ठेवले. जातीव्यवस्थेला त्यांनी विविध मार्गाने समता प्रधान भूमिका घेण्यास भाग पाडले. शिवरायांनी जातीय सामाजिक सलोख्याचे पर्यायी प्रारूप समतेसाठी विकसित केले (social harmony). शिवरायांच्या जीवन चरित्रात उच्च जातींच्या बरोबर मागास जातींतील लोकांचाही सहभाग मोठ्या प्रमाणावर त्यांनी वाढविला होता. उच्च जाती, मराठा, कुणबी, प्रभू, मागास जाती, पठाण, हाबशी यांच्यातील जातीय सामाजिक संघर्ष शिवरायांनी सामाजिक सलोख्यात रूपांतरित केला. यामुळे स्वराज्यात वेगवेगळ्या जातींचे मनोमिलन घडून आले. वेगवेगळ्या जातींची सरमिसळ घडून



आली. यासंदर्भातील काही निवडक उदाहरणे पुढील प्रमाणे आहेत. एक, शामराज निळकंठ, मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो, आबाजी सोनदेव, सोनोपंत डबीर अशा अनेक उच्च जातीतील पांढरपेशा वर्गांचा सहभाग स्वराज्यात होता. त्यांनी मतभिन्नता असूनही शिवरायांच्या काळात मराठा, कुणबी, प्रभू, मागास जाती यांच्याबरोबर जुळवून घेतले होते. त्यांनी वैदिक परंपरेचा पुरस्कार केला होता. तसेच त्यांनी अवैदिक परंपरेला विरोधी केला होता. त्यांचा हा विचार शिवरायांनी

त्यांच्या काळात मोडून काढला होता. दोन, तसेच माणकोजी दहातोंडे, नेताजी पालकर, कान्होजी जेधे, तानाजी मालुसरे, प्रतापराव गुजर, येसाजी कंक, सर्जेराव जेधे, हंबीरराव मोहिते, महाडिक अशा मराठा कुणबी समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींचाही समावेश स्वराज्यात होता. मराठा कुणबी समूहाने उच्चजाती, प्रभू आणि मागास जाती यांच्यामध्ये एकोपा निर्माण केला. संवादाची व बंधुत्वाची भूमिका त्यांनी पार पाडली. हा शिवरायांच्या काळातील प्रभाव उत्तर पेशवाई पर्यंत टिकून राहिलेला होता. उत्तर पेशवाईत जातीवाद वाढला होता तरीही मराठा सरदार समतेची भूमिका घेत होते. याबद्दलचे उदाहरण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नोंदवले होते. नागेवाडीचे महजूर शेटी बिन नागनाक हे नागवंशी होते. त्यांचा गोट ब्राह्मण आणि मराठा यांच्या मध्ये होता. तेव्हा त्यास विरोध ब्राह्मण्यग्रस्त सरदारांनी केला. गोट बाजूस काढावा अशी ब्राह्मण सरदारांची भूमिका होती. तेव्हा हिरोजी पाटणकर या मराठा सरदारांनी अशी भूमिका मांडली की ज्याची तलवार खंबीर तो हंबीर होय. ब्राह्मण सरदारांनी घरात जेवणाच्या पंगतीत तसा समरात शूरांच्या पंगतीत जातीभेद पाळला जावा अशी भूमिका घेतली होती. त्यास स्पष्ट विरोध हिरोजी पाटणकरांनी केला (आंबेडकर बाबासाहेब, खंड, १९, २००५: १३९, ५७७-५७८). हंबीरराव मोहिते सर सेनापती असताना लष्करी क्षेत्रात समता तंतोतंत पाळली जात होती. यामुळे त्यांच्या नावाने ज्याची तलवार खंबीर तो हंबीर अशी लोकयुक्ती घडवली होती. ही लोकायुक्ती जवळपास तीनशे वर्षे जुनी आहे. या उदाहरणावरून देखील शिवरायांच्या काळात समतेची पाळेमुळे समाजाच्या कानाकोपऱ्यात पोहोचली होती हे लक्षात येते. शिवरायांच्या काळापासून थेट उत्तर पेशवाई मध्ये तिचा प्रभाव दिसत होता. हे उदाहरण समतेच्या संदर्भात खूपच बोलके आहे. त्यावर वेगळे भाष्य न करताही समतेची खोली, उंची आणि रुंदी लक्षात येते. तीन, याबरोबरच स्वराज्यात आवजी हरि चित्रे मुजुमदार, बाळाजी आवजी, बाजीप्रभू देशपांडे सिंधकर, विश्वासराव नानाजी मुसेखोरेकर, बाबाजी बोवाजी, यशवंतराव बोवाजी, बाबाजी बाजी, बाबाजी बापूजी, चिमणाजी बापूजी असे हुशार व शूर प्रभू होते. प्रभूंनी शिवरायांना वैचारिक आणि रणांगणावरती लढणे अशा दोन्ही क्षेत्रांमध्ये सहकार्य केले. प्रभूंनी सामाजिक समतेचा दावाही केला होता. उच्च जाती आणि प्रभू यांच्यामध्ये सामाजिक प्रतिष्ठेच्या आणि राजकीय सत्तेच्या मुद्द्यावर तीव्र राजकीय संघर्ष होता. शिवरायांनी



या दोन समूहामध्ये संघर्ष बाजूला ठेवून सामाजिक सलोखा घडवण्याचा प्रयत्न केला. सामाजिक सलोखा ही सामाजिक समतेची पूर्वअट आहे. नागवंशी जातीतील योगदानवर पुस्तक लिहिले होते. त्यास प्रस्तावना प्रबोधनकार ठाकरे यांनी लिहिली आहे. त्यामध्ये प्रबोधनकार ठाकरे यांनी शिवकाळातील नागवंशी समाजातील लढवय्ये गुणाबद्दल नोंद केलेली आहे. चार, हेर खात्याचे प्रमुख बहिर्जी नाईक यांच्या हाताखाली नागवंशी, मातंग व बेरड हे समाज काम करत होते. जिवा महाले (संकपाळ), गोविंदनाक, शिदनाक, यशवंता, रायाजी घेरे सरनाईक, गोंदनाक, मल्हारबा, राणबा, शिदबा, जनाबाई शिवले, गोविंद गोपाळ (रामसेजचा किल्लेदार), मायनाक भंडारी अशी मागास समूहातील कर्तबगार मंडळी स्वराज्यात सहभागी झाली होती. मेटकरी या प्रकारात नागवंशी, रामोशी,

बेरड बहुसंख्येने होते. शिवरायांच्या काळात हुल पथक पूर्वाश्रमीचे महार चालवित होते. वाई प्रांतातील नागेवाडी या गावाची पाटीलकी नागवंशी घराण्यात असल्याचा उल्लेख अस्सल कागदपत्रांमध्ये आहे. यावरून पाटीलकी पदावर फक्त मराठा जातीतील लोकांची नियुक्ती केली जात असे असा जो समज आहे तो निराधार असल्याचे दिसून येते. शिवरायांच्या काळामध्ये नागवंशी अस्पृश्य असल्याचे दिसून येत नाही. शिदनाक यांच्या कामगिरीचे वर्णन विठ्ठल रामजी शिंदे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले आहे. विठ्ठल रामजी शिंदे यांनी भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न या पुस्तकांमध्ये शिदनाकाच्या शौर्याचे वर्णन केलेले आहे. तर डॉक्टर आंबेडकर यांनी शिदनाक आणि शिवकाळातील समतेचे वर्णन केलेले आहे (शिंदे वि. रा.: १५७-१५८, आंबेडकर, खंड, १९, २००५: १३९, ५७७-५७८). तान्हाजी मालुसरे यांना कोंढाणा किल्याच्या चोरवाटा, चौकी पहाऱ्याच्या जागा व किल्यावर असलेल्या शिबंदीची खडानखडा माहिती यशवंता, रायाजी घेरे सरनाईक, गोंदनाक, मल्हारबा, राणबा, शिदबा इ. नागवंशींनी पुरविली होती.





औरंगजेब दक्षिणेत आल्यावर मराठ्यांचा संघर्ष वाढत गेला. या लढ्यात मराठ्यांप्रमाणेच अनेक जातींमधील लोकांनी कृतिशील सहभाग घेतला. यापैकी नागवंशी समाजातील शिदनाक या सरदाराने कृतिशील सहभाग घेतला (आंबेडकर, खंड, १९, २००५: १३९, ५७७-५७८). . त्यांनी नागवंशी लोकांची एक पलटण उभी केली होती. त्यांनी मोगलांशी कडवी झुंज दिली. या पराक्रमाची दखल छत्रपती शाहूंनी घेतली होती. त्यांना कळंबी हे गाव इनाम दिले होते. हे गाव त्याच्या वंशात पुढे इनाम म्हणून चालू राहिले. खर्ड्याच्या प्रसिद्ध लढाईमध्ये शिदनाकच्या नातूने पेशव्यांच्या वतीने युद्धात सहभाग घेतल्याचा उल्लेख आहे (आंबेडकर, खंड, १९, २००५: १३९, ५७७-५७८). रायनाक यांनी रायगड वर मोर्चेबंदी केली होती. रायगडच्या संरक्षणासाठी त्यांनी कडवी झुंज दिली. गडाचे संरक्षण केले. त्यांच्याशी स्वराज्यात समतेचा व्यवहार झाला होता. आरमाराचे अधिकारी मायनाक भंडारी होते. गोव्याच्या दक्षिण भागाचा एक सुभा केला होता (१६७४-१६७५). त्यावर सुभेदार धर्माजी नागनाथ यांची नेमणूक शिवरायांनी केली होती. जिंजी प्रांतातील इमारतींच्या बांधकामावर रुद्राजी साळवी यांना नेमले होते (पठाण इस्माईल, २०२१:३९५, ४१४). म्हणजेच बेरड, रामोशी, न्हावी, नागवंशी, सुतार, कुंभार, पाथरवट, गोसावी अशा विविध जातींनी एकत्रित येऊन स्वराज्याची इमारत बांधली. त्यामुळे स्वराज्य ही संकल्पना सामाजिक ऐक्य, सामाजिक सलोखा, सामाजिक समता यांचे प्रतिक झाली होती. या अर्थाने शिवरायांचे स्वराज्य ही समतेची भूमी होती. वारकरी परंपरेने सामाजिक समतेची चळवळ निर्माण केली होती. त्या चळवळीला पूरक अशीच शिवरायांची स्वराज्याची चळवळ म्हणजे समतेची चळवळ उभी राहिली होती. हा मुद्दा शिवराय आग्र्याला गेले तेव्हा त्यांच्या सोबतच्या व्यक्तींवरुनही स्पष्ट होतो. तेव्हा शिवरायांच्या सोबत तानाजी मालुसरे, येसाजी कंक, सर्जेराव जेधे हे मराठा होते. तर बाळाजी आवजी, निराजी रावजी हे सीकेपी होते. तर त्रिंबक सोमदेव व रघुनाथ बल्लाळ कोरडे हे उच्च जातीतील होते. मदारी मेहतर हे एका अर्थाने मागास समाजातील होते (सरदेसाई गोविंद सखाराम, १९८८: २५१). ही सामाजिक रचना पाहिली तर सुस्पष्टपणे

शिवरायांच्या अडचणीच्या काळात देखील त्यांच्या विचारात समतेचे अधिष्ठान होते, असेच दिसते. शिवरायांच्या काळात नागवंशीय लोकांना खरी आत्मसन्मानाची अस्मिता प्राप्त झाली. त्यांचा आत्मसन्मान जपला जात होता. रायगडच्या पायथ्याला जिजाऊंच्या संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी शिवरायांनी मागास समूहाकडे सोपवली होती. असा युक्तिवाद एलिनॉर झेलियट यांनी केला आहे. शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वात समतेचा विचार खोलवर प्रभाव असलेला होता. त्यांच्या प्रत्येक सार्वजनिक कार्यामध्ये समतेचे तत्व प्रतिष्ठान आणि अधिष्ठान म्हणून देखील पाळले गेलेले होते. हा एक अतिउच्च मानबिंदू शिवरायांनी समतेच्या बद्दल निर्माण केला होता. परंतु उत्तर पेशवाईत समतेच्या या मानबिंदूचा ऱ्हास झाला. शिवरायांच्या स्वराज्यात विषमते विरोधी ठामपणे भूमिका घेतली जात होती. या संदर्भातील चित्तवेधक उदाहरण म्हणजे ब्राह्मण्याला विरोध हे आहे.

## ब्राह्मण्यवाद विरोधी विचार


शिवरायांच्या मंत्रिमंडळात आणि लष्करात ब्राह्मण जातीचे अनेक मध्यमवर्गीय लोक होते. त्यांच्याशी शिवरायांचा सार्वजनिक व्यवहार समतेचा होता. शिवराय यांनी मात्र ब्राह्मण आणि ब्राह्मणवाद या दोन्ही गोष्टी वेगवेगळ्या केल्या. शिवरायांनी ब्राह्मणवाद या विचारसरणीला सामाजिक, धार्मिक, आर्थिक अशा विविध पातळ्यांवर नाकारले होते. या संदर्भातील अनेक उदाहरणे शिवरायांच्या जीवन चरित्रात सुस्पष्टपणे दिसतात. एक, शिवरायांनी वैदिक आणि अवैदिक या प्रकारचा भेदभाव ब्राह्मण्यवाद ही विचारप्रणाली करते हे समजून घेतले होते. शिवरायांनी या भेदभावाला विरोध केला. शिवरायांनी राज्याभिषेक करणे हा विचार धार्मिक ब्राह्मण्यवाद विरोधी स्वरूपाचा होता. ब्राह्मण्यवादी विचारांच्या वर्चस्वाविरोधी सरळ सरळ मोहीम सुरू केली होती. शिवरायांनी ब्राह्मण्यवादी विचारांच्या विरोधात जाऊन राज्याभिषेक केला. तेव्हा त्यांच्या मंत्रिमंडळात ब्राह्मण होते. परंतु त्याबरोबरच त्यांनी ब्राह्मण्यवाद विचाराला ठामपणे विरोध करून राज्याभिषेक घडवला होता. ही शिवरायांची भूमिका धार्मिक ब्राह्मणवादाला नाकारणारी होती (खिलाननी सुनील, २०१९: १५२-१५८). धार्मिक ब्राह्मणवादातील भेदभावाला सुस्पष्टपणे विरोध करणारी होती. तसेच धार्मिक ब्राह्मण्यवाद या विचारप्रणालीचा अंत घडविणारी होती. शिवरायांनी बाबा याकूत, तुकाराम महाराज, गोसावी यांच्यात भेदभाव केला नाही. अवैदिक परंपरा नागवंशीय आहे. रायगडावरील बाजारपेठेत नागाचे कोरीवकाम सुस्पष्टपणे दिसते. भिमा नदीच्या खोऱ्यात नागाची मंदिरे अनेक आहेत. त्यामुळे अवैदिक नागवंशीय समूहाशी त्यांचे समतेचे व बंधुभावाचे नाते होते. दोन, शिवरायांनी ब्राह्मणांचे अग्रहार बंद केले होते. अग्रहाराची पद्धत हा ब्राह्मण्यवाद होता. अग्रहार म्हणजे ब्राह्मण हे धर्मगुरू असून, त्यांनी राजाचे अभिष्टचिंतन करून राहवे, यासाठी त्यांच्या योगक्षेमास काही गांव किंवा उत्पन्न तोडून देण्याची वहिवाट पूर्वपार होती. त्यास अग्रहार असे म्हटले जात होते (सरदेसाई गोविंद सखाराम, १९८८: ३७९). धर्मगुरू या संस्थेच्या विरोधात शिवरायांनी सुस्पष्टपणे भूमिका घेतली होती. या निर्णयामुळे त्यांनी अभिष्टचिंतन ही प्रथा मोडीत काढली होती. हा निर्णय ब्राह्मण्यवाद नाकारणारा होता. अग्रहार बंद केले याचा अर्थ ब्राह्मण विरोध असा नव्हता. त्यांनी पोटापाण्याची वेगळी व्यवस्था केली.



शिवरायांनी कराड जवळच्या सैदापूर गांवच्या ब्राह्मण व्यक्तीची वेगळी व्यवस्था केली होती (सरदेसाई गोविंद सखाराम, १९८८: ३८०). अग्रहार बंद केले म्हणून अग्रहार समर्थकांनी शिवरायांच्या विरोधातील सत्ताधारी वर्गाशी जुळवून घेतले. तीन, शिवरायांनी ब्राह्मण्यवाद या विचारप्रणालीचा सामाजिक भेदभाव हा पैलू समजून घेतला होता. शिवरायांनी राज्यभिषेकाची सर्व कामगिरी बाळाजी आवजीवरती सोपविली होती. बाळाजी आवजींमध्ये ब्राह्मण्यवादाचा विचार नव्हता. त्यामुळे शिवराय आणि बाळाचे आवजी यांच्यामध्ये एक प्रकारे समतेचे व बंधूभावाचे नाते होते. शिवरायांनी यामुळे सामाजिक पातळीवरील ब्राह्मण्यवाद देखील त्यांच्या राजकीय व्यवहारातून हद्दपार केला होता. चार, शिवरायांच्या काळात

ब्राह्मण्यवाद ही विचारप्रणाली सामाजिक व धार्मिक भेदभाव करत होती. त्या विचारप्रणालीला शिवरायांनी नाकारले. परंतु त्याबरोबरच शिवरायांनी ब्राह्मण्यवाद या विचारप्रणालीतील आर्थिक भेदभावाला देखील नाकारले होते. या संदर्भातील उदाहरण १६७५ सालच्या पत्राच्या संदर्भातील नोंदविता येईल. पद्मदुर्ग सागरी किल्ल्याच्या संदर्भात शिवरायांनी पत्रव्यवहार केलेला होता. पद्मदुर्ग किल्ल्यास पाणी लाकूड फाटा आणि पैसे पुरविण्याची सर्व जबाबदारी शिवरायांनी घेतली होती. ही घडामोड आर्थिक स्वरूपाची आहे. परंतु प्रभावलीचा सुभेदार हा आर्थिक ब्राह्मण्यवादी होता. शिवरायांनी तेव्हा सुभेदार ब्राह्मण जातीचा असला तरी त्याची पर्वा करू नका अशी आज्ञा





जिवाजी विनायक यांना केली होती. त्यांच्या या पत्रामध्ये सुस्पष्टपणे आर्थिक ब्राह्मण्यवादाला विरोध झालेला आहे. शिवरायांनी ब्राह्मण जातीला विरोध केला असा याचा अर्थ होत नाही. पाच, शिवरायांनी ब्राह्मण्यवादा विरोधी भूमिका घेतली. उदा. व्यंकोजी राजे आणि शिवराय यांचा मुक्काम तिरुमळ्ळपाडी येथे होता. व्यंकोजी राजे २३ जुलै १६७७ ला रात्री तंजावरला गेले. हा पलायनाचा विचार जगन्नाथ पंत यांचा होता. यामुळे व्यंकोजी राजे यांच्या पलायनाची बातमी कळताच शिवरायांनी जगन्नाथ पंत यांना कैद केले. मात्र इतर कारभारी मंडळींना त्यांनी सन्मानाने तंजावरला पाठविले होते (पठाण इस्माईल, २०२२: ४२१). शिवरायांनी येथे जगन्नाथ पंत यांची ब्राह्मण जात पाहिली नाही. शिवरायांनी जगन्नाथ पंत यांच्यामधील ब्राह्मण्यावादाच्या प्रवृत्तीस विरोध म्हणून त्यांना कैद केले. सहा, माहिती आणि ज्ञानाच्या क्षेत्रातील भेदभाव हे एक ब्राह्मण्यवादाचे वैशिष्ट्ये शिवरायांच्या काळातील होते. शिवरायांना या वैशिष्ट्याचा अनुभव आलेला होता. शिवराय त्यांच्या स्थानिक समाजातील मित्रांबरोबर मावळ प्रांतात फिरत होते. तेव्हा शिवरायांचे जीवन ध्येयहीन आहे अशी तक्रार दादोजी कोंडदेव यांनी शहाजी महाराजांकडे केली होती. अशी नोंद गिरीश कुबेर यांनी केलेली आहे. शिवरायांचा उद्देश मावळ प्रांतात लोकसंग्रह करणे व वेगवेगळ्या व्यवस्थांचे एकीकरण करणे हा होता. यापेक्षा वेगळी माहिती आणि ज्ञान दादोजी कोंडदेव यांनी शहाजी महाराजांकडे पोचविली होती (कुबेर गिरीश, २०२१: ३९). थोडक्यात माहिती आणि ज्ञान या क्षेत्रात शिवरायांच्या काळात भेदभाव होत होता. खुद्द शहाजी महाराजांच्या मुलाच्या बद्दल हा भेदभाव केला जात होता. यामुळे तळागाळातील समाजाबद्दलच्या माहिती आणि ज्ञानाबद्दल बेबनाव उघडपणे घडत होते. या स्वरूपातील ब्राह्मण्यवादाला विरोध शिवरायांनी केला. विशेष सामान्य लोकांना गावंढळ समजले जात होते (सरदेसाई गोविंद सखाराम, १९८८: १५४). अशी प्रतिमा शिवरायांनी सामान्य लोकांची पुसून टाकली त्यांनी या ऐवजी त्यांची प्रतिमा लढवय्ये व काटक अशी नवीन निर्माण केली. त्यांनी माहिती आणि ज्ञानाच्या क्षेत्रातील ब्राह्मण्यवादाच्या विरोधात जाऊन मावळा (लढवय्ये, काटक, धोरणी, मुत्सद्दी) ही संकल्पना घडवली.

यामुळे मावळा या संकल्पनेचा एक अर्थ समता असा होतो. तेव्हाच मावळा या संकल्पनेचा अर्थ भेदभाव पूर्ण माहिती आणि ज्ञान यापासून मुक्त असणारी संकल्पना असाही होतो.

## परंपरागत क्षत्रियत्व विरोधी विचार

क्षत्रियत्वाची संकल्पना एका अर्थाने ब्राह्मण्यवादाच्या चौकटीतील आहे. वि. का. राजवाडे आणि गोविंद सखाराम सरदेसाई या इतिहासकारांनी शिवरायांच्या क्षत्रियत्वाचा संबंध ब्राह्मण्यवादाशी जोडलेला आहे. परंतु शिवरायांनी क्षत्रियत्व ही संकल्पना ब्राह्मण्यवादापासून वेगळी करण्याचा सातत्याने प्रयत्न केला होता. यामुळे क्षत्रियत्वाच्या संदर्भातील दोन प्रवाह उदयास आले असे दिसते. क्षत्रियत्वाच्या या क्षेत्रामध्ये शिवरायांनी नवीन प्रारूप घडवले होते. दुसऱ्या शब्दांत हे प्रारूप आधुनिक लष्करी नियम घडवत होते. या प्रारूपाच्या संदर्भातील काही निवडक वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत. एक, शिवरायांनी शस्त्र वापरण्याचा अधिकार ब्राह्मणेत्तरांना दिला. शिवरायांनी शस्त्र वापरण्याचा अधिकार क्षत्रियत्व नाकारलेल्या वर्गालाही दिला. विशेषतः मराठा आणि कुणबी असा फरक केला जात होता. कुणबी समाजाला शस्त्र वापरण्याचा अधिकार नव्हता. त्यांना साळूमाळू असे तुच्छतेने संबोधित होते. परंतु शिवरायांनी लष्करामध्ये शेतकरी वर्गाला अर्धवेळ शेती आणि अर्धवेळ लष्करी अशा दोन्ही कामांमध्ये सामील करून घेतले. हा शिवरायांचा निर्णय ब्राह्मण्यवादातून विकसित झालेल्या परंपरागत क्षत्रियत्वाच्या विरोधातील होती. दोन, शिवरायांनी लष्करी क्षेत्रातील कामगिरी रामोशी, बेरड, आगरी, कोळी, भंडारी आणि नागवंशी यांच्यावर देखील सोपवली होती. यांना देखील शिवरायांनी शस्त्र चालविण्याचा अधिकार दिला होता. तीन, शिवरायांनी शस्त्र चालवण्याचा अधिकार पठाण आणि हाबशी यांचाही मान्य केला होता. चार, शिवरायांच्या आरमारात जवळपास ५० टक्के आणि पायदळ घोडदळ या क्षेत्रात जवळपास २५-३० टक्के मुस्लिम समाजाचा सहभाग होता. शिवरायांनी त्यांचाही शस्त्र चालवण्याचा अधिकार मान्य केला होता. पाच, क्षत्रियत्व या संकल्पनेचा अंत झाला आहे. असा ब्राह्मण्यवादाचा मुख्य सिध्दांत होता. हा सिद्धांत शिवरायांनी अमान्य केला. सहा, शिवरायांनी ब्राह्मण आणि इतर जाती यांच्या कामांची सरमिसळ केली. उदा. शिवरायांनी बाळाजी आवजी यांना वैचारिक क्षेत्रातील काम दिले. तर बहिर्जी नाईक यांना माहितीचे ज्ञान या संदर्भातील काम दिले. शामराज निळकंठ, मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो, आबाजी सोनदेव, सोनोपंत डबीर यांना लष्करी क्षेत्रातील कामे दिली. खुद्द जिजाऊ यांनी राज्यकारभाराचे काम केले (बैध्दिक). काम हे वर्णव्यवस्थेनुसार बंदिस्त झाले होते. त्या कामांना शिवरायांनी वर्णव्यवस्थेपासून मुक्त केले. वंशपरंपरागत गुण आणि कर्म यांचा संबंध त्यांनी पूर्णपणे अमान्य केला. यामुळे शिवरायांनी क्षत्रियत्व आणि ब्राह्मण्यवाद यांना वेगवेगळे केले. शिवरायांनी लष्करी क्षेत्रातील कामगिरी आणि धर्माचा विचार यांचे अलगीकरण केले. सात, ब्राह्मणवाद आणि परंपरागत क्षत्रित्वाची संकल्पना पूर्णपणे शक्तीपूजक होती. शिवरायांनी लष्करी क्षेत्रामध्ये शक्तीच्या बरोबर युक्ती या गोष्टीला सर्वात जास्त महत्त्व दिले. यामुळे केवळ शक्तिवर शिवरायांचा भर नव्हता. शिवरायांचा विचार शक्तीपेक्षाही विचारांवरती भर देणारा होता. या सातही उदाहरणांवरून असे दिसून येते की, शिवरायांची क्षत्रियत्वाची संकल्पना ब्राह्मण्यवाद केंद्रित नव्हती. शिवरायांची मुख्य संकल्पना आधुनिक लष्करी स्वरूपाची होती. यामुळे शिवरायांचा लष्कर विषयक दृष्टिकोन सातत्याने सामाजिक समता या मूल्याला प्राधान्य देणारा राहिला होता.

## सामाजिक समता

शिवरायांनी लष्करात, राजकारणात, अर्थकारणात आणि दैनंदिन जीवनात सामाजिक समतेचे तत्व स्वीकारले होते. सामाजिक विषमता सातत्याने निर्माण होत असते. सामाजिक विषमतेच्या विरोधात शिवरायांनी ठामपणे भूमिका घेतली होती. या संदर्भातील काही निवडक लक्षवेधक उदाहरणे पुढील आहेत. एक, महाराष्ट्रात बेरड हा एक समाज आहे. १६४६ मध्ये शिवरायांनी बेरड समाजाच्या मदतीने पुरंदर किल्ला जिंकला होता (सरदेसाई गोविंद सखाराम, १९८८: १५०). बेरड समाजात राजकीय आत्मभान शिवरायांनी विकसित केले. दोन, जिवा संकपाळ हे जावळी प्रांतातील कोंडवली येथील रहिवासी होते. त्यांनाच जिवा महाले म्हटले जाते. त्यांना शिवरायांनी स्वराज्याच्या उभारणीत सहभागी करून घेतले होते (शेजवलकर त्र्यं. शं., १९६४: ३६९). होता जीवा म्हणून वाचला शिवा अशी एक महाराष्ट्रात लोकायुक्ती आहे. शिवरायांनी जीवा महाले यांना जमीन दिली होती. जमीन म्हणजे एका अर्थाने प्रतिष्ठा दिली होती. व्यक्तीची प्रतिष्ठा उंचावल्यानंतर समता व्यक्तीला मिळते. हा विचार या उदाहरणार्थ दिसतो. दोन, गोसावी हे अवैदिक, नागवंशी, नाथपंथी होते. बाबासाहेब आंबेडकर यांनी पांडुरंगदास देऊदास गोसावी हे नागवंशी असल्याचे नोंदविलेले आहे (आंबेडकर, खंड, १९, २००५: ४३५). गोसावी समाजातील अनेक व्यक्ती शिवरायांच्या स्वराज्याशी संबंधित होत्या. निश्चलपुरी गोसावी हे एक व्यक्तिमत्व शिवरायांचे जीवन चरित्रामध्ये नोंदविले गेलेले आहे. निश्चलपुरी गोसावी यांनी वैदिक राज्याभिषेकातील चुका नोंदविल्या. त्यांनी तांत्रिक राज्याभिषेक करून घेतला (शेजवलकर त्र्यं. शं., १९६४: ३७५). निश्चलपुरी गोसावी

यांच्याशी शिवरायांचे संबंध समतेचे होते. गागाभट्ट आणि निश्चलपुरी गोसावी या दोन व्यक्तिमत्त्वापैकी निश्चलपुरी गोसावी यांचे मत शिवरायांनी स्वीकारले होते. यामुळे शिवराय एका अर्थाने जातिय विषमता विरोधी भूमिका घेत होते. तीन, किल्ल्यांच्या बांधकामासाठी वेगवेगळ्या जातीतील लोकांची गरज होती गवंडी, सुतार, लोहार, पाथरवट अशा वेगवेगळ्या समाजातील लोक किल्ल्यांचे बांधकाम करत होते. हे समजून घेण्यासाठी सिंधुदुर्ग किल्ला आणि रायगड किल्ला येथील उदाहरणे बोलकी आहेत. या दोन्हीही किल्ल्यांचे बांधकाम करताना गवंडी, सुतार, लोहार, पाथरवट अशा विविध जातींशी शिवरायांचा संबंध समतेचा आला. सिंधुदुर्ग आणि रायगड किल्ला व तेथील बांधकाम हे एका अर्थाने आठरापगड जातींच्या ऐक्याचे आणि एकोप्याचे प्रतीक आहे. गवंडी, सुतार, लोहार, पाथरवट हे वेगवेगळ्या जातीचे लोक एकमेकांबरोबर रहात होते. एकमेकांशी समतेचा व्यवहार करत होते. किल्ल्याचे बांधकाम करताना जात विसरून व जातीच्या पलीकडे जाऊन काम केले जात होते. यामुळे सिंधुदुर्ग आणि रायगड येथील बांधकाम हे केवळ बांधकाम नव्हे तर ते बांधकाम सामाजिक समतेचा क्रांतिकारी विचार होता. ती एक समतेची सामाजिक क्रांती होती. चार, शिवरायांचे आरमार हेदेखील समतेचे प्रतीक आहे. आरमारामध्ये मुस्लिम आणि कोळी, भंडारी, भोई, आगरी अशा लोकांचा सहभाग होता. यामुळे शिवरायांच्या आरमाराचा सामाजिक दृष्ट्या अर्थ समतेची क्रांती असा स्पष्ट होतो. पाच, मराठा अंमलदाराच्या हाताखाली ब्राह्मण, प्रभू, असत. तर प्रदेशांत बंदोबस्ताची जबाबदारी रामोशी समाजावर सोपवली होती (सरदेसाई गोविंद सखाराम, १९८८: ३७१, ३७५). या नोंदीचा अर्थ लष्करात सामाजिक समता, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा होता. शिवरायांचा एक जातीय वर्चस्वाला विरोध होता. त्यांनी बहुस्तरिय व्यवस्था केली होती. या अर्थाने शिवरायांच्या जीवनात बहुलता दिसते. तसेच समता आणि बंधुता दिसते. थोडक्यात शिवरायांच्या काळात सर्व जाती धर्मांमध्ये सामाजिक सलोखा निर्माण करण्याची राजकीय प्रक्रिया घडली. शिवरायांनी सामाजिक सलोख्यांमधून सामाजिक समतेचे प्रारूप विकसित केले होते. सामाजिक विषमतेवरील उपाय म्हणून त्यांनी सामाजिक सलोखा आणि सामाजिक समता या प्रारूपाचा विकास केला होता. हे प्रारूप प्रत्यक्ष रणांगणावरती लढणारे व कृतिशील स्वरूपाचे होते. त्यामुळे हे प्रारूप समता निर्माण करण्याची जबाबदारी स्वतः स्वीकारते. व्यक्तीने व समूहाने संघर्ष करून समता मिळविली पाहिजे अशी दिशा हे प्रारूप सूचवते.

**संदर्भ**

१) भोसले अरुण (२०२२), दक्षिण महाराष्ट्र: राजकीय चळवळी व नेतृत्व, डायमंड प्रकाशन, पुणे.

२) शेजवलकर, १९६४, श्रीशिवछत्रपती संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधनें, मराठा मंदिर प्रकाशन १, मुंबई.

३) पठाण इस्माईल, २०२१; छत्रपती शिवाजी महाराज, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी कोल्हापूर.

४) गर्गे स. मा.(संपा), १९८८, मराठी रियासत, खंड एक, गोविंद सखाराम सरदेसाई, १९८८, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

५) पगडी सेतू माधवराव, १९७१, (२०१२), शिवचरित्र एक अभ्यास, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर.

६) पवार सुधाकर, १९७८, मराठेशाहीतील पत्ररूप गद्य, शिवाजी



विद्यापीठ, कोल्हापूर.

७) खैरमोडे चांगदेव, (२०११) डॉ. भीमराव रामजी आंबेडकर खंड सहा, सुगाव प्रकाशन, पुणे.

८) खिलनानी सुनील, (२०१९), यांनी घडवला इतिहास, ( सविता दामले अनुवाद), मंजुल पब्लिकेशन हाऊस पुणे.

९) आंबेडकर बाबासाहेब २००५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता १९२० ते १९२८, डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १९, महाराष्ट्र शासन.

१०) Kuber Girish, (२०२१), Renaissance State the unwritten story of the making of maharashtra, HarperCollins publishers india.

# सरकारे पाडण्याची असुरी लालसा!

अनंत बागाईतकर

महाराष्ट्रातील शिवसेनेला यशस्वी खिंडार पाडून तेथील महाविकास आघाडीचे सरकार पाडण्यात भाजपला यश मिळाले. असाच प्रयोग त्यांनी मध्य प्रदेशात केला होता. तेथे काँग्रेसचे मुख्यमंत्री कमलनाथ यांचे सरकार होते. ज्याप्रमाणे महाराष्ट्रात भाजपला एकनाथ शिंदे मिळाले तसेच मध्य प्रदेशात काँग्रेस तोडण्यासाठी ज्योतिरादित्य शिंदे मिळाले होते. दोघेही शिंदेच! या दोन फंदफितुरांना हाताशी धरुन भाजपने आपली सत्तेची लालसा पूर्ण केली. सत्तेसाठी परधार्जिणेपणा करणाऱ्या काही व्यक्तींनी भारतीय इतिहासातही स्थान मिळवले आहे. जयचंद आणि मीरजाफर ही त्यांची नावे होती. त्यांनी शत्रुला मदत करुन फितुरीची ऐतिहासिक उदाहरणे घालून दिली. इतिहासातील काही दाखल्यांनुसार झांशीच्या राणीला ब्रिटिशधार्जिण्या ग्वाल्हेरच्या संस्थानिकांनी किल्ल्याचे दरवाजे उघडले नाहीत व परिणामी तिला धारातीर्थी पडावे लागले होते. महात्मा गांधींचा मारेकरी नथुराम याने जे पिस्तुल हत्येसाठी वापरले ते ग्वाल्हेरच्या शस्त्रागारातील होते अशीही माहिती दिली जाते. त्यामुळे त्या इतिहासाला जागूनच या दोन शिंद्यांनी फंदफितुरीची २१व्या शतकातील दोन उदाहरणे सादर केली. राजस्थानात त्यांनी सचिन पायलट यांना हाताशी धरण्याचा प्रयत्न केला. परंतु तो सफल होऊ शकला नव्हता. छत्तीसगढमध्ये देखील प्रयत्न करण्यात आले होते. परंतु तेथे खुद्द भाजपमध्येच सुंदोपसुंदी असल्याने प्रथम स्वतःचेच घर सांभाळण्याची कसरत भाजपला करावी लागली. पश्चिम बंगालमध्येही ममता बॅनर्जी यांना धडपणे राज्यकारभार करु न देण्याचा विडा भाजपने उचलला होता. परंतु तेथे 'उलटे स्थलांतर उर्फ पक्षांतर' सुरु झाले. त्यामुळे आपल्याच युक्त्या अंगाशी येत असल्याचे पाहून भाजपने तेथे फोडाफोडीचे राजकारण थांबवले आणि मग ईडी–सीबीआयचे धाकदपटशाचे राजकारण सुरु केले. अर्थात ठकाला महाठक भेटतोच. बिहारमध्ये नीतीशकुमार यांनी भाजपला धोबीपछाड देऊन ते शेरास सव्वाशेर असल्याचे सिध्द केले. पण जित्याची खोड मेल्याखेरीज जात नाही. बिहारमध्ये बत्तीशी पडल्याने चवताळलेल्या भाजपने झारखंडमधील बिगर भाजपचे म्हणजे काँग्रेस व झारखंड मुक्ति मोर्च्यांचे संयुक्त सरकार पाडण्याचे कारस्थान सुरु केले आहे. सर्व भारतात गल्लीपासून दिल्लीपर्यंत आपल्याच पक्षाचा एकछत्री अंमल असावा ही राक्षसी महत्वाकांक्षा यामागे आहे. हे कशासाठी ? एकदा सर्व राज्यांमध्ये आपली बाहुली सरकारे स्थापन केली की विश्वप्रिय ब्रह्मांडनायकांची जी अपूर्ण राहिलेली इच्छा आहे की एकाचवेळी देशात ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंतच्या निवडणुका घ्यायच्या



त्याच्यासाठी हा आटापिटा चालू आहे. परंतु ही सत्तालालसा येथेच थांबत नाही. कारण हाव आणि लालसा अमर्याद असते. आता या सत्तातुरांना देशाची राज्यघटना बदलून अध्यक्षीय राज्यपध्दती(अमेरिकेच्या धर्तीवर) लागू करण्याची लालसा आहे आणि या सर्व हालचाली त्या अंतिम उद्दिष्टाच्या दिशेने चालू करण्यात आल्या आहेत.

अलीकडेच पाटण्यात भाजपच्या विविध आघाड्यांचे संमेलन झाले. आघाड्या म्हणजे पक्षाची महिला आघाडी, युवा मोर्चा, वगैरे वगैरे. या संमेलनाला राष्ट्रीय अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा उपस्थित असणे ओघाने आलेच. मार्गदर्शनासाठी भाजपचे 'चाणक्य' म्हणून मानले जातात ते द्वितीय पोलादी पुरुष उर्फ




द्वितीय क्रमांक नेते उर्फ प्रति सरदार पटेल उर्फ केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शहा हे उपस्थित होते. या संमेलनात माननीय नड्डा यांनी महाराष्ट्रातील ताज्या घडामोडींचा संदर्भ देऊन शिवसेना हा पक्ष कसा संपलेला आहे याचे वर्णन केले. याच ओघात त्यांनी असेही भाकित केले की भाजपच्या यशाची घोडदौड लक्षात घेता आगामी काळात प्रादेशिक पक्षांचे अस्तित्वच संपणार आहे. जगतप्रकाश नड्डाराव (त्यांना आदरार्थी नड्डाराव म्हटले आहे)यांच्या विद्वत्तेबद्दल आदर करावा असेच त्यांचे हे भाकित व वक्तव्य आहे. यातून त्यांच्या भारतीय इतिहास, राजनीतीच्या अगाध व सखोल ज्ञानाचेही दर्शन होते. अर्थात नड्डाराव यांचे हे स्वतःचे वक्तव्य असावे काय ? शंका आहे. कारण सध्या भाजपमध्ये 'एचएमव्ही'चीच तबकडी वाजवली जात असते. 'एचएमव्ही' म्हणजे 'हिज मास्टर्स व्हॉईस'! त्यामुळे नड्डांकडून त्यांच्या 'मास्टरां'नी जी संथा घोकून घेतली तीच त्यांच्या मुखातून प्रकट झाली. पण नुसत्या वरवरच्या शब्दांवर जाऊ नका. 'भावना को समझो!' आता येथे 'भावना' हा शब्द अतिमवाळ किंवा अतिसौम्य किंवा मिळमिळीत ठरेल. याला म्हणतात 'राक्षसी महत्वाकांक्षा'! (स्वातंत्र्यापूर्वी वीर वामनराव जोशी यांनी लिहिलेल्या नाटकाचे शीर्षक) सर्व देशातले प्रादेशिक पक्ष संपावेत, विरोधी पक्ष नष्ट व्हावेत आणि केवळ देशात भाजप नावाचा पक्ष शिल्लक राहून त्याचा संपूर्ण देशावर एकछत्री अंमल रहावा आणि या पक्षाच्या नेत्यांना सत्तेचे श्रीखंड अखंड, अविरत खाता येता रहावे ही ती असुरी इच्छा त्यातून डोकावते. एक चांगले झाले की त्यांच्या मुखातून भाजपच्या भावनेचे जे राष्ट्रीय प्रकटीकरण झाले त्यामुळे देशातले सर्वच राजकीय पक्ष सावधान होणार आहेत. तीच सावधगिरी बिहारमध्ये नीतीशकुमार यांनी दाखवली.

बिहारमधील राजकीय उलथापालथ अचानक झाली नाही. बिहारमध्ये २०२०मध्ये विधानसभा निवडणूक झाली. या निवडणुकीत नीतीशकुमार यांचा 'जेडी-यू' किंवा संयुक्त जनता दल हा पक्ष आणि भाजपची आघाडी किंवा 'गठबंधन' होते. या निवडणुकीला नीतीशकुमार यांनी राष्ट्रीय जनता दलाला २०१७ मध्ये केलेल्या दगाफटक्याची पार्श्वभूमि होती. २०१५ मध्ये नीतीशकुमार यांनी भाजपची साथसंगत सोडून आपले राजकीय विरोधक लालूप्रसाद (राष्ट्रीय जनता दल) यांच्याबरोबर हातमिळवणी केली. २०१५ची विधानसभा निवडणूक बरोबर लढवली व आघाडी पूर्ण बहुमताने सत्तेतही आली. परंतु आर्थिक गैरव्यवहारांच्या निव्वळ आरोपांवरुन नीतीशकुमार यांनी राजीनामा देऊन लालूप्रसाद यांच्याबरोबरची आघाडी तोडली व रातोरात भाजपबरोबर हातमिळवणी करुन सरकार स्थापन केले होते. २०२०ची निवडणूक त्यांनी भाजपच्या भागीदारीत

लढवली. दुर्दैवाने भागीदारीमध्ये भाजपला मोठा लाभ झाला आणि नीतीशकुमार यांना फटका बसला. नीतीशकुमार यांना फक्त ४५ जागांवर समाधान मानावे लागले. भाजपला त्यावेळी ७४ जागा मिळाल्या आणि नंतरच्या पोटनिवडणुकात त्यांचे संख्याबळ वाढले व भाजप हा सर्वाधिक जागा मिळवलेला पक्ष झाला. एवढे होऊनही भाजपने नीतीशकुमार यांचे मुख्यमंत्रीपद कायम ठेवले. एकप्रकारे त्यांना राजकीय मिंधे करण्याचा हा प्रकार होता.

नीतीशकुमार यांनी प्रथम त्यास नकार देऊन मागाहून ती बाब स्वीकारली होती व सरकार चालू राहिले. परंतु कनिष्ठ भागीदाराला (त्यातही राजकारणात) नेहमीच मानहानि, मानखंडना सहन करावी लागते. तो प्रकार हे सरकार स्थापन झाले तेव्हापासून सुरु झाला होता. मोठा भागीदार म्हणून भाजपने जास्त खाती पदरात पाडून घेतली. त्यानंतर नीतीशकुमार यांच्या मानहानीची मालिका सुरु होणे अपेक्षितच होते. साधी गोष्ट. पाटणा किंवा बिहार विश्वविद्यालयालयास केंद्रीय विद्यापीठाचा दर्जा द्यावा अशी मागणी नीतीशकुमार यांनी केली होती. या विद्यापीठाच्या शताब्दी समारंभानिमित्त त्यांनी ही मागणी समस्त बिहारवासींतर्फे केली होती. या समारंभाला साक्षात विश्वप्रिय ब्रह्मांडनायक उर्फ पंतप्रधानसाहेब (भाजपमध्ये साहेब हे विशेषण त्यांच्यासाठी राखीव आहे) उपस्थित होते व त्यांच्या उपस्थितीत त्यांनी ही मागणी केली होती. ती मागणी साफ धुडकावून लावण्यात आली. नीतीशकुमार यांची बिहारला विशेष 'पॅकेज' द्यावे याबाबत नेहमीच आग्रही भूमिका राहिली आहे. ती त्यांनी वेळोवेळी व्यक्त देखील केली. त्यांची ही मागणीही फाट्यावर मारण्यात आली. असे अनेक प्रसंग आले.

यानंतरचा प्रकार अधिक गंभीर होता. २०१९ मध्ये ब्रह्मांडनायक पुन्हा पंतप्रधानपदी आरूढ झाले. मंत्रिमंडळात कोणत्या पक्षाला किती स्थान द्यायचे याचा 'फॉर्म्यूला' काय असावा यावर चर्चा झाली. सर्व मित्रपक्षांना एकेक कॅबिनेट मंत्रीपद देण्याचे भाजपच्या सूत्रधारांनी जाहीर केले. यामध्ये कोणत्या पक्षाला किती जागा मिळाल्या व त्या प्रमाणात त्यांना मंत्रीपदे द्यायची हे सूत्र रद्द करण्यात आले. नीतीशकुमार यांना हे सूत्र अमान्य होते आणि त्यांनी त्यांच्या संख्याबळाच्या प्रमाणात चार मंत्रीपदांची मागणी केली. ती अमान्य करण्यात आल्यानंतर नीतीशकुमार यांनी मंत्रिमंडळात त्यांचा पक्ष सामील होणार नसल्याचे जाहीर केले. मात्र राज्यसभेच्या उपसभापतीपदाचा त्यांनी अपवाद केला. परंतु नीतीशकुमार यांच्या पक्षात काही 'एकनाथ शिंदे' होतेच. भाजपने त्यांच्या फोडाफोडीच्या नीतीनुसार काम सुरु केले. त्यांनी नीतीशकुमार यांचे एकेकाळचे विश्वासू व पक्षाच्या खजिन्याची जबाबदारी सांभाळणारे आरसीपी सिंग यांना फोडण्यासाठी काम सुरु केले.

पंतप्रधानसाहेबांनी दोन वर्षांनंतर केलेल्या मंत्रिमंडळ फेररचनेत आरसीपी सिंग यांना मंत्रिमंडळात सामील केले. हे तर चक्क नीतीशकुमार यांच्या पक्षप्रमुख म्हणून असलेल्या अधिकारांनाच आव्हान होते. सिंग यांनी मंत्रीपद स्वीकारले व आपलेच पक्षप्रमुख असलेल्या नीतीशकुमार यांना फाट्यावर मारले. हा अपमान नीतीशकुमार यांच्या जिव्हारी झोंबणे स्वाभाविक होते. पण नीतीशकुमार हे अतिशय परिपक्व राजकीय नेते आहेत. त्यांनी झटक्यात प्रत्युत्तर किंवा प्रतिक्रिया देण्याचे टाळले. त्यांनी संधीची वाट पाहण्याचे ठरवले. सिंग हे भाजपच्या भजनी लागले आहेत व भाजपधार्जिणे झाल्याचे त्यांनी हेरले होते. त्यांना कधी मात द्यायची याचे गणित त्यांनी मनाशी ठरवले होते. सिंग हे राज्यसभेचे सदस्य होते. त्यांची मुदत २०२२च्या जूनमध्येच संपत होती. नीतीशकुमार यांनी त्यांना पुन्हा उमेदवारी न देण्याचा निर्णय केला. यामुळे



सिंग यांचे मंत्रीपद आपोआपच रद्द झाले. नीतीशकुमार यांनी सिंग यांना त्यांची जागा दाखवून दिली तसेच त्यांच्या पक्षात त्यांचा अधिकार चालतो हेही त्यांनी भाजपला दाखवून दिले. आता प्रश्न एवढाच आहे की नीतीशकुमार यांनी भाजपची साथ सोडलेली असल्यामुळे राज्यसभेचे उपसभापतिपद भूषविणारे हरिवंश काय करणार ? हरिवंश यांना मिळालेली उपसभापतिपदाची झूल त्यांना इतकी भावलेली आहे की ती उतरविण्यास ते तयार होतील की नाही याचे उत्तर येणारा काळच देईल. आपल्या पक्षाने व नेत्याने भाजपची साथ सोडलेली असल्याने आपणही तेच केले पाहिजे यासाठी ते तयार होणार काय हा प्रश्न आहे. पदासाठीचा लोचटपणा अनेक व्यक्तींच्या अंगी भिनलेला असतो. बहुधा हा नियम माहिती असल्यानेच नीतीशकुमार यांच्या पक्षाने हरिवंश यांचा अपवाद करुन त्यांना त्यांच्या पदाचा राजीनामा देण्यास सांगितले नाही आणि ते

पदावर राहू शकतात असे जाहीर केले आहे. आता प्रश्न आहे भाजपचा कारण त्यांना आता हरिवंश चालतील काय याचे उत्तर अपेक्षित आहे.

हे थोडेसे विषयांतर झाले. परंतु आरसीपी सिंग हे पैसेवाले नेते आहेत. त्या जोरावरच त्यांनी नीतीशकुमार यांचा विश्वास संपादन केला होता आणि राज्यसभेत ते त्यांच्या पक्षाचे गटनेतेही झाले होते. त्यातूनच बहुधा त्यांच्या महत्वाकांक्षेला पंख फुटले असावेत. ते भाजपच्या पूर्ण आहारी गेले. पण त्यांचा भाजपधार्जिणेपणा दिवसेंदिवस पक्षाला त्रासदायक होऊ लागला होता व आता तर त्याचा स्फोटच झाला. इतर पक्षांमध्ये फंदफितुरी घडवून आणण्याचा राष्ट्रीय धंदा उघडलेल्या भाजपला आरसीपी सिंग यांच्या रुपाने दलाल मिळाला आणि त्यांच्या मार्फत त्यांनी नीतीशकुमार यांचा पक्ष पोखरण्यास सुरुवात केली. आरसीपी सिंग हे नीतीशकुमार यांचा गृहजिल्हा असलेल्या नालंदा जिल्ह्यामधीलच आहेत.






ते देखील व त्यांच्या व नीतीशकुमार यांच्यातील जवळीकीचे कारण होते. सिंग यांनी भाजपच्या मदतीने नालंदा जिल्हा आणि तेथील जेडी-यू कार्यकर्त्यांचे मेळावे घेण्यास सुरुवात केली होती. यामागे त्यांचा हेतु फार काही चांगला होता हे न समजण्याइतके नीतीशकुमार दूधखुळे नाहीत. त्यांना सिंग यांचे कर्तेकरविते कोण याचा अंदाज आला होता. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील भाजपचा 'एकनाथ शिंदे' प्रयोग अगदी ताजाताजा त्यांच्यासमोर होता. नीतीशकुमार हे विलक्षण सावध नेते आहेत. त्यांना एकंदरीत कावा काय आहे याचा अंदाज आला आणि मग 'आक्रमण हाच बचावाचा सर्वोत्तम मार्ग'(ऑफेन्स इज द बेस्ट डिफेन्स) या सूत्रानुसार 'अॅक्शन' केली. भाजपबरोबचा संसार खूप झाला आणि आता तो मोडण्याची वेळी आल्याचे ओळखून त्यांनी भाजपबरोबरचे संबंध संपुष्टात आणले.

ही 'अॅक्शन' करण्यापूर्वी नीतीशकुमार यांनी पुढील गोष्टींची पूर्वतयारी पूर्णपणे करुन ठेवली होती. याची आवश्यकता होती. कारण या प्रयोगात 'टायमिंग'- अचूक वेळ साधणे - याला अनन्यसाधारण महत्व होते. ती बाब नीतीशकुमार यांनी हेरली होती. त्यानुसार त्यांनी भाजपबरोबरच्या संबंध-विच्छेदापूर्वीच आपल्या भावी संबंध व संसाराची तजवीज करुन ठेवली होती. ही योजना त्यांनी अतिशय काळजीपूर्वक व कमालीच्या गुप्ततेने तयार केली होती. या योजनेत कुठेही जराशी देखील फट ठेवण्यात आली नाही कारण अशा फटी राहिल्यास त्याचा फायदा भाजप आणि त्यांची केंद्रीय सत्ता घेते याचा अनुभव त्यांना होता. म्हणूनच भाजप, त्यांचे केंद्रीय नेते यांना गाफील ठेवणे आणि सावध झाल्यानंतरही त्यांना त्यांच्या कारवाया करण्यासाठी फारसा वाव न ठेवणे अशीच योजना त्यांना आखावी लागली होती. त्यामुळेच त्यांनी प्रथम भावी राजकीय समीकरण पक्के केल्यानंतरच भाजपला दूर सारले. भाजपच्या लक्षात येण्यापूर्वी किंवा त्यांनी नवे सरकार स्थापन होण्यात खोडे घालण्याआधीच नीतीशकुमार हे आठव्यांदा मुख्यमंत्रीपदी आरूढ देखील झाले होते. भाजपच्या चाणक्यांना काहीच कळले नाही. ते नावाचेच चाणक्य राहिले. चाणक्याच्या भूमीतले (मगध म्हणजेच सध्याचा बिहार) नीतीशकुमार त्यांच्याहून चलाख निघाले. त्यांनी कधी शह देऊन मात केली हे भाजपच्या लक्षात आले नाही.

पुढे काय? 'राजकारणात किंवा आंतरराष्ट्रीय राजकारणातही कुणीही कायमस्वरुपी शत्रु किंवा मित्र नसतात. कायमस्वरुपी असतात ते हितसंबंध!' राजकारणाचा हा मूलभूत नियम आहे. जे या नियमावर श्रध्दा ठेवतात त्यांना राजकारणाचे धागेदोरे लक्षातही येतात आणि त्यांना धक्केही बसत नाहीत. तेवढ्या तटस्थ दृष्टीनेच राजकारणाकडे पाहता आले पाहिजे. त्यामुळे बिहारच्या राजकीय स्थित्यंतराचा पहिला परिणाम

हा होऊ शकतो की नीतीश-तेजस्वी यादव सरकारला स्थिर होऊ न देणे ते खिळखिळे होऊन पडेल कसे यासाठी भाजपतर्फे पराकाष्टेचे प्रयत्न, कारवाया, कारस्थाने सुरु होतील. त्याचप्रमाणे या सरकारच्या नेत्यांविरुध्दच्या जुन्यापान्या केसेस काढून त्यांना सळो की पळो करण्याचे प्रकार सुरु केले जातील. यासाठी केंद्र सरकारकडे 'ईडी' नावाची यंत्रणा हाताशी आहे. ही यंत्रणा आणि तिचा दुरुपयोग आता जगजाहीर झालेला आहे. आपल्या राजकीय विरोधकांना त्रस्त करण्यासाठी तिचा वापर करण्याचे 'भाजप-तंत्र' सामान्य माणूसही जाणू लागला आहे. त्यामुळे तेजस्वी यादव आणि इतरही नेत्यांना या यंत्रणांच्या ससेमिऱ्याला तोंड द्यावे लागू शकते. या प्रकारचे राजकारण करण्यात भाजपने विधिनिषेधशून्यतेचा आणि कोडग्या सूडबुध्दीचा कळस गाठलेला आहे. तेव्हा हे हल्ले उघडपणे सुरु होतील. त्याचबरोबर फोडोफोडीसाठी पैशाचा यथेच्छ व अमर्याद वापरही सुरु होईल. याच्या जोडीलाच बिहारची आर्थिक नाकेबंदी सुरु करण्यात येईल. याबाबतही कोणतीही लज्जा न बाळगता बिहारचे आर्थिक नाक दाबण्याचे प्रकार सुरु होतील. थोडक्यात बिहारच्या या नव्या राज्यकर्त्यांना धडपणे राज्यकारभार करु न देण्यासाठी वाटेल त्या थराला जाण्याचे प्रकार भाजपतर्फे केले जातील हे निःसंशय! या अडचणी व अडथळ्यांना तोंड देत नीतीश व तेजस्वी यांच्या सरकारला पुढे जावे लागणार आहे. त्याची सुरुवात झाली आहे. राष्ट्रीय जनता दलाच्या काही आमदारांवर छापेमारी सुरु करण्यात आली आहे. दिल्लीतल्या एका मॉलमध्ये उपमुख्यमंत्री तेजस्वी प्रसाद यांचे पैसे गुंतले असल्याचे आरोप सुरु झाले आहेत. अर्थात नीतीशकुमार व तेजस्वी यांना या गोष्टींची पूर्वकल्पना असणारच व त्यांनी त्या पध्दतीची मोर्चेबांधणीही सुरु केलेली आहे. नव्या सरकारवरील विश्वासदर्शक ठरावावर बोलताना नीतीशकुमार यांनी भाजपच्या पापाचे पाढे वाचले. बिहारच्या राजकीय स्थैर्यासाठी सहन केलेल्या मानहानीचे दाखलेही दिले परंतु पक्षात फूट पाडून स्वतःचे सरकार स्थापन करण्याचे मनसुबे भाजपने रचण्यास सुरुवात केल्यानंतर राजकीय अस्तित्वासाठी त्यांनी हे अंतिम पाऊल उचलून भाजपशी नाळ तोडल्याचेही स्पष्ट केले.

हा एक भाग झाला. दुसरीकडे नीतीशकुमार यांच्या या निर्णयामुळे सामाजिक न्यायावर आधारित राजकारण करणाऱ्या राजकीय पक्षांना नवीन बळ मिळणार आहे. नीतीशकुमार यांचा चेहरा त्यांना मिळणार आहे. त्यामुळेच नीतीशकुमार यांच्या या 'उचित वेळी' केलेल्या निर्णयाचे बहुतेक विरोधी पक्षांनी स्वागतच केले आहे. नीतीशकुमार यांनी या नव्या बदलाबरोबरच विरोधी पक्षांच्या ऐक्यासाठी प्रयत्न करण्याचेही सूतोवाच केले आहे. यामुळे विरोधी पक्षांच्या मालिकेत एका नव्या चेहऱ्याचा समावेश झालेला आहे. हिंदी पट्ट्यातील एक वरिष्ठ चेहरा म्हणून त्यांचे स्थान राहील. सध्या विरोधी पक्षांच्या गोटात सोनिया व राहूल गांधी यांचे स्थान प्रमुख मानले जात असले तरी प्रादेशिक पक्षांना काँग्रेसची दादागिरी आवडणारी नाही. ती नाराजी वेळोवेळी व्यक्त झालेली आहे. विरोधी गटातील आणखी एक मुख्य नाव शरद पवारांचे आहे. ते विरोधी ऐक्यासाठी प्रयत्नशील आहेत. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याकडे देखील विरोधी पक्षांच्या व विशेषतः प्रादेशिक पक्षांच्या मुख्य नेत्या म्हणून पाहिले जाते. परंतु त्यांच्या काही भूमिका शंकास्पद राहिल्या आहेत. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत त्यांनी प्रथम तटस्थ राहण्याची घोषणा करुन विरोधी ऐक्याला काहीसा तडा दिला होता. आता तर त्या जवळजवळ राजकीय सूक्ष्मात गेल्यासारख्या वागत आहेत. विरोधी पक्षांच्या बैठकांना देखील त्या अनुपस्थित राहताना दिसतात. त्यामुळे केंद्र सरकारने त्यांच्या यंत्रणांमार्फत त्यांना जे त्रास दिले आहेत त्यामुळे त्या बेजार झाल्या असाव्यात व त्यामुळेच त्यांची केंद्राला विरोध करताना दमछाक झाल्याचे दिसून येते. तूर्तास त्यांनी काहीसे शांत



राहण्याचे ठरवलेले आढळून येते. विरोधी पक्षांच्या ऐक्यासाठी जे नेते प्रयत्नशील आहेत त्यामध्ये तेलंगणाचे मुख्यमंत्री के.चंद्रशेखर राव आहेत. द्रमुकचे तमीळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन आहेत. मार्क्सवादी नेते सीताराम येचुरी आहेत. परंतु यामध्ये नीतीशकुमार यांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण ठरणारे आहे कारण तूर्तास तरी त्यांची ज्येष्ठता, भाजपला अंगावर घेण्याची क्षमता त्यांनी सिध्द केलेली असल्याने मरगळलेल्या विरोधी पक्षांना काहीसे बळ मिळाले आहे. त्यांचा योग्य वापर केल्यास विरोधी पक्षांना मोठीच मदत होईल. नीतीशकुमार यांनी स्वतःसाठीही आगामी काळातील भूमिका निश्चित केली असावी. कारण या बंडानंतर त्यांनी पत्रकारांशी बोलताना २०२४ मधील लोकसभा निवडणुकीबद्दल टिप्पणी केली





आणि सध्याच्या पंतप्रधानांची गादी टिकणार आहे काय असा सवाल केला. याचा अर्थ दोन वर्षांनंतर ते त्यांच्यासाठी राष्ट्रीय पातळीवरील भूमिका निवडू इच्छित असल्याचे स्पष्ट करणारा आहे. यापूर्वीही त्यांनी एक-दोन वेळेस राजकारण संन्यासाच्या गोष्टी केलेल्या होत्या. अर्थात राष्ट्रीय राजकारणाचा पर्याय त्यांना अधिक सोयीचा राहणार आहे.

भाजपने महाराष्ट्रात त्यांच्या फंदफितुरी माजविण्याच्या षड्यंत्राचा यशस्वी वापर केला. परंतु महाराष्ट्राची परतफेड त्यांना बिहारमध्ये करावी लागली. तसेच प्रादेशिक पक्षांना तुच्छ लेखणे आणि त्यांना संपविण्याची भाजपची भाषा त्यांच्या अंगाशी आल्याखेरीज राहणार नाही. अकालीदल, शिवसेना, तेलगु देशम(चंद्रबाबू नायडू), जेडी - यू(नीतीशकुमार), तृणमूल काँग्रेस, उत्तर प्रदेशातील सामाजिक न्यायाचा पुरस्कार करणारे लहानलहान पक्ष या सर्वांनाच गिळंकृत करण्याचा प्रकार भाजपने सुरु केला. महाराष्ट्रात शिवसेनेत त्यांनी बंडखोरी घडवून आणली तरी पक्ष अद्याप शाबूत आहे. त्यामुळेच प्रादेशिक पक्ष संपविण्याची भाषा लोकशाहीविरोधी आहे. तमीळनाडूत जोपर्यंत द्रविडी राजकारणाचा पगडा असेल तोपर्यंत प्रादेशिक पक्षच वर्चस्व गाजवणार आहेत. तेलंगणा, आंध्र येथे तोच प्रकार आहे. ओडीशामध्ये नवीन पटनाईक यांचा बिजू जनता दल हा पक्ष अद्याप कणखर आहे. या पार्श्वभूमीवरच बिहारमधील षड्यंत्र असफल ठरल्यामुळे भाजपचे चाणक्य उर्फ केंद्रीय गृहमंत्री लगेचच ओडीशा व झारखंड येथे गेले व तेथे त्यांनी झारखंडमधील सत्तांतर उर्फ फंदफितुरीचे कारस्थान शिजत असल्याचे संकेत दिले. याच सुमारास काँग्रेसच्या तीन चार आमदारांना कोट्यवधि रुपये पोचवल्याची बाबही उघडकीस आली. त्यामुळे महाराष्ट्र आणि इतरही राज्यांमध्ये भाजपने अमलात आणलेली 'खोके-नीती' झारखंडमध्येही वापरात आल्याचे उजेडात आले. भाजपने २०१९ मध्ये पुन्हा सत्तेत आल्यानंतर मध्य प्रदेशातले काँग्रेसचे सरकार पाडले. महाराष्ट्रातले पाडले. पश्चिम बंगाल. तेलंगणा, राजस्थान येथील सरकारे पाडण्याचे खूप प्रयत्न करण्यात आले पण त्यात भाजपला अपयश आले. बिहारचा धडा त्यांना मिळाला आहे. जगतप्रकाश नड्डा यांनी प्रादेशिक पक्ष संपतील असे भाकित केले असले तरी भारतात पक्ष संपत नसतात व नाहीत हे वास्तव त्यांना बहुधा माहिती नसावे. रिपब्लिकन पक्षाची अनेक शकले झाली पण तो अद्याप अस्तित्वात आहे आणि त्यातील एका गटाचे नेते रामदास आठवले भाजपचे जिवाभावाचे सहकारी झाले आहेत. खुद्द भाजपची १९८४ मधील अवस्था काय होती याचे त्यांना विस्मरण झाले असावे. त्यावेळी भाजपचे केवळ दोन खासदार होते. त्यामुळे लहान पक्षांची हेटाळणी करुन किंवा त्यांना तुच्छ लेखून राजकारण करता येणार नाही. पण सर्व देशात दिल्लीपासून गल्लीपर्यंत भाजपचेच अस्तित्व असावे ही महत्वाकांक्षा असुरी आहे. लोकशाहीत सर्वांना स्थान असते ते नाकारण्याची ही अहंकारी, घमेंडखोर आणि उद्दाम व उर्मट अशी राजकीय भूमिका आहे. त्याचे फळ भाजपला निश्चित मिळाल्याखेरीज राहणार नाही. तो दिवस फार दूर नाही!

# पाकिस्तानात महापूराचा हाहाकार

संकटात सापडलेल्या शेजारील राष्ट्रांना मदत करणं ही प्रत्येक देशाची जबाबदारी आणि कर्तव्य असतं. आपला शेजारील पाकिस्तान महापूराच्या अभूतपूर्व संकटात सापडला आहे. देशाच्या एक तृतीयांश पेक्षा अधिक भागात पूराने हाहाकार माजविला आहे. बलुचिस्तान, खैबर पख्तुनख्वा आणि सिंधच्या दक्षिण भागात पूराचे सर्वात जास्त दुष्परिणाम झाले आहेत. याशिवाय, राजकीय अस्थिरता आणि प्रचंड महागाईमुळे लोकांच जगणं कठीण झालं आहे. सामान्य पाकिस्तानी माणसाला डोळ्यासमोर ठेवून भारताने अशा वेळेस पाकिस्तानला मदत केली पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देखील मदतीची तयारी दाखवली आहे. संकटात सापडलेल्या (युएन) देखील पाकिस्तानला मदत करण्याची सगळ्या देशांना आणि लोकांना विनंती केली आहे. कराची शहरात टोमॅटो ४९० (पाकिस्तानी) रुपये किलोने विकली जात आहे तर कांद्याची किंमत (पाकिस्तानी) २०० रुपये आहे. यातूनही पाकिस्तानात महागाई किती झाली आहे, हे आपल्या लक्षात येतं. पाकिस्तान तयार कपडे मोठ्या प्रमाणात निर्यात करतं. त्यासाठी लागणाऱ्या कापसाचं प्रचंड नुकसान झालं आहे. जवळपास ६० टक्के कापसाची शेती उध्वस्त झाली असल्याचा अंदाज आहे.

पाकिस्तानशी असलेले मतभेद बाजूला ठेवून, अशा वेळेस, पाकिस्तानच्या लोकांना मदत करणं आवश्यक



शेजारील राष्ट्राच्या मदतीला भारत नेहमी उभा राहिला आहे. अलीकडे भारताने श्रीलंका आणि अफगाणिस्तानला मोठ्या प्रमाणात मदत केली आहे. २०१० मध्ये देखील पाकिस्तानात पूर आलं असताना भारताने मदत केली होती.

**जतिन देसाई**

आतापर्यंत १५०० हून अधिक लोक मृत्युमुखी पडले आहेत. प्रत्यक्ष मनुष्यहानी याहून कितीतरी अधिक असण्याची शक्यता आहे. ३.२५ लाख घरे उध्वस्त झाली आहेत. काही लाख जनावरे मेली आहेत. २० लाखहून अधिक एकर जमिनीचं नुकसान झालं आहे. जवळपास ३.५ कोटी लोकांवर त्याचं परिणाम झालं आहे आणि त्यातले बहुसंख्य विस्थापित झाले आहेत. संयुक्त राष्ट्राने असल्याची मांडणी भारतात अनेक जण करत आहे. दोन्ही देशात या संदर्भात अनौपचारिकरित्या चर्चा होत असल्याची देखील माहिती मिळत आहे. टाइम्स ऑफ इंडियाने 'पाकिस्तानला मदत करा' अश्या शिर्षकाने संपादकीय देखील लिहिलं आहे. २०१९ च्या ऑगस्ट महिन्यात भारताने जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे अनुच्छेद ३७० रद्द करण्याच्या घेतलेल्या निर्णयाच्या विरोधात पाकिस्तानने भारताशी व्यापार बंद केला होता. त्यानंतर अपवाद म्हणून कोरोना काळात काही औषधे आणि त्यानंतर अफगाणिस्तानला भारताने केलेल्या अन्नधान्याच्या पुरवठ्यासाठी वाघा मार्गाचा उपयोग करण्यात आला होता.

पाकिस्तानच्या एका मंत्रीने भारतातून भाज्या, फळं सारखी वस्तू आयात केली पाहिजे, असं म्हटलं आहे. अन्नधान्याच्या वाढत्या किमती लक्षात घेऊन पाकिस्तानच्या वेगवेगळ्या चेंबर ऑफ कॉमर्सने भारतातून टोमॅटो, कांदे इत्यादी वस्तू आयात करावीत अशी मागणी केली आहे. फैसलाबाद चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीने म्हटलं आहे," शेजारील राष्ट्रांशी आणि त्यातही भारताशी व्यापार महत्त्वाचा आहे. या व्यापारामुळे ग्राहकांना भाज्या आणि फळं स्वस्त दरात मिळू शकेल." लाहोर मार्केट कमिटीने म्हटलं आहे की भारतातून भाज्या आणि फळ आयात करण्याचा निर्णय सरकारने तातडीने घेतला पाहिजे. इराणहून भाज्या आयात करणं महाग पडणार कारण इराणने आयात आणि निर्यातीवर कर वाढवल्या असल्याचं त्यांच म्हणणं आहे.

तीन कोटीहून अधिक लोकांचं पुनर्वसन करणे सोपं नाही. अनेक देशांच्या लोकसंख्येपेक्षा ही संख्या जास्त आहे. या महापुरामुळे अंदाजे १० अब्ज अमेरिकन डॉलर एवढं नुकसान झालं असल्याचं आता सांगण्यात येत आहे. परंतु त्यापेक्षा कितीतरी अधिक नुकसान झालं असल्याचं पाकिस्तानच्या कार्यकर्ते सांगतात. पाकिस्तानात जुलै महिन्यात फुगवटाचा दर २४.८% तर ऑगस्टमध्ये २७.२६ % एवढा होता. यातून देखील पाकिस्तानची कोसळत असलेली अर्थव्यवस्था स्पष्ट होते. मोठमोठ्या डोंगरामुळे बलुचिस्तान, खैबर पख्तुनख्वाच्या काही भागात मदत पोहोचणे देखील कठीण आहे. पाकिस्तानला तातडीने आवश्यकता आहे अन्नधान्याची, भाज्या, औषध इत्यादी वस्तूंची. महापूरानंतर अनेकदा रोगाची साथ पसरण्याची शक्यता असते. साथ पसरू नये यासाठी देखील तातडीने पाकिस्तानने पावलं उचलण्याची गरज आहे. आपण याबाबतीत निश्चित मदत करू शकतो. संकटाच्या काळात मदत करणं हा मानव धर्म आहे, हे आपण लक्षात ठेवलं पाहिजे. या दृष्टीनेच तालिबानची सत्ता असताना देखील आपण अफगाणिस्तानला अन्नधान्याचा मोठ्या प्रमाणात पुरवठा केला आहे, हे विसरता कामा नये. अशा प्रकारच्या मदतीमुळे लोकांच्या मनात आपल्याबद्दल सहानुभूती निर्माण होते, हे पण लक्षात ठेवलं पाहिजे.





पाकिस्तानात आलेल्या या महापूराचा धडा संपूर्ण जगाने घेतला पाहिजे. हवामान बदलाच्या संकटाने आपल्यासमोर कश्य स्वरूपाची आव्हान उभी केली आहेत हे यातून लक्षात येईल. दक्षिण आशिया बद्दल बोलायचं झालं तर अलीकडे भारत, पाकिस्तानात गरमीचं प्रमाण वाढलं आहे आणि पाऊसाच्या वेळात देखील बदल होत चालला आहे. पाकिस्तानात पाऊस जुलैमध्ये सुरू होतो आणि सप्टेंबर पर्यंत असतो. यावेळेस पाऊस चक्क एक महिन्या आधी म्हणजे जूनमध्ये सुरू झाला. दरवर्षी होणाऱ्या सरासरी पाऊसापेक्षा ३ पटीने अधिक पाऊस ऑगस्ट महिन्यातच झाला. काही

ठिकाणी तर ८ पटीने जास्त पाऊस झाला. पाकिस्तानच्या इतिहासात एवढा पाऊस आणि महापूर पहिल्यांदाच झाला. हवामान बदलाचे दुष्परिणाम कश्या स्वरूपाचे होऊं शकतात याची ही 'झलक' आहे. आंतरराष्ट्रीय समुदायाने हे लक्षात घेतलं पाहिजे. पाकिस्तानच्या महापूरापेक्षाही अधिक वाईट परिणाम पुढच्या काळात जगाला सहन करावे लागण्याची शक्यता आहे. ही गोष्ट लक्षात घेऊन आंतरराष्ट्रीय समुदायाने आवश्यक पाऊलं उचलली पाहिजे. जगाचा विचार केल्यास तुलनेनं पाकिस्तानात कार्बन उत्सर्जन कमी आहे पण हवामान बदलामुळे दुष्परिणाम सहन करणाऱ्या देशांच्या यादीत पाकिस्तान आठव्या क्रमांकावर आहे.

दक्षिण आशिया याबाबतीत अत्यंत संवेदनशील आहे. दक्षिण आशियातील राष्ट्रांनी आणि साऊथ एशियन असोसिएशन फॉर रीजनल कॉ–ओपरेशनने (सार्क) या संदर्भात एकत्रित पाऊलं उचलण्याची आवश्यकता आहे. सार्कला हवामान बदलाचा मुद्यांवर लवकरात लवकर सक्रिय केलं पाहिजे.

पाकिस्तानात राजकीय अस्थिरता आहे. त्याचंही मदत कामावर परिणाम होणं साहजिक आहे. या अभूतपूर्व महापूराला तोंड देण्यासाठी सर्व पक्षांनी – किमान या मुद्या पुरतं तरी – एकत्र आले पाहिजे. या वर्षाच्या सुरुवातीला इम्रान खान यांची सत्ता गेली आणि पाकिस्तान मुस्लिम लीगच्या (एन) नेतृत्वाखाली शाहबाझ शरीफ यांची सरकार आली. तेव्हापासून इम्रान खान



पाकिस्तानातील हिमनदी



हिंदू कुश

हिंदू कुश, काराकोरम आणि हिमालय अशी तीन उंच पर्वतांची रांग पाकिस्तानात आहे. ७२५३ हिमनद्या किंवा बर्फाची नदी (ग्लेशियर) पाकिस्तानात आहे. हिमनद्यांच वितळणं हे मोठं संकट आहे. भारतातही जवळपास ९००० हिमनद्या आहेत. सियाचीन येथील हिमनदी वितळत असल्याचे अहवाल अधून मधून येत असतात. भारतात सर्वात मोठी हिमनदी सियाचीन येथे आहे आणि ते ७८ किलोमीटर लांब आहे. भारतात १० हजार पेक्षा अधिक हिमनद्या आहेत. या मे महिन्यात पाकिस्तानच्या अनेक शहरात ५०ओ सेल्सिअसहून अधिक तापमान होतं. याचा अर्थ आधी पेक्षा झपाट्याने हिमनद्या वितळत असण्याची शक्यता आहे. हिमनद्या वितळू नये हे पाहण्याची जबाबदारी सर्वांची आहे. पर्यावरणतज्ञ या नद्या वितळू नये यासाठी अनेक सूचना करत आहेत पण त्यांच्याकडे दुर्लक्ष करून पर्यावरणाचा नाश केला जात आहे. मुंबईचा विचार केल्यास आरे जंगलाचा मेट्रो कार शेडसाठी बऱ्याच प्रमाणात नाश केला गेला आहे. हवामान बदलाचे परिणाम दक्षिण आशियात मोठ्या प्रमाणात होऊ शकतो.

मध्यावधी निवडणुका घेण्याची सातत्याने मागणी करत आहे. इम्रान खान यांनी मदत कार्यासाठी मोठ्या प्रमाणात पैसे आणि जिवनावश्यक वस्तू गोळा केली आहे. राजकारण नंतर ही करता येईल पण सर्वात आधी सगळ्यांनी त्यांची प्राथमिकता ठरवली पाहिजे. एधी फाउंडेशन सारख्या अनेक संस्था मोठ्या प्रमाणात राहत कार्यात गुंतले आहेत. एधी फाउंडेशनला आंतरराष्ट्रीय समुदायाने सहकार्य केलं पाहिजे.

पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेवर पुढचे काही वर्ष महापुराचे परिणाम जाणवतील. पाकिस्तानच्या निर्यातीवर परिणाम होईल आणि आयात वाढणार. अशा वेळेस भारताने मदत केल्यास चीनचा वाढता प्रभाव, काही प्रमाणात कमी करण्यास, भारताला यश मिळू शकतं. हवामान बदलाच्या संकटाला गंभीरतेने घेऊन त्यावर काम केलं पाहिजे.

SHARAD PAWAR
INSPIRE FELLOWSHIP
*A Journey from Inspiration to Excellence*

An Initiative of

Yashwantrao Chavan Centre
Serving with Trust and Excellence

In association with

Agricultural Development Trust Baramati

# कृषी क्षेत्रातील पदवीधर विद्यार्थ्यांना सुवर्णसंधी

# शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन अ‍ॅग्रीकल्चर

एकूण फेलोशिप ८०

## फेलोशिपसाठी अर्ज करण्याचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १. | १२ ऑगस्ट २०२२ - १२ ऑक्टोबर २०२२ | ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत |
| २. | १३ ऑक्टोबर २०२२ - ०३ नोव्हेंबर २०२२ | आलेल्या अर्जांची छाननी |
| ३. | ११ नोव्हेंबर २०२२ | निवड झालेल्या उमेदवारांची घोषणा |
| ४. | ११ डिसेंबर २०२२ | फेलोशिप प्रदान सोहळा |

ऑनलाईन अर्ज करण्यासाठी

www.sharadpawarfellowship.com

अधिक माहितीसाठी संपर्क

9860740569

Email : agri@sharadpawarfellowship.com

# भाजपातील अंतर्गत लढाई




व्यंकटेश केसरी

भाजप मध्ये अंतर्गत लढाई सुरु झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या एकाधिकारशाहीला अजून जरी उघड आव्हान दिले जात नसले तरी त्याची पार्श्वभुमी तयार होत आहे. आणि त्याचा फटका भाजपच्या चंद्रगुप्त व चाणक्याला बसू शकतो. कारण येत्या १५-२० महिन्यात अकरा राज्यातील विधान सभेच्या व लोक सभेच्या मध्यावधी निवडणूका होऊ घातल्या आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी,मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंग चौहान यांना पक्षाच्या संसदीय मंडळ व केंद्रीय निवणूक समितीतून वगळणे, कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री बी एस येदियुराप्पा यांना संसदीय मंडळात घेणे याचा अर्थ पक्षातील सर्वांना कळला आहे. संसदीय मंडळात ऋहोयबांची ' वर्णी लावण्यात आली आहे तर येदियुराप्पा यांच्या समोर विश्वगुरुंनी नांगी टाकली आहे. येदियुराप्पा ८० वर्षाच्या घरात आहेत, " माझ्या जागी माझा मुलगा विधान सभेची निवडणूक लढणार " अशी घोषणा करून त्यांनी पक्षाच्या संसदीय मंडळाला धुडकावून लावले आहे.

कर्नाटकात भाजपची स्तिथी डामाँडौल आहे.अंतर्गत गटबाजीने पक्ष पोखरला आहे, मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांना निवडणुकीपूर्वी बदलण्याच्या चर्चा चालू आहेत.कर्नाटक हा भाजपचा दक्षिणेतील "गेट वे " मानला जातो. गैर भाजप पक्ष तेथे जबाबदारीने वागले तर चित्र बदलू शकते.

कर्नाटकाशिवाय गुजरात, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगर, तेलंगणा व पूर्वोत्तर चार राज्यात विधानसभेच्या निवडणूक होत आहेत. राजस्थान मध्ये माजी मुखमंत्री व भाजपच्या ताकतवर नेत्या वसुंधरा राजे यांचे पद्धतशीरपणे खच्चीकरण करणे चालू आहे तर मध्य प्रदेशात शिवराजसिंग चौहान हे मुखमंत्री राहणार नाहीत असा स्पष्ट संदेश भाजप हाय कमांडने दिला आहे. गुजरात मध्ये नवशिके मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल व त्यांच्या अनुभवहीन मंत्रिमंडळाच्या हाती सरकार सोपवून नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राजकीय जुगार खेळला आहे. जुने मंत्रिमंडळ टाकाऊ होते,मोदी-शहा हे भाग्यविधाता आहेत हा संदेश देण्यात आला आहे. गुजरात भाजपमधील दुसरा गट शांत राहील, दबावतंत्र,धक्कातंत्र, मोदींची प्रतिमा , शहांची चाणक्यनीती कामाला येईल हा भ्रम आहे की वास्तव हे आगामी काळात कळेल. पण मोदी-शहांच्या या गुजरात मध्ये मागच्या विधान साहबेच्या निवणुकीत फक्त ९९ जागा भाजप जिंकू शकली, काठावरचे बहुमत मिळाले आणि ते ही साम, दाम, दंड, भेद हे अस्त्र वापरून हे कसे विसरता येईल ! .

गुजरातमध्ये भाजप गेल्या २५ वर्षांपासून अधिक काळ सत्तेत आहे पण विरोधी पक्ष संपला नाही. काँग्रेसची ३० टक्के मते आहेत तर आता दुसरे नटवरलाल, आम आदमी पार्टीचे सर्वेसर्वा , दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल मैदानात उतरले आहेत. दिल्लीतील राजकीय वर्तुळात केजरीवाल यांना जुनिअर मोदी असे म्हटले जाते.

नितीन गडकरी यांचे पंख छाटण्याच्या प्रयत्नात मोदी उघडे पडले. आणि गडकरींच्या विरोधकात देवेंद्र फडणवीस यांना ताकत देण्याच्या खेळीने त्यांचे कोतेपणा जगासमोर आले. गडकरी हे अजातशत्रू आहेत. ते राष्ट्रीय स्वयंसेवक

संघाचे कट्टर स्वयंसेवक असूनही त्यांचे चाहते सर्वे पक्षात आहेत. डाव्यांपासून ते उजव्या विचारांच्या, प्रादेशिक पक्षाच्या नेत्यांशी त्यांचा संवाद असतो. ते भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष झाल्यानंतर दिल्लीत आले. आणि भेट घेतली ती भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस कॉ. ए बी वर्धन यांची. त्यांचे नवी दिल्लीतील निवासस्थान काँग्रेसच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांच्या निवासस्थानासमोर आहे. आपल्या परसदारी उगविलेल्या भाज्या गडकरी सोनिया गांधी यांच्याकडे पाठवितात अशा चर्चा राजकीय वर्तुळात ऐकायला मिळतात. संसदेत त्यांच्या कामाची सर्व पक्षीय प्रशंसा ऐकायला मिळते, गडकरींना त्यांच्या कामाची जाहिरात करावी लागत नाही हे विश्वगुरुंना कसे सहन होणार ?

या पुढच्या काळात भाजपमधील मोदी-शहा विरोधक गडकरी यांच्या जवळ आले तर आश्चर्य वाटणार नाही. संसदीय मंडळ व केंद्रीय निवणूक समितीतून काढल्यानंतर गडकरींनी भारतातील विकास पर्वाचे श्रेय अटल बिहारी वाजपेयी, लाल कृष्ण अडवाणी, दिन दयाल उपाध्याय यांना देऊन जे भक्त २०१४ साली भारताला खरे स्वातंत्र्य मिळाले,विकास पर्व सुरु झाले, भ्रष्टाचार मुक्त,आत्मनिर्भर देश झाल्याचा घोष करीत आहेत, त्यांना सणसणीत जबाब दिला आहे. वाजपेयी, आडवाणी, दिन दयाल यांनी रान तयार केले , फळे मात्र मोदी चाखीत आहेत असा याचा अर्थ होतो.





मोदी-शहांचे कितीही गुण गाईले तरी महाराष्ट्रात भाजप स्वबळावर निवणूक जिंकू शकत नाही.तिला शिवसेना नाही तर शिंदे गट, इतर पक्षातील फुटीर लागतात हे देशाला कळून चुकले आहे. पश्चिम बंगालमध्येही हा पक्ष ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसच्या फुटीरांवर जगतो आहे, वाढतो आहे. तेथे मोदींची जादू चालत नाही तर बिहार मध्ये लालू यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलाला भाजप पेक्षा अधिक जागा विधान सभेत मिळाल्या . पण गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, कर्नाटक, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड या राज्यात भाजप स्वतःच्या ताक्तीवर निवणूक लढवितो. .


मोदी हे तिसऱ्यांदा पंतप्रधान होणार, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर त्यांचेच सरकार येणार यांचे सूतोवाच भाजपने केले आहे. २००१४ व २०१९ च्या सार्वत्रिक निवणुकीत भाजप हा एकसंध पक्ष होता परंतु २०१४ चे चित्र वेगळे वेगळे असेल. राज्याराज्यात मोदी- शहा विरोधी गट सक्रिय होऊ शकतो. सत्तेत येण्यासाठी, सत्ता टिकविण्यासाठी ईडी, इनकम टॅक्स, केंद्रीय गुप्तचर खाते यांचा वापर करणे याचा अर्थ आपल्या कामावर, नेत्यावर निवडून येण्याचा विश्वास भाजपला नाही असा होतो. पण या यंत्रणांचा वापर केल्याने विरोधी पक्ष खवळले आहेत. या पार्श्वभूमीवर नितीन गडकरी यांच्या खच्चीकरणाचे अनेक अर्थ निघतात. यंत्रणेचा गैरवापर करून आपण निवणुका जिंकू शकतो अशा भ्रमात असलेल्या सत्ताधाऱ्यांचे काय झाले हा इतिहास फार जुना नाही.

# संघ परिवारात चाललंय तरी काय ?

अगस्त्य दास

भारतीय जनता पक्षाची सर्वोच्च धोरणनिर्मिती संस्था म्हणून जिची गणना होते त्या केंद्रीय संसदीय मंडळाची अलीकडेच फेररचना करण्यात आली. जगतप्रकाश नड्डा हे अध्यक्ष होऊन दीर्घ कालावधी उलटल्यानंतर देखील या सर्वोच्च मंडळाची फेररचना करण्यात आली नव्हती. या मंडळात अनेक जागा रिकाम्या होत्या. सुषमा स्वराज आणि अरुण जेटली तसेच अनंतकुमार या तिघांच्या निधनामुळे तीन जागा रिक्त होत्या. वेंकय्या नायडू उपराष्ट्रपति झाल्याने त्यांची जागाही रिकामी झाली होती. परंतु जोपर्यंत सरकार आणि भाजपची सूत्रे हाती असलेले दोन नेते कायम असताना रिकाम्या जागा भरण्याची गरज कधीच भासली नव्हती. कारण रा.स्व.संघात ज्याप्रमाणे एकचालकानुवर्तित्व प्रचलित आहे तोच प्रकार भाजपमध्ये २०१४ पासून सुरु झालेला आहे व त्यामुळे संसदीय मंडळाची फेररचना व विस्तार ही बाब नेहमीच दुय्यम व गौण राहिली होती. परंतु आता २०२४ च्या लोकसभा निवडणुकांची चाहूल लागलेली आहे. त्याचबरोबर या वर्षाअखेरीला गुजरात व हिमाचल प्रदेशातील विधानसभा निवडणुका अपेक्षित असून २०२३च्या सुरुवातीला म्हणजे पहिल्या सहा महिन्यात कर्नाटक, मेघालय, नागालँड व त्रिपुरा या चार राज्यात विधानसभा निवडणुका अपेक्षित आहेत. तर २०२३च्या अखेरीला मध्य प्रदेश, छत्तीसगढ, राजस्थान, तेलंगणा, मिझोरम या राज्यांमध्ये निवडणुका अपेक्षित आहेत. यामध्ये भाजपच्या दृष्टीने कर्नाटक हे विशेष कळीचे राज्य आहे. कारण या राज्यात भाजपमधील बेदिली, असंतोष आणि सुंदोपसुंदीने कमाल मर्यादा गाठलेली आहे. या सर्व गोष्टी परिणामकारक रीतीने हाताळू शकणारा प्रदेश पातळीवर कुणीही नेता भाजपकडे नाही. ही क्षमता माजी मुख्यमंत्री बी.एस. येद्युरप्पा यांच्याकडे होती. परंतु वयोमर्यादेचा नियम पुढे करुन त्यांना बाजूला सारण्यात आले. ते एक मनस्वी नेते आहेत व स्वतःची मानखंडना न विसरणारे नेते आहेत त्यामुळे ते विधानसभा निवडणुकीच्या वेळी उपद्रवी ठरणार काय ही शंका आहे. या पार्श्वभूमीवर भाजपमधील संघटनात्मक फेरबदलाचा आढावा घ्यावा लागेल.

खरेतर भाजपच्या संसदीय मंडळात कुणाचा समावेश झाला काय किंवा न झाला काय या गोष्टी फारशा चर्चेत येत नाहीत. कारण या पक्षात आणि केंद्र सरकारमध्ये निर्णय करणारे फक्त दोघेच आहेत. इतरांचे स्थान त्या निर्णयांवर मान



डोलावणे एवढेच उरलेले आहे. २०१४ पासून ही कार्यपध्दती सुरु करण्यात आली आहे. पण यावेळच्या फेरबदलात संसदीय मंडळातून दोन प्रमुख नेत्यांना काढून टाकण्यात आले. त्यातील एक केंद्रीय महामार्ग व परिवहन मंत्री नितिन गडकरी आणि दुसरे मध्य प्रदेशाचे मुख्यमंत्री शिवराजसिंग चौहान हे आहेत. हे नेते सर्वोच्च जोडगोळीस फारसे न रुचणारे अशी प्रतिमा निर्माण करण्यात त्यांनी यश मिळवले होते. त्याचबरोबर त्यांनी पक्षात आणि पक्षाबाहेरही कुणाचीही कामे करण्याची सकारात्मक भूमिका घेतली. फक्त स्वपक्षीयांचीच कामे करायची आणि विरोधी पक्षांना फाट्यावर मारायचे अशी संकुचित वृत्ती त्यांनी ठेवली नाही. यामुळे ते विरोधी पक्षांमध्येही लोकप्रिय मंत्री म्हणून गणले जातात. किंबहुना



आहेत ही बाब स्पष्ट आहे. या दोन प्रमुख नेत्यांना वगळले ही बाब जशी आश्चर्यकारक होती तसाच चकित करणारा प्रकार म्हणजे उत्तर प्रदेशावर पकड मिळवलेले मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना संसदीय मंडळात स्थान न देण्याचा ठरला. यामुळे सर्वोच्च जोडगोळीला आदित्यनाथही फारसे पचणारे नाहीत ही बाबही या निमित्ताने स्पष्ट झाली.

प्रश्न असा निर्माण होतो की या सर्वोच्च जोडगोळीच्या मनातून उतरण्यासारखे नितिन गडकरी यांनी काय केले असावे ? जी माहिती मिळते त्यावरुन गडकरी यांनी गेल्या काही काळापासून स्वतःचे असे वेगळे स्थान जनमानसात निर्माण केले होते. ते त्यांच्या मंत्रालयाचे आणि त्यांच्या मंत्रालयातर्फे केल्या जाणाऱ्या कामांचे 'मार्केटिंग' किंवा 'प्रचार' एवढ्या प्रभावीपणे करीत होते की मोदी मंत्रिमंडळातील सर्वात सक्रिय आणि प्रत्यक्ष केलेल्या कामाचे पुरावे सादर करणारा मंत्री त्यांच्याकडे गेल्यास काम होवो किंवा न होवो पण किमान म्हणणे ऐकून घेण्याइतका मनाचा मोठेपणा दाखवला जातो व कामेही केली जातात असा विरोधी पक्षातील मंडळींचा अनुभव आहे. ज्याप्रमाणे अटलबिहारी वाजपेयी यांना त्यांच्या स्वकीयांमध्ये म्हणजे स्वपक्षीयांमध्ये व विशेषतः संघ परिवारात फारसे आदर-प्रेम मिळाले नव्हते. परंतु त्यांनी उदारमतवादाचा यशस्वी उपयोग करुन पक्षाबाहेर आपली एक वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमा तयार करण्यात यश मिळवले होते. त्यामुळेच भाजपच्या नेतृत्वाखालील आघाडीचे पहिले सरकार (एनडीए - राष्ट्रीय लोकशाही आघाडी) स्थापन झाल्यानंतर आघाडीतील बहुतेक घटकपक्षांनी त्यांच्या नेतृत्वालाच पाठिंबा दिला आणि स्वीकारही केला. संघ परिवाराला नाईलाजास्तव त्यांना पंतप्रधान करावे लागले होते. गडकरी यांची काहीशी तशीच स्थिती झाली आहे. अनेक विषयात

त्यांनी पक्षापेक्षा आणि मुख्य म्हणजे सर्वोच्च नेत्यांच्या विपरीत भूमिका घेण्याचे धाडसही दाखवलेले आहे. पं. नेहरू यांच्यासंदर्भात वर्तमान राजवट आणि विशेषतः राज्यकर्ते हे विलक्षण दुस्वास, द्वेष विखारी पध्दतीने प्रकट करीत असतात. नेहरूंच्या चुका दाखवून केवळ नकारात्मक पध्दतीची एकांगी टीका करण्यात भाजपमध्ये स्पर्धा लागलेली आढळते. नितिन गडकरी यांनी या प्रकारास जाहीर विरोध केला आणि अशा प्रकारे टीका करणे योग्य नाही असे मतही व्यक्त केले.

गडकरी हे गुजराती जोडगोळीला डोईजड होत होते हे स्पष्ट दिसू लागले होते. इतरांपेक्षा वेगळी प्रतिमा निर्माण करण्यात त्यांनी यश मिळवले होते व ते गुजराती जोडगोळीला बोचायला लागले होते. गडकरी यांना नागपूरचा म्हणजे रा.स्व.संघाच्या नेतृत्वाचा पाठिंबा असल्याने त्यांनी देखील त्या पाठबळाच्या आधारे जोडगोळीला अडचणीत आणण्याचे प्रकारही केले. गडकरी यांनी त्यांच्या कारकिर्दीत केलेली आणखी एक गोष्ट सार्वजनिक झाली आणि त्यामुळेही त्यांना लोकप्रियता लाभली. सुमारबुध्दी मंडळींना एखादा साक्षात्कार होतो आणि अचानक ब्रह्मज्ञान झाल्यासारखे निर्णय ते करु लागतात. या निर्णयांमुळे लोकांवा किती त्रास होईल याची तमा ते बाळगत नाहीत. नोटाबंदी (रु. ५०० व रु. १०००च्या नोटा रद्द करणे) हा असाच निर्णय होता. ते निर्णय केवळ – फक्त एका लहरी व अविचारी व्यक्तीने केला होता. या निर्णयाबाबत स्वतःच्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांना देखील विश्वासात घेण्यात आले नव्हते. निर्णय जाहीर करण्यापूर्वी एक उपचार म्हणून केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक बोलावून या निर्णयाची माहिती सहकारी मंत्र्यांना देण्यात आली. हा निर्णय टोकाचा अविचारी असल्याने मंत्रिमंडळातील बहुतेकजण हतबुध्दच झाले होते. अशा त्या वातावरणात म्हणजेच सर्वजण दातखीळ बसलेल्या अवस्थेत असताना केवळ गडकरींनी तोंड उघडले होते अशी माहिती मागाहून बाहेर आली. 'हा निर्णय करण्यापूर्वी त्याचे परिणाम विचारात घेतले आहेत काय' असा प्रश्न त्यांनी विश्वप्रिय ब्रह्मांडनायकांना विचारला होता. हा त्यांचा भयंकर अपराध होता. यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार ब्रह्मांडनायकांनी या प्रश्नाला उत्तर देण्याऐवजी केवळ काही क्षण गडकरी यांच्याकडे रोखून बघण्यात घालवले आणि काहीही उत्तर न देता बैठकीबाहेर चालते झाले. परंतु त्यावेळी गडकरी यांना नागपूरमधील संघ परिवाराचे पाठबळ होते आणि एवढा भयंकर अपराध करुनही ते सहीसलामतपणे सुटले होते. परंतु यानंतर मात्र त्यांचे साहस काहीसे वाढले होते. त्यांनी आपली वेगळी अशी प्रतिमानिर्मिती करण्यास पध्दतशीरपणे सुरुवात केली. तीच बाब त्यांच्या अंगाशी आली.

काही गमतीजमतीच्या गोष्टीही कानोकानी चर्चेत राहिल्या. दिल्लीत गडकरी यांचे निवासस्थान आहे त्याच्या एका बाजूला समोर माजी पंतप्रधान मनमोहनसिंग तर दुसऱ्या बाजूला सोनिया गांधी यांचे १० जनपथ हे निवासस्थान आहे. मनमोहनसिंग यांच्या थोडे अलीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि गडकरी यांचे मित्र शरद पवार यांचे निवासस्थान आहे. अगदी पायी चालत गेले तरी केवळ तीन-चार मिनिटात पोहोचता येईल इतके ते जवळ आहे. गडकरींच्या या निवासस्थान असलेल्या बंगल्यात एकेकाळी काँग्रेसनेतृत्वाखालील 'युपीए' किंवा संयुक्त





पुरोगामी आघाडीचे कार्यालय होते. सोनिया गांधी यांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय सल्लागार समितीचे कार्यालयही तेथे होते. सोनिया गांधी यांना टापटिपीची आणि झाडा-फुलांची आवड असल्याने त्यांनी या बंगल्यात निरनिराळी फुलझाडे आणि अघदी भाजीपाला देखील लावलेला होता. असे सांगतात की गडकरींनी तेथे राहण्यास आल्यानंतर ती बाग कायम राखलीच परंतु त्यात आणखी भरही घातली. जैविक भाजीपाला त्यांनी लावला आणि त्या भाज्या ते समोरच राहणाऱ्या सोनिया गांधी यांना पाठवत असत. अरे बापरे, केवढा हा गुन्हा ? हो भाजपच्या व ब्रह्मांडनायकांच्या दृष्टीने तर अक्षम्य गुन्हा ! पवार यांच्याबरोबरचे त्यांचे संबंधही विशेष निकटचे आहेत. विरोधी पक्षांनाही विश्वासात घेऊन राज्यकारभार केला पाहिजे असे त्यांचे मत आहे आणि ते त्यांनी वारंवार प्रकटपणे बोलूनही दाखवले आहे. त्यांच्या या स्वभावामुळे अनेकवेळेस त्यांना पाठिंबा देणाऱ्या आणि ब्रह्मांडनायकांच्या दबावाखाली असलेल्या वर्तमान संघ-नेतृत्वाचीही अडचण होत राहिली.

सध्याचे संघ-नेतृत्व आणि संघ यांना जोडगोळीने खिशात घातले आहे हे आता उघड झाले आहे. त्याची कारणेही विविध आहेत. त्यामुळेच गडकरी यांना पक्षाच्या सर्वोच्च निर्णय व धोरणनिर्मितीविषयक समितीतून बाहेरचा रस्ता दाखवल्यानंतर देखील संघ नेतृत्व मूग गिळून बसले आहे यामध्येच त्यांचा 'पुरुषार्थ' उघड झाला आहे. अलीकडेच मिळालेल्या माहितीनुसार गडकरी यांना 'ईडी'कडून समन्स बजावण्यात आल्याची माहिती चर्चेत होती. अर्थात तिला दुजोरा मिळालेला नाही. परंतु त्यांच्याबाबतची पूर्वीची काही प्रकरणे उकरुन काढण्याचे काम सुरु झाले असल्याची माहिती मिळते आहे. गडकरी यांनी अलीकडेच सरकारमधून बाहेर पडण्याची तसेच राजकारणापेक्षा सामाजिक कार्य करण्यात अधिक रस निर्माण होत असल्याचे संकेत दिले होते. या सर्वच गोष्टींचा परिपाक म्हणजे त्यांना पक्षाच्या सर्वोच्च समितीतून अर्धचंद्र देण्यात झालेला आहे. आता गडकरी यांची पुढची हालचाल काय असेल याचीच प्रतीक्षा आहे. आता या समितीत महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्याला प्रतिनिधित्व नाही. यावरुनही या जोडगोळीच्या मनातला महाराष्ट्रद्वेष स्पष्ट होतो.

मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवजासिंग चौहान यांनाही या समितीतून वगळण्यात आले. यावरुन मध्य प्रदेशातील त्यांचा मुख्यमंत्रीपदाचा काळही आता अखेरच्या टप्प्यात असल्याचे स्पष्ट झाले आहे. चौहान यांनी मध्ये प्रदेशाचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्रीपद भूषविणारे नेते म्हणून स्वतःचे महत्व निर्विवादपणे सिध्द केले. ते सध्या चौथ्यांदा मुख्यमंत्रीपद भूषवीत आहेत. आपल्यापेक्षा कुणी मोठे होत असताना दिसले तर पोटदुखी होणारी काही मंडळी असतात. चौहान हे लालकृष्ण अडवानी यांच्या गटाचे मानले जात. परंतु मध्य

प्रदेशावरील त्यांची पकड ही निर्णायक असल्याने त्यांना हात लावणे जरासे अवघड झाले होते. परंतु आता मात्र जोडगोळीने कावा साधला आणि त्यांना पाचव्यांदा मुख्यमंत्रीपद मिळणार नाही याची तजवीज करुन ठेवली आहे. पुढच्या वर्षीच्या अखेरीला म्हणजेच २०२४च्या लोकसभा निवडणुकांपूर्वीच मध्य प्रदेशात २०२३च्या अखेरीला विधानसभा निवडणूक होईल आणि त्यावेळी भाजपची ही जोडगोळी एखाद्या नव्या नेत्याकडे मध्य प्रदेशाचे नेतृत्व सोपविणार हे आता स्पष्ट झाले आहे. त्याचाच 'ट्रेलर' म्हणजे चौहान यांना संसदीय मंडळातून बाहेर काढण्यात आले आहे. चौहान यांनी तुलनेने मवाळ भूमिका घेऊन राज्यकारभार केला. विरोधी पक्षांशी त्यांनी सूडबुध्दी फारशी न दाखवता कारभार केला. ही बाब जोडगोळीला रुचणे शक्यच नव्हते. सगळ्या मुख्यमंत्र्यांनी विरोधकांचा खात्मा करण्याचे जोडगोळीचे राष्ट्रीय धोरण अमलात आणलेच पाहिजे हा त्यांचा आग्रह मध्य प्रदेशात चालू शकला नाही. चौहान यांना मवाळपणाची शिक्षा देण्यात आली.

आता ज्या मंडळींना संसदीय मंडळात घेतले त्यांच्यावर नजर टाकावी लागेल. कर्नाटकातून माजी मुख्यमंत्री बी.एस. येड्डुरप्पा यांना संसदीय मंडळात समाविष्ट करण्यात आले आहे. ते ७८ वर्षांचे आहेत. एकीकडे त्यांना वयोमर्यादेच्या कारणास्तव मुख्यमंत्रीपदावरुन हटविण्यात आले. आता या नेत्याने कर्नाटकातील विधानसभा निवडणुकीत काही गडबड करु नये या कारणास्तव व त्या धास्तीपोटी संसदीय मंडळात सामील करण्यात आले आहे. येड्डुरप्पा हे एक मनस्वी नेते आहेत. ते स्वतःचा अपमान विसरत नाहीत. लिंगायत समाजाचे आजही ते सर्वात वरिष्ठ राजकीय नेते मानले जातात. यापूर्वी एकदा त्यांनी भाजपमधून बाहेर पडून व वेगळा पक्ष स्थापन करुन भाजपला पराभूत करुन धडा शिकवलेला आहे. ती आठवण जोडगोळीला असावी. पराभव सहन करण्याची शक्ति जोडगोळीत नसल्याने त्या भीतीपोटी त्यांनी येड्डुरप्पा यांना संसदीय मंडळात सामील करुन चुचकारण्याचा प्रयत्न केला आहे. कर्नाटकात बसवराज बोम्मई यांचे सरकार अजुनही स्थिर झालेले नाही. खुद्द भाजपमध्ये मारामाऱ्या आहेत आणि विविध नेते परस्परावर राजकीय कुरघोडीचा खेळ खेळण्यात मग्न आहेत. सांप्रदायिकता आणि धार्मिक ध्रुवीकरणाने टोकाचे वळण घेतल आहे. त्यात बोम्मई यांनी उत्तर प्रदेशातील योगी आदित्यनाथ यांचे 'मॉडेल' किंवा राज्यकारभार तंत्र हे आदर्श असल्याचे सांगून जोडगोळीला नाराज केले आहे. भाजपमध्ये व देशातच सध्या एकच आदर्श व्यक्ती आहे आणि ती व्यक्ती कोण हे सांगण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे सर्वांनी आदर्श ठेवायचा असल्यास त्या व्यक्तीचाच ठेवणे ही बाब अधोरेखित आहे आणि विशेषतः भाजपमध्ये तर ती बाब निर्विवाद मानली जाते. त्यामुळेच राजकीय अनागोंदी व विचका झालेल्या कर्नाटकातील सत्ता टिकविण्यासाठी येड्डुरप्पांना गोंजारणे अपरिहार्य झाल्याने त्यांना या सर्वोच्च समितीत सामील करुन घेण्यात आले आहे.

मध्ये प्रदेशातून शिवराजसिंग चौहान यांना वगळल्यानंतर त्यांच्याऐवजी मध्य प्रदेशातील राजकीयदृष्ट्या अत्यंत नगण्य असलेले एक दलित नेते सत्यनारायण जटिया यांना संसदीय मंडळात घेण्यात आले आहे. त्यांची उपयोगिता काय यावर संशोधन करावे लागणार आहे. मुख्य म्हणजे पूर्णतया राजकीयदृष्ट्या संन्यस्त अवस्थेत असलेल्या या वयोवृध्द नेत्याला अडगळीतून बाहेर काढून संसदीय मंडळात घेण्यात आले. हा माणूस अगदी भला आहे. रा.स्व.संघाच्या मुशीत घडलेला आहे. भारतीय मजदूर संघाशी ते निगडित राहिले आहेत. वाजपेयी सरकारमध्ये ते कामगारकल्याण व श्रम मंत्रालयाची जबाबदारी सांभाळत होते. परंतु त्यांच्यासारख्या



पंच्याहत्तरी पार केलेल्या नेत्याला संन्यास आश्रमातून बाहेर काढून पक्षाच्या सर्वोच्च समितीचे सदस्य करण्याने काय साधण्यात आले याचे कारण जोडगोळीलाच माहिती असावे.

आसामचे माजी मुख्यमंत्री व सध्या केंद्रात मंत्री असलेले सर्वानंद सोनोवाल यांनाही संसदीय मंडळात सामील करण्यात आले आहे. सोनोवाल यांनी भाजपचे आसामचे पहिले मुख्यमंत्री म्हणून पाच वर्षे ईमानइतबारे कारभार केला. परंतु काँग्रेसमधून भाजपमध्ये सामील झालेले अतिमहत्वाकांक्षी नेते हिमांत बिश्श शर्मा यांनी पाच वर्षांनंतर दम धरला नाही आणि भाजप हायकमांडला सरळसरळ धमकावून आसामचे मुख्यमंत्रीपद हस्तगत केले. कोणत्याही मार्गाने आणि प्रसंगी वाटेल तेवढी माघार व लाचारी पत्करुनही सत्तेत राहण्याच्या लालसेने ग्रस्त भाजपने काँग्रेसमधील दगाबाजांना अधिमान्यता देत मुख्यमंत्रीपद दिले. सोनोवाल नाराज झाले पण त्यांनी पक्षशिस्त पाळण्याचा मोठेपणा दाखवला. परंतु त्यांचे अनुयायी मात्र नाराज झाले. त्यांनी राजकीय पर्यायांचा विचार करण्यास सुरुवात केली आणि याची कुणकुण जोडगोळीला लागल्यानंतर त्यांना धोक्याची जाणीव झाली. लगेचच त्यांनी सोनोवाल यांना संसदीय मंडळावर घेण्याचा निर्णय केला. सोनोवाल यांनी आसामचे पहिले भाजपचे मुख्यमंत्री म्हणून कामगिरी बजावली असली तरी त्यांच्यावर जोडगोळी खूष नव्हती. 'सीएए' किंवा नागरिकत्व दुरुस्ती कायदा संमत झाल्यानंतर त्यावरुन आसाममध्ये असंतोष निर्माण झाला होता. त्याची हाताळणी योग्य रीतीने करण्यात आली नसल्याबद्दल जोडगोळी सोनोवाल यांच्या कारभाराबाबत असंतुष्ट व नाराज होती आणि त्यामुळेच पाच वर्षे मुख्यमंत्रीपद भूषविल्यानंतर देखील त्यांना दगाबाज व फितूर नेत्यासाठी (हिमांत बिश्श शर्मा) मुख्यमंत्रीपदाचा त्याग करावा लागला. तेही मवाळ नेते म्हणून ओळखले जातात. ते तुलनेने खूप तरुण आहेत आणि लवकरच त्यांना ही विशेष संधी मिळाली आहे.

भाजपने कर्नाटकानंतर दक्षिणेत मुसंडी मारण्यासाठी तेलंगणा राज्याची निवड केली आहे. त्यासाठी त्यांनी के.लक्ष्मण यांना या संसदीय मंडळावर घेतले आहे. जोडगोळीच्या 'हिटलिस्ट'वर आता तेलंगणा आणि तेथील मुख्यमंत्री के.चंद्रशेखर राव आहेत. हैदराबाद महानगरपालिका जिंकण्यासाठी साक्षात जोडगोळीने प्रचार केला होता. हा प्रचार नेहमीप्रमाणेच विषारी म्हणजे सांप्रदायिक आणि धार्मिक ध्रुवीकरणावर आधारित होता. तेलंगणा राष्ट्र समितीने अगदी काठावरच्या बहुमताने महानगरपालिका स्वतःकडे राखण्यात यश मिळवले होते. परंतु भाजपला स्वतःला यश मिळाले नसले तरी इतरांच्या यशात बिब्बा घालण्याचे काम त्यांनी केले. आता तर जोडगोळी व विशेषतः द्वितीय क्रमांक नेते उर्फ प्रति सरदार पटेल उर्फ प्रति पोलादी पुरुष व केंद्रीय गृहमंत्री यांनी तेलंगणात जाऊन क्रमांक १ प्रमाणेच हातवारे आणि वेगवेगळे आवाज काढून तेलंगणातून चंद्रशेखर राव यांची सत्ता उखडून टाकण्याची घोषणाही करुन टाकली आहे. या गोष्टी लक्षात घेऊन तेलंगणाच्या प्रतिनिधीला या सर्वोच्च मंडळात सहभागी करण्यात आले आहे. ते राजकीयदृष्ट्या अत्यंत हलके आहेत. किंवा 'राजकीय अल्पवजनी' आहेत. अर्थात तेलंगणातील ते एक ओबीसी नेते आहेत. भाजपचा सध्या भर ओबीसी राजकारणावर अधिक आहे. त्यामुळे त्यांचा किंवा सुधा यादव यांचा समावेश हा या राजकारणाचे संकेत देणारा आहे. लक्ष्मण हे प्रदेश भाजप अध्यक्ष असताना भाजपला तेलंगणात चार जागा जिंकता आल्या होत्या.



ते उत्तम संघटक आहेत आणि मुख्य म्हणजे आक्रमक नसून मवाळ नेते आहेत. तेलंगणाचा हिशोब डोक्यात ठेवून त्यांना या सर्वोच्च समितीवर घेण्यात आले आहे.

संसदीय मंडळात एकेकाळी सुषमा स्वराज सदस्य होत्या. भाजपचा महिला चेहरा म्हणून त्या ओळखल्या जात. त्यांच्या निधनानंतर संसदीय मंडळात भाजपच्या कोणत्या महिला नेत्याचा समावेश केला जाणार याची उत्सुकता सर्वांनाच होती. यासाठी स्मृति इराणी किंवा निर्मला सीतारामन या सध्या भाजपच्या आघाडीच्या महिला नेत्यांच्या नावांची चर्चा होती. परंतु दोन्ही नावे वादग्रस्त असल्याने त्यांच्याबाबत निर्णय करणे दुरापास्त झाले होते. अखेर या रस्सीखेचीमध्ये तिसऱ्याच महिलेची वर्णी लागली. हरयाणातील महिला नेत्या सुधा यादव यांचा आश्चर्यकारकपणे संसदीय मंडळात समावेश करण्यात आला. सुधा यादव या हरयाणात आमदारही होत्या आणि हरयाणातील महेंद्रगढ मतदारसंघातून त्या लोकसभेवरही निवडून आल्या होत्या. त्या हरयाणातील यादव किंवा आहिर समाजाच्या आहेत. त्यांचे पति कारगिल युध्दात शहीद झाले होते. त्यानंतर त्यांना भाजपने महेंद्रगढमधून उमेदवारी देऊन कारगिलमध्ये शहीद झालेल्या त्यांच्या पतीचा राजकीय लाभासाठी वापर करण्याचा प्रयत्न केला परंतु तो असफल ठरला. त्या हरल्या. परंतु पक्षसंघटनेत त्यांनी विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या. त्या उच्चविद्याविभूषित आहेत. हरयाणातील सामाजिक उतरंडीत वर्चस्व असलेल्या जाट समाजाला भाजपच्या जोडगोळीकडून सातत्याने दुर्लक्षिले जात आहे आणि या प्रकरणातही त्यांना डावलण्याचा प्रकार घडलेला आहे. हरयाणाच्या मुख्यमंत्रीपदाबाबतही असाच प्रकार करण्यात आला आहे. त्यामुळे भाजपला त्याची किंमत हरयाणात चुकवावी लागू शकते.

पंजाबमध्ये पक्षविस्ताराचे उद्दिष्ट ठेवून भाजपने इक्बालसिंग लालपुरा यांना या समितीत सामील करुन घेतले आहे. जर्नेलसिंग भिंद्रावाला यांना अटक करण्याची कामगिरी त्यांच्या नावावर आहे. ते निवृत्त आयपीएस अधिकारी आहेत. २०१२ पासून ते भाजपशी निगडित आहेत. अल्पसंख्यक आयोगाचे त्यांना प्रमुख करण्यात आले होते व अजुनही त्या पदावर ते आहेत. पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते म्हणूनही ते टीव्हीवर झळकत असतात. काँग्रेस व अकाली दलाच्या भ्रष्ट राजवटींचा कंटाळा आलेल्या पंजाबच्या मतदारांनी 'आप'ला सत्ता दिली. या बदलामुळे कधीतरी पंजाबचे मतदार आपल्याला देखील निवडतील अशी भाजपला आशा आहे. त्यामुळेच लालपुरा यांना या समितीत स्थान देण्यात आले आहे.

इक्बालसिंग लालपुरा





जर्नेलसिंग भिंद्रनवाले

भाजपने महाराष्ट्रासारख्या राज्याला या सर्वोच्च धोरणविषयक समितीतून डावलले आहे. नितिन गडकरींना काढून टाकले आहे. त्याचप्रमाणे योगी आदित्यनाथ अधिक डोईजड होऊ नयेत यासाठी त्यांना समितीपासून दूर ठेवण्यात आले आहे. या सर्व घडामोडी एकच बाब दर्शवितात. आता भाजपवर केवळ दोनच व्यक्तींचीच हुकमत चालायला लागली आहे. बाकीच्या सर्वांना केवळ प्याद्याची भूमिका उरलेली आहे. या सर्व फेरबदलात राजनाथसिंग यांचे स्थान मात्र अबाधित राहिले आहे. राजनाथसिंग हे उत्तर प्रदेशाचे आहेत आणि ठाकूर आहेत. योगी आदित्यनाथही ठाकूर आहेत. त्यामुळे योगींना पर्याय म्हणून राजनाथसिंग यांचे स्थान अबाधित राखण्यात आले आहे. अन्यथा त्यांची गतही गडकरींसारखी झाली असती. 'योगी नको म्हणून राजनाथसिंग' आणि राजनाथसिंग यांना वळविणेही सोपे असल्याने त्यांची खुर्ची वाचली आहे. थोडक्यात आता पक्षावर जोडगोळीचे निर्विवाद व पूर्ण वर्चस्व प्रस्थापित झाले आहे. त्यांना आव्हान देणारा कोण वीर पैदा होतो ते पहावे लागेल!

# काय कौतुक, काय तत्परता...

एका मोठ्या राजकीय नेत्याने एके ठिकाणी असं म्हटलं होतं की, आपल्या देशात कुठलीच गोष्ट  योग्य पध्दतीने व वेळेवर होत नाही. याचं कारण ज्याच्यावर ती जबाबदारी सोपवलेली असते ते काम सोडून इतर गोष्टींमध्येच गुंतून पडलेला असतो. तशाच अर्थाची एक गुजराती म्हण होती 'जेनू काम तेनू थाय, बिजा करेसो गोता खाय' या दोन्ही गोष्टी आठवण्याचे कारण म्हणजे, आज आणि काल माध्यमांमध्ये आलेली मुख्यमंत्र्यांच्या कामकाजाची माहिती... ते दौर्यावर असताना पुण्याच्या चांदणी चौक परिसरात अडकून पडले. मग झालं काय तर त्यांनी तात्काळ पुण्याचे जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, महापालिका आयुक्त, पोलीस आयुक्त या सगळ्यांना चांदणी चौकात बोलावले. तिथे एक टेबल मागवून त्या टेबलावर संबंध रस्त्यांचा आराखडा ठेवण्यात आला होता आणि हे सगळे वरिष्ठ अधिकारी आपापली कार्यालयातील जागा सोडून भर रस्त्यामध्ये तथाकथित जनतेच्या वाहतूक समस्येवर चर्चा करत होते. काय कौतुक... काय तत्परता... स्वतःची पाठ थोपटून घेण्यासाठी यापेक्षा आणखी वेगळं काय करायला हवं. खरंतर मुख्यमंत्र्यांसकट कुठलाही अधिकारी याविषयातील तज्ज्ञ असल्याची आपली माहिती नाही. पण असंच लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी सतत रस्त्यावर उतरून काम करायचं असेल तर मग मंत्रालय हवंच कशाला? ... ही सरकारच्या कामकाजाची पध्दत कितपत योग्य आहे याचा आता नागरिकांनीच विचार करायला हवा.

यातलं मुख्य कारण असं की, ज्यांच्याकडे निर्णय घेण्याची जबाबदारी असते ते मंत्री किंवा ज्या प्रशासकीय चौकटीतील 'बाबू लोक' यांनी त्या - त्या विषयातल्या तज्ज्ञ माणसांकडून हे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि खरंतर याची सुरुवात जवाहरलाल नेहरूंच्या काळात झाली आणि पुढे राजीव गांधींनी माहिती तंत्रज्ञानामध्ये सॅम प्रिटोडांसारखा तज्ज्ञ माणूस आणून एक क्रांती घडवली होती. पण अजूनही आपण दोन - तीन शतकापूर्वीच्या काळात वावरणार असू तर घोड्यावर स्वार होऊन तलवार फिरवत राजकारणच करत राहू... प्रगतीच्या नावाने नागरिकांच्या हाती भोपळा येईल.

जाता - जाता आणखीन एक नव्याने जबाबदारी स्वीकारलेले आरोग्यमंत्री आरोग्य अधिकार्यांना फैलावर घेत असल्याची चित्रफीत आपण पाहिली असेलच. याच महोदयांनी रत्नागिरीतील धरण खेकडयांनी पोखरलं म्हणून फुटलं असा नवा शोध लावला होता. एकविसाव्या शतकाकडून तेराव्या, चौदाव्या, पंधराव्या शतकात जाण्याचा हा प्रवास खूपच मनोरंजक आहे.

**श्री. हेमंत टकले, माजी आमदार**
**कोषाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी**



# अण्णासाहेब शिंदे हे आधुनिक भारतीय कृषी धोरणाचे शिल्पकार


## खासदार शरद पवार यांची गौरवोद्गार



ज्या वेळी आपला संपूर्ण देश उपासमारीच्या छायेत होता व अन्नधान्याच्या अनेक वस्तूंची तीव्र टंचाई निर्माण झालेली होती, अशा परिस्थितीत भारतातील 'अन्न सुरक्षेचा पाया' घालणारे माजी केंद्रीय मंत्री अण्णासाहेब शिंदे यांच्या जन्मशताब्दी समारंभात सहभागी होता आले, याचा मला अतिशय आनंद होत आहे. १९६६-६७ या वर्षात अन्नधान्याच्या टंचाईने इतका कहर केला होता की, परिणामी, भारताला तांबडा गव्हू आणि मिलो ज्वारी मोठ्या प्रमाणात अमेरिकेकडून 'पीएल-४८०' करारांतर्गत खरेदी करावी लागली होती. याच कालखंडात केंद्रीय मंत्रिमंडळातील कृषी मंत्रालयात श्री. अण्णासाहेब शिंदेजी यांनी अन्न, कृषी समुदाय विकास व सहकार खात्याचे उपमंत्री म्हूणून पदभार स्वीकारला. अण्णासाहेब आणि तत्कालीन केंद्रीय कृषी मंत्री पी. सुब्रमणियम या दोघांनी पुढाकार घेऊन भारतीय

**पुढील वर्षी आपण लोकसंख्येच्या बाबतीत चीनलाही मागे टाकणार असल्याने अन्न सुरक्षेसाठी अण्णासाहेब शिंदे यांच्या सारख्या थोर नेत्यांनी दाखविलेला मार्ग आपण विसरता कामा नये. शेतकरी समुदायाच्या कल्याणासाठी विज्ञान व तंत्रज्ञानास प्रोत्साहन देणे, हीच सध्याच्या त्यांच्या जन्मशताब्दी वर्षात श्री. अण्णासाहेब शिंदे यांच्या स्मृतीस योग्य आदरांजली ठरेल.**





गव्हाची गुणवत्ता तांत्रिकदृष्ट्या सुधारण्यासाठी कित्येक टन मेक्सिको मव्हाची  आयात करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल त्यांना मनापासून धन्यवाद व आभार! त्यांनी देशातील कृषी शास्त्रज्ञांवर, त्यांच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवला व भारतीय गव्हाच्या दर्जात सुधारणा करण्यासठी त्यांनी प्रोत्साहन दिले. गव्हाच्या उत्पादनात विक्रमी वाढ होऊन हा कार्यक्रम यशस्वी झाल्यानंतर, ते दोघेही आधुनिक भारतीय कृषी धोरणाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाऊ लागले. डॉ. नॉर्मन बोरलॉग आणि डॉ. एम. एस. स्वामीनाथन हे दोन कृषी शास्त्रज्ञ तसेच शासकीय अधिकरी श्री. शिवरामन यांच्यासह कृषी मंत्री या नात्याने त्यांनी भारतात हरित क्रांतीचे. अन्नधान्यात स्वावलंबनाचे सोनेरी पर्व आणले. त्या वेळी भारतावर 'बेगिंग बॉऊल' (भिकेचा कटोरा) असा शिक्का बसला होता. अन्न सुरक्षेमुळे हा शिक्का आता पुसला गेला आहे. आता केवळ अन्नाची सुरक्षितता झालेली नसून भारत आता अन्नधान्याची निर्यात करणारा प्रमुख देशही झाला आहे. प्रत्येक जण आता जैविक विज्ञानाची तोंड फाटेपर्यंत स्तुती करू लागला असून तांदूळ, बाजरी व अन्य महत्त्वाच्या पिकांच्या भरघोस उत्पादनासाठी लवकरच त्याचा अंगीकार केला जाणार आहे.

अलिकडील काही वर्षात भारताने ३१६ दशलक्ष मे. टन इतके अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन केले आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेला गहू, तांदळाचा भरपूर पुरवठा केल्यानंतरही ८० दशलक्ष टन धान्य शिल्लक राहिले होते. त्या वेळीही विरोध असताना धोरण ठरविणाऱ्यांनी 'नॉरिन-१०'मपर्मप्लास्म मेक्सिकन गव्हाबाबत ठाम निर्णय घेतला आणि त्याच बरोबर अधिक उत्पादनााठी ते बियाणे विकसीत करण्याची शास्त्रज्ञांनाही परवानगी देण्यात आली.


कोणावरही उपाशी झोपण्याची पाळी येणार नाही. कारण, प्रत्येकाला अन्नाचा कायदेशीर हक्क प्राप्त झाला आहे. या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने अन्न सुरक्षेच्या या जनकांना मी सलाम करतो.

भारतासह अनेक देशांच्या कार्यक्रम पत्रिकेवर पुन्हा एकदा 'अन्न सुरक्षा' आलेली आहे.आधी कोवीड संसर्गात










विदेशी बियाणे वापराबाबत आक्षेप घेतले जात होते तरीही अण्णासाहेव यांच्यासारख्या धोरण ठरविणाऱ्यांनी तंत्रज्ञानाच्या वापरावर अधिक भर दिला.

गेल्या ७५ वर्षांचे सिंहावलोकन करताना अभिमान वाटावा असे घडले आहे. ते म्हणजे, आज आपल्या देशात 'अन्न सुरक्षा आयदा लागू झाला असून या देशात आता

दोन वर्षे गेली. नंतर युक्रेन-रशिया युद्ध! यामुळे वातावरणात बदल होत गेले. आता धोरण ठरविणारे, शास्त्रज्ञ व राजकारणी हरित क्रांती पर्वातील दिवस आठवत आहेत. जेव्हा प्रत्येक सरकारच्या कार्यक्रम पत्रिकेवर 'अन्न सुरक्षा' पहिल्या क्रमांकावर होती. तथापि, भरत उशीराने आत्मसंतुष्ट झाला आणि विज्ञानातील घडामोडीकडे सुर्लक्ष करू लागला.

विशेषत: नवीन जैविक व पैदासीकडे! आम्ही स्वावलंबी होतो, त्यामुळे अन्नधान्याचे उत्पादन कसे करावे, याबाबतच्या सूचना समजू शकतो. तथापि, काही उच्चभ्रू, ज्यांना शेतीची थोडीशी किंबा अजिबात पार्श्वभूमी नाही, असेही तथाकथीत कृषी शास्त्रज्ञ संशोधन व विकासावर सल्ले देत असतात. जैविक प्रगतीशी निगडीत प्रत्येक गोष्टीला ते विरोध करीत असतात. इतकेच नव्हे तर, कोरण कसे असावे यावरही सल्ले देत राहतात. परिणामी, आपण जैविक अभियांत्रिकीमध्ये काहीच प्रगती करू








शकलो नाही. पहिले जैविक तंत्रज्ञान पिक-बी.टी.कॉटनमध्ये यश मिळाले असतानाही आपण लागवडीसाठी स्वत:च्याच 'जीएम कस्टर्डला परवानगी दिली नाही. आता काय झाले, ते सगळ्यांच्या समोरच आहे. आपल्याला दरवर्षी ८० हजार कोटी रुपयांचे खाद्यतेल आयात करावे लागत असून त्यात जीएम सोयाबिन व कस्टर्डपासून उत्पादित केलेल्या खाद्यतेलाचाही समावेश आहे.

या संपूर्ण वर्षभरात वातावरणातील बदलाचा प्रतिकूल परिणाम झाला असून संपूर्ण विद्युत क्षेत्रात धोक्याची घंटा वाजू लागली आणि त्यातून निर्माण झालेल्या घबराटीची पहिली प्रतिक्रिया उमटली, ती म्हणजे, जरी जागतिक परिस्थिती लक्षात घेऊन १० ते १५ दशलक्ष मे. टन गव्हाची निर्यात करण्याचा शब्द दिलेला असतानाही सरकारने तातडीने गव्हाच्या निर्यातीवर बंदी घातली. त्याचे कारण म्हणजे, गेल्या वर्षी ३.७७ दशलक्ष टन मव्हाचा तुटवडा निर्माण झाला होता आणि या वर्षी मार्च अखेर कमी पावसामुळे अपेक्षित उत्पादनापेक्षा ५.५० दशलक्ष मे. टन गव्हाचे उत्पादन कमी झाले होते. भारताने गव्हाच्या निर्यातीवर बंदी घातल्याबद्दल 'जी-७' गटातील कृषी मंत्र्यांनी तीव्र चिंता व्यक्त केली. कारण,



त्यांच्या मते, युद्धजन्य परिस्थितीत जागतिक परिस्थिती आणखीन बिघडण्याची शक्यता आहे. गव्हाच्या जागतिक किंमती आत्ताच आकाशाला भिडल्या असून अमेरिकेत गव्हाच्या किंमती प्रति टन ४५० डॉलर म्हणजे प्रति किलो ३५ रुपये असा आहे. केवळ पाश्चिमात्य जगच नव्हे तर, भारताने गव्हाच्या निर्यात बंदीच्या निर्णयाचा फेरविचार करावा, असे आवाहन आंतरराष्ट्रीय नाणे निधीनेही केले. या पार्श्वभूमीवर भारताच्या पंतप्रधानांनाही जाणवले की, यामुळे नवीन पेच निर्माण होऊ लागला असून परिणामी, अन्न सुरक्षेलाच शह बसत आहे.

अन्न सुरक्षेच्या समस्येमुळे जी राष्ट्रे पिकातील जैविक बदलास उघडपणे विरोध करीत होती, त्यांनी अचानक जैविक

तंत्रज्ञानाबाबतच्या आपल्या भूमिकेत बदल केला व अन्न सुरक्षेसाठी जैविक तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे, प्रोत्साहन दिले पाहिजे, असा पवित्रा घेतला. अलिकडे २५ मे २०२२ रोजी ब्रिटीश संसदेत जैविक तंत्रज्ञान विधेयक सादर करण्यात आले. वातावरणातील बदलाच्या पार्श्वभूमीवर अधिक प्रतिकार क्षमतेसाठी, अधिक पौष्टिकयुक्ततेसाठी व पिकाच्या अधिकाधिक उत्पादनासाठी आणि लालफितीच्या कारभारातून मुक्त होण्यासाठी हे विधेयक(जेनेटिक टेक्नॉलॉजी प्रिसिजन ब्रिडिंग) सादर करण्यात आले. नवीन जनुकपैदास संपादन तंत्रज्ञानाच्या संशोधनात येणारे अनावश्यक अडथळे या विधेयकाने दूर होतील, अशी अपेक्षा आहे. आत्तापर्यंत युरोपियन समुदायाने रोखले होते. त्यांनी विज्ञानावर लक्ष केंद्रीत करण्याऐवजी कायद्याचा खीस काढण्यात धन्यता मानली. जैविक तंत्रज्ञानाबाबत युरोपियन समुदायाची नकारात्मकता जैविक तंत्रज्ञानातील संशोधनाच्या बाबतीत ब्रिटन मागे



पडण्यास जबाबदार आहे.

अलिकडे, चार राष्ट्रांनी 'जीएमओ-गव्हू' हा ग्राहकांच्यादृष्टीने अत्यंत सुरक्षित असल्याचे घोषित केले आहे. उदाहरणार्थ-अर्जेन्टिनाने २०२० मध्ये, ब्राझिलने २०२१ मध्ये, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंडने २०२२ मध्ये आणि फिलिपाईन्स हा पहिला देश आहे की, ज्या देशाने सर्वप्रथम जुलै २०२१ मध्ये म्हणजे, आंतराष्ट्रीय तांदूळ संशोधन संस्थेला तथाकथीत 'गोल्डन राईस'ची लावणी करण्यास परवाना मिळाल्यानंतर घोषित केले. त्याचप्रमाणे, दुष्काळास तोंड देण्याची क्षमता असणाऱ्या सोयाबीन-आयबी-४ या जातीच्या बियाणाच्या अनिर्बंधीत वाढीस व त्याच्या व्यापारीकरणास अमेरिका, कॅनडा, ब्राझील, अर्जेन्टिना आणि उरुग्वे या देशांनी मान्यता दिली. या पाच देशांत जगातील एकूण सोयाबीन व्यापाराच्या ८५ टक्के व्यापार चालतो. या जातीच्या आयातीला चीननेही परवानगी दिली आहे. वातावरणातील बदलाचा मार्च महिन्यात गव्हाच्या उत्पादनावर जो थेट परिणाम झाला आहे, तो भारतात धोरण ठरविणाऱ्याना सावधगिरीचा इशारा देणारा आहे. वातावरणातील बदलाचा दृश्य परिणाम पाहता, भविष्यात अन्न सुरक्षा गृहीत धरून चालणार नाही, याची प्रथमच जाणिव झाली. पर्यावरण रक्षण नियमावली कायद्यात शिथिलता आणून भारत सरकारने प्रगतीच्या दिशेने पाऊल टाकले, असे मानले जाते. जनुकीय संपादित पिकाचे अन्य देशात जे सकारात्मक बदल दिसून येत आहेत, तसे बदल भारतात कधी होतील, याची प्रतिक्षा शास्त्रज्ञ करीत आहेत. एका निवेदनाद्वारे भारत सरकारने १९८९च्या पर्यावरण रक्षण कायद्यातील काही तरतुदी वगळल्या आहेत. अनेक सर्वजनिक व खाजगी संस्थांनी या आधीच या तंत्रज्ञानाचा वापर करून कमी पाण्याची गरज असणाऱ्या तांदळाच्या जातीचे उत्पादन विकसीत केल्याने निश्चितपणे शास्त्रज्ञांच्या समुदायाने सरकारच्या या निर्णयाचे उत्स्फूर्त स्वागत केले. कीड व रोगांचा प्रतिकार करण्याची क्षमता असणाऱ्या, वातावरणातील बदलास तोंड देऊ शकणाऱ्या पिकांचे उत्पादन अजून प्रगती पथावर आहे. तंत्रज्ञानाचा शेतकऱ्यांनी वापर हा केलाच पाहिजे. आमची नियमावली यंत्रणा नवीन तंत्रज्ञानाचा अंगीकार करण्यास सर्वांना उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षा आहे.

भारतासारख्या भरपूर लोकसंख्या असणाऱ्या देशांत अन्न सुरक्षिततेच्या बाबतीत कोणतीही तडजोड केली जाऊ शकत नाही आणि अण्णासाहेब शिंदे यांच्यासारख्या नेत्यांनी आम्हाला तंत्रज्ञानाचा वापर करण्यास शिकवले. जरी, अण्णासाहेब खेड्यातून आलेले असले तरी, त्यांना विज्ञान व तंत्रज्ञानाच्या समर्थ्याची जाणिव होती आणि अन्न सुरक्षेसाठी त्यांनी शास्त्रज्ञांना प्रोत्साहन दिले. पुढील वर्षी आपण लोकसंख्येच्या बाबतीत चीनलाही मागे टाकणार असल्याने अन्न सुरक्षेसाठी अण्णासाहेब शिंदे यांच्या सारख्या थोर नेत्यांनी दाखविलेला मार्ग आपण विसरता कामा नये. शेतकरी समुदायाच्या कल्याणासाठी विज्ञान व तंत्रज्ञानास प्रोत्साहन देणे, हीच सध्याच्या जन्मशताब्दी वर्षात श्री. अण्णासाहेब शिंदे यांच्या स्मृतीस योग्य आदरांजली ठरेल.

## नितीन गडकरी यांचे विचार

# या देशाचा 'अन्नदाता' शेतकरी 'ऊर्जादाता'ही व्हावा




**पाणी, वीज, रस्ते, वाहतूक व दळणवळण या ४-५ गोष्टी आल्या की, समृद्धी येईल. उद्योगधंदे वाढतील, रोजगार वाढेल, उत्पादन वाढेल, निर्यात वाढेल, उत्पन्नातही ववाढ होईल. काळानुसार,ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान परिवर्तनाचा उपयोग ग्रामीण व कृषी भारतात करण्यात आला तर, निश्चितपणे अण्णासाहेब शिंदे यांच्या स्वप्नातील भारत साकार झाल्याविना राहणार नाही.**

१९६२ मध्ये आमच्या शिर्डी लोकसभा मतदार संघातून स्वर्गीय अण्णासाहेब शिंदे जेव्हा लोकसभेवर निवडून गेले होते, तेव्हा मी शाळेत विद्यार्थी होतो, नंतर, ते केंद्रीय मंत्रिमंडळात कृषी मंत्रीही झाले होते. लालबहादूर शास्त्रीजींच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात जेव्हा आम्ही शाळेत होतो, तेव्हा 'एक वेळ भोजन करणे' याची आठवण होते. कारण, तो काळ अन्न टंचाईचा होता. त्यामुळे आपला महाराष्ट्र काय किंवा संपूर्ण देश अन्न सुरक्षेच्या बाबतीत परिपूर्ण कसा होईल, हा अगळ्यांचा आग्रह होता. त्यांनी प्रामुख्याने हरित क्रांतीसाठी खूप प्रयत्न केले. ही जी हरित क्रांती, दुग्ध क्रांती, तेलबिया क्रांती आहे, या तिन्ही क्रांतीत तसेच, मच्छिमारी क्षेत्रातही त्यांचे नेतृत्व आघाडीवर होते. त्यांच्या योगदानाचे देशाला आजही स्मरण होत आहे. आपले पहिले कृषी मंत्री पंजाबराव देशमुख यांचे आपण आजही स्मरण करतो. स्वर्गीय अण्णासाहेब शिंदे यांचे स्मरण करतो, कारण अन्न सुरक्षेच्या बाबत त्यांनी जो श्रीगणेशा केला होता, त्याची चांगली फळे आज आपल्याला मिळत आहेत आणि डॉ. स्वामीनाथन यानीही, कृषिमूल्यांसंदर्भात ज्या ज्या चर्चा झाल्या, जे जे मुद्दे मांडले तेही मान्य करण्यात आले. त्यामुळे त्यांचेही स्मरण करतो. हा झाला भूतकाळातील इतिहास! परंतु, भूतकाळ यासाठी महत्त्वाचा असतो की, भविष्यातील धोरण ठरविताना त्याचा उपयोग होतो. त्यामुळे त्या धोरणाच्या आधारे, देश समृद्ध, संपन्न करण्यासाठी आम्ही पुढे पावले टाकत जातो. एक गोष्ट निश्चित की, त्या काळात ज्या प्रकारे गहू असेल, तांदूळ असेल, या सर्व अन्नधान्याची कमतरता होती. त्यामुळे जे संशोधन झाले, जी क्रांती झाली, त्यामुळे जैविक विज्ञान खूप विकसीत झालेला आहे. त्याचबरोबर सिंचनाच्या क्षेत्रातही बऱ्यापैकी काम झालेले आहे. अजूनही भरपूर काम करायचे बाकी आहे. मी जेव्हा जलसंसाधन मंत्री होतो, त्या वेळी मी बराच प्रयत्न करून ४८ नदीजोड प्रकल्प तयार केले आणि १८ डी.पी.आर. तयार केले होते आणि एक शेतकरी या नात्याने माझ्या मनाला असे वाटते की, पाणी हीच सर्वांत मोठी समस्या आहे. ज्या दिवशी आमच्या देशाची

सिंचनाची क्षमता ५० टक्क्यांपेक्षा जास्त होईल, तेव्हा कोणी आपले स्वत:चे गाव सोडून शहराकडे जाईल, असे मला मुळीच वाटत नाही. कारण, पाण्याशिवाय समृद्धता, संपन्नता येऊ शकत नाही. आमच्या विदर्भात प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणावर होतात. सुमारे, दहा हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. जवळजवळ एक महिन्यापूर्वी मी अकोल्याला गेलो होतो, तेव्हा तेथे एक योजना सादर केली होती. रस्त्याच्या कामासाठी एक ॲग्रीगेट आवश्यक असते व त्या ॲग्रीगेटसाठी जे नाले आहेत, नदी आहे, त्याचे खोलीकरण करणे, रुंदीकरण करणे, गाळ काढणे आणि त्याच बरोबर हळहळू नाहणारे पाणी संथ प्रवाहित करणे, प्रवाहित पाणी अडविणे, अडवलेले पाणी जमिनीत मुरण्यासाठी वापरणे, गावचे पाणी गावात, घरातले पाणी घरात, शेतातले पाणी शेतात, या छोट्याशा तत्त्वाच्या आधारे हे करणे शक्य झाले. मी परवा अकोल्याला गेलो होतो, तेव्हा मला खूप आनंद झाला. माझ्या असे लक्षात आले की, पंजाबराव कृषी विद्यापीठाकडे १० हजार एकर जमीन आहे. त्यापैकी ४५० एकर जमीन ही सिंचनाखाली आहे आणि मी माझ्या खात्यातर्फे विनामूल्य ३६ तलाव बांधून दिले आणि ३६ तलाव बांधून दिल्यानंतर, मी बुलढाण्याला गेलो होतो, वाशीमला गेलो, अकोल्याला गेलो, यवतमाळला गेलो, अमरावतीला गेलो. हे तलाव बांधून झाल्यानंतर मी कुलगुरूंना भेटण्यास गेलो, त्यांनी मला अहवाल दिला व काही फोटो दिले. त्यावरून असे दिसून आले की, त्यांच्याकडील दहा हजार एकर जमिनीपैकी साडे नऊ हजार एकर जमीन पाण्याखाली आली. परिणामी, त्या भागातील ३२ हजार विहिरींना पाणी लागले. ज्या भागातील शेतकऱ्यांनी आत्महत्या केली होती, त्या भागात लिंबाची लागवड केली. लिंबाच्या बागा लावल्या. आज तेथील लिंबाची मोठ्या प्रमाणावर निर्यात होऊ लागल्याने त्या गावांचा चेहरामोहरा बदलून गेला. त्या वेळी पाणी ही समस्या होती. आज आपल्या देशात ‘पाणी जपून वापरा’ असे सांगितले जाते. मी म्हटले,“काही जपून वापरायची आवश्यकता नाही. पाणी भरपूर वापरा.” पाण्याची कमतरता नाही, पाण्याच्या नियोजनाचा अभाव आहे. मला अशी माहिती मिळाली की, पोलावरण नावाचे फार मोठे धरण आंध्र प्रदेशात सुमारे ७ हजार कोटी रुपये खर्चून बांधण्यात येत आहे. ते जे पोलावरण धरण होणार आहे, त्यामुळे आंध्र प्रदेशात भरपूर पाणी मिळणार आहे. पण, ते धरण तयार झाल्यानंतरही गोदावरी नदीचे १३०० टी.एम.सी. पाणी हे समुद्रात जात आहे. त्या वेळी एक योजना तयार करण्यात आली होती, ती फार कठीण आहे. ती योजना अशी होती की, गोदावरीचे जे अतिरिक्त जादा पाणी आहे ते पेनारमध्ये घ्यायचे, पेनारचे पाणी कावेरीत घ्यायचे आणि कावेरीचे पाणी थेट तामिळनाडूपर्यंत जाते. दोन पर्याय तर तयार झाले.





दुसरे चिदर्भ-तेलंगणाच्या सीमेवर कालेश्वरम् नावाचे फार मोठे धरण बांधण्यात आले आहे. मला ते धरण हेलिकॉप्टरमधून पाहण्यास मिळाले. त्यामुळे तेलंगणातील बहुसंख्य जिल्ह्यांना पाणी मिळणार आहे. नैसर्गिकरीत्या हे पाणी छतीसगडपासून येत आहे, छतीसगडमधील जंगलाच्या क्षेत्रातून पाणी येत असल्याने त्या पाण्यावर धतीसगडचा अधिकार आहे. हा थोडा गुंतागुंतीचा प्रश्न आहे. देशातील कायदे असे क्लिष्ट

तेव्हा आपल्या तीन नद्यांचे हक्काचे पाणी पाकिस्तानला जात अससल्याचे आपल्या अधिकाऱ्यांनी माझ्या लक्षात आणून दिले. तेव्हा मी असा विचार केला की, करारानुसार, तीन नद्यांचे जे पाणी आपल्या हक्काचे आहे ते पाणी वळवून, जे बादल साहेबांचे क्षेत्रातील इंदिरा कालव्यात सोडण्याचे ठरविले. इंदिरा कॅनॉल ठिकठिकाणी फुटलेला होता. त्या ठिकाणी २२०० कोटी रुपये खर्च करून संपूर्ण कालव्याचे सिमेंट काँक्रिटीकरण



आहेत. राज्या-राज्यांतील पाणी समुद्रात गेले तरी चालते. देशाच्याबाहेर गेलेले चालते, पण, कोणी तडजोड करण्यास तयार नाही. त्यामुळे हरित क्रांती पुढे घेऊन जाण्यात पाणी ही महत्त्वाची समस्या आहे. पंजाब, हरियाणा, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, राजस्थान आदि अनेक राज्यांमध्ये पाण्यासाठी भांडणे चालू आहेत. मी तोडगा काढण्याचा प्रयत्न करायचो. पण, त्याला अपेक्षित यश मिळत नव्हते. त्या वेळी सत्पाल मलिक साहेब हे काश्मीरचे राज्यपाल होते आणि पंजाबमध्ये काँग्रेसचे मुख्यमंत्री होते. मी विचार केला, प्रश्न असा सुटणार नाही. मी माझ्या कार्यालयात सर्व मुख्यमंत्र्यांना बैठकीस बोलावले. मुख्य अभियंते क मुख्य सचिवही होते. त्यांची भाडणे सुरू होताच मी म्हटले, तुम्ही भांडत बसा. मी भांडत बसत नाही. मी मिटिंग रूमला बाहेरून कडी लावली, “तुमची भांडणे झाल्यावर मला सांगा, म्हणजे, मी कडी उघडतो.” १९७० पासून २८ वाद होते, पाण्याचे तंटे होते. त्या पैकी १७ वाद सोडविण्यात यश मिळाले.

मला आश्चर्य वाटते, पाण्यासाख्या संवेदनशील प्रश्नावर पंजाब, हरियाणातील कोणीही नेता बोलतही नाही. १९४७ नंतर, म्हणजे, भारत व पाकिस्तान फाळणी झाल्यानंतर तीन नद्या आम्हाला मिळाल्या व तीन नद्या त्यांना मिळाल्या.

केले. त्यामुळे राजस्थानमधील सात जिल्ह्यांना पाणी मिळाले. जेव्हा मी हे केले तेव्हा पाकिस्तानमधून प्रतिक्रिया उमटल्या. माझे पुतळे जाळण्यात आले. मी त्यांना सांगितले, हे तर कायदेशीर आहे. करारात ज्याचा उल्लेख करण्यात आला होता, त्यानुसारच हे करण्यात आलेले आहे. आणि ते जे पाणी आले आहे, त्या पाण्याची पंजाब व हरियाणाला तर आवश्यकताच नाही. उलट, ते पाणी यमुना नदीत सोडून राजस्थानच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचवता येते.

तर, पहिली गोष्ट म्हणजे, आपल्याकडे पाण्याची मुळीच कमतरता नाही. आपल्या महाराष्ट्रात सह्याद्रि पर्वतावरून येणारे अगळे पाणी एका खोऱ्यातून दुसऱ्या खोऱ्यात नेले पाहिजे. महाराष्ड्र व गुजरातमधील पिंजर प्रकल्प असाच रखडला आहे. काकिनाडा, नर्मदा, दमणगंगा, पिंजर' हा प्रकल्प. सह्याद्रिच्या वरील बाजूस मोठे धरण बांधल्यास समुद्राकडे जाणारे पाणी त्यात साठवता येईल व ते पाणी गोदावरी नदीत हळुहळू सोडल्यास नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार, अहमदनगर व त्यानंतर जायकवाडी शंभर टक्के भरून जाईल. परिणामी, मराठवाड्यात पाण्याची कसलीच समस्या राहणार नाही. मात्र, अद्याप त्यात यश काही मिळाले नाही. गुजरात व महाराष्ट्र यांच्यातील वादावर कोणता मार्ग निघू शकला नाही. हरित

क्रांतीचा अतिशय महत्त्वाचा संबंध हा पाण्याशी आहे आणि पाण्याचा संबंध हा समुद्रात जाणाऱ्या पाण्याशी आहे. आता एक नवीन कल्पना विकसीत झाली आहे. पुराचे जे पाणी असते, ते पाणी एका खोऱ्यातून दुसऱ्या खोऱ्यात वळविणे होय. पुरामुळे आपल्या येथे जे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते, बिहार व उत्तर प्रदेशात मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याचे कारण म्हणजे, या नद्या नेपाळमधून निघतात आणि नेपाळमध्ये आपण जर धरणे बांधली तर, त्याची क्षमता सहा हजार मेगावॅट पॉवरची आहे. नेपाळमध्ये सध्या लोडशेडींग चालू असते. नेपाळच्या राजदूतांना मी एक अशासकीय प्रस्ताव दिला. आपल्याला जितकी वीज लागते, तेवढी दोन हजार आठशे मेगावॅट वीज आम्ही नेपाळला मोफत देऊ. आपण एक धरण बांधावे. अजून भारत-नेपाळ करार प्रलंबित आहे. या प्रकल्पातून जी वीज निर्मिती होईल, त्याचा पैसाही आपलाच असेल आणि जे पाणी असेल ते हळुहळू सोडून, आम्ही जलमार्गेही तयार केले आहेत. ते गंडक नदीला तसेच गंगा नदीलाही जोडलेले आहेत. योगायोगाने मी त्या वेळी जहाज बांधणी मंत्री होतो. गंडक येथून हल्दियामार्गे गंगाा नदीपर्यंत जलमार्ग तयार झाला तर, थेट जलमार्गाने वाहतूक होईल. म्हणजे, खर्चातही बचत होईल, प्रति किोमीटर रस्त्याने जाण्यास दहा रुपये, रेल्वेने ६ रुपये तर, जलमार्गाने फक्त १ रुपया लागेल, त्यात तुमचाही फायदा होणार असल्याने या प्रस्तावास आपण अनुमती द्यावी, असे मी म्हटले होते.

अहमदनगर जिल्ह्यात, पुण्यात, कोल्हापूर जिल्ह्यात ठिबक सिंचनामुळे उत्पादनात अडीच पटीने वाढ झाली आहे. मला वाडते पाणी हे हरित क्रांतीचा पाया आहे. हा विषय वादाचा व्हावा, असे मला मुळीच वाटत नाही. एक वेळ अशी होती की, मिलो खाण्याची वेळ जनतेवर आली होती. आम्हाला मिलो आयात करावा लागत होता. पण, आज परिस्थिती वेगळी आहे. मी युद्धाचे समर्थन करणार नाही. पण, युक्रेन व रशियातील युद्धामुळे आमच्या गहू व तांदळाची मोठ्या प्रमाणावर निर्यात झाली. अन्नधान्य ठेवण्याठी आमच्या कोठारात जागा नव्हती. हरियाणा, पंजाबमधील कोठारे खचाखच भरली होती. अण्णासाहेब शिंदे व स्नामीनाथन यांनी नवीन तंत्रज्ञान आणले. त्यामुळे बियाणांमध्ये बदल झाले, उत्पादकता वाढली. तेवढ्याने आमचे मुळीच समाधान झालेले नाही. जगाच्या तुलनेत आम्ही अजूनही खूप मागे आहोत. इस्रायलमध्ये एका एकरात ३० क्विंटल कापूस होतो. समेरिकेत एका एकरात ३० क्विंटल सोयाबिन होतो. अर्जेन्टिनामध्ये २८ क्विंटल होतो आणि ब्राझिलमध्ये २६ क्विंट होतो आणि आपल्या देशात ६ क्विंटल होतो. मी दहा वर्षांपासून सोयाबिन लावतो. सोगाबिन ५ क्विंटल होतो. आता जीएम बीयाणांचा प्रश्न आहे, जैविक शास्त्राचाही आहे. शेतीमध्ये तंत्रज्ञान व विज्ञानामुळे खूप परिवर्तन झोंलेले आहे. हे एक कटु सत्य आहे की, नावीन्य, उद्योजकता, विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन कौशल्य, यशस्वी सराव या ज्ञानाचा भविष्यात उपयोग होईल. एक छोटेसे उदाहरण घेऊ या! 'नॅनो युरिया' आला आहे. त्याची निर्मिती राष्ट्रीय केमिकल फर्टिलायझर(आर.सी.एफ.) ने केली आहे. एक ५०० मि,लि.ची बाटली एका बॅगेच्या किंमतीवर आहे. जर आम्ही एका एकरात युरियाची चार पोती



टाकली तर ७५ टक्के युरिया वाया जातो व २५ टक्के युरिया रोपांना मिळतो. आता 'ड्रोण' आला आहे. पवार साहेब व मला राहुरी कृषी विद्यापीठाने डी.लिट.दिली तेव्हा त्यांनी 'ड्रोण' तयार करण्यास प्रारंभ केला होता. मी त्या कार्यक्रमाला गेलो होतो. आमच्या समोर 'ड्रोण'चा भरपूर वापर करण्यात आला. हा जो नॅनो युरिया जो आहे, ग्याची फवारणी जर 'ड्रोण'ने केली तर, ७५ टक्के युरिया रोपांना मिळतो आणि २५ टक्के वाया जातो. म्हणजे, युरियाच्या चार पोत्याऐवजी दोन पोत्यात व दोन बाटलीत काम होते. म्हणजे, आपण लक्षात घ्यावे की, पैसे वाचविणे म्हणजे, मिळविणे होय. तंत्रज्ञावामुळे उत्पादन खर्च कमी होतो. मी जे 'ड्रोण' पाहिले ते मिथियम ऑईलवर होते. मी म्हटले, हे असे नको. मला ते फ्लेक्स इंजिनवर आहिजेत. वाहतूक मंत्रीही मीच होतो. ऑटोमोबाईल इंडस्ट्री माझ्याच जवळ आहे. मी सांगितले हे ड्रोण फ्लेक्स इंजिनवर तयार करा. फ्लेक्स इंजिनचा ड्रोण ३ लाख रुपयांना मिळतो व मिथियमचा बॅटरीवरचा ड्रोण सात लाख, आठ लाखाला मिळतो. इथेनॉल ग्रीन फ्युएल शेतकऱ्यांनी तयार केले आहे आणि त्याच्यावर ड्रोण तयार केला तर, खर्चात मोठी बचत होईल. विज्ञान व तंत्रज्ञानाचे महत्त्व जास्त आहे. मला खूप आनंद आहे की, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी भरपूर प्रगती केली आहे.





नाशिकच्या शेतकऱ्याने स्पेनमधून संत्र्याची दहा झाडे आणली. नागपूरमध्ये संत्री संशोधन इन्स्टिट्यूट आहे. तेथे संत्र्यांची झाडे तयार केली जातात. मागणीप्रमाणे संत्र्यांची झाडे ते देऊ शकत नाहीत. त्यांच्याकडे प्रतिक्षा यादी तयार केली जाते. मी त्यांना समजावून सांगितले की, रूफ-टॉप सोडून द्या. शंभर नर्सरींना शिफारस करा ते संत्र्यांची झाडे घेऊन जातील. ते म्हणाले, "आमच्या धोरणात ते बसत नाही." मी म्हटले, "सरकार कोण आहे?" त्यावर ते म्हणाले, "आपणच आहात." मग मी त्यांना म्हणालो, "मी सांगतोय. ते धोरणात बातेय. तुम्ही देऊन टाका." आत्ता आम्ही ८० नर्सरीजना 'जॉईट-व्हेंचर' केले आहे आणि उत्तम संत्री व लिंबाची  कलमे आहेत, आमचे वरुडमोर्चेचे खासदार येथे बसले आहेत. मी त्यांना म्हणालो, "आपल्या भागातील सर्व सर्सरीजना बोलावून घ्या व त्यांचे टेक्निकल मॉईंट-व्हेंचर या नागपूरच्या संस्थेशी करून घ्या व रूफ-टॉप सुधारा. ते सुधारले तर गुणवत्ता सुधारेल. अशा प्रकारचे रुफ-टॉप आलेले आहेत की, ज्याच्यावर कोणत्याही रोगाचा प्रार्दुभाव होत नाही. तर, विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर होऊ लागला आहे,  याची पवार साहेबांना कल्पना आहे. आमच्या द्राक्षामध्ये नवनवीन गुणवत्ता येऊ लागली आहे. सह्याद्रि फार्म हाऊसने १५०० कोटी रुपयांच्या द्राक्षांची निर्यात केलेली आहे. आज युरोपियन बाजारपेठेत किंवा जागतिक बाजारपेठेत आपण कोठेही गेला, कोणत्याही मोठ्या घरच्या लग्न समारंभात जा, भोजन झाल्यावर फळे खाण्यास जा. त्यात भारतातील एकही फळ नसते. सर्व फळे आयात केलेली असतात.

कृषी क्षेत्रात तंत्रज्ञान हे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे आपल्या निर्यातीत वाढ होईल. मूल्यवर्धित होईल. जेव्हा आपले अण्णासाहेब होते, लालबहादूर शास्त्री होते, तेव्हा त्यांनी स्वीकारलेली भूमिका अगदी योग्य होती. देशात अन्न

सुरक्षेची आम्हाला नितांत आवश्यकता होती. जास्त उत्पन्न ही आमची समस्या आहे. मका जास्त, त्याला किमान आधारभूत किंमत देऊ शकत नाही. तांदूळ जास्त, गहू जास्त, साखर जास्त. मी तर साखरवाल्यांना नेहमी म्हणत असतो, साखर कारखान्यांनी जर इथेनॉलचे उत्पादन केले नाही तर, आज जसे शेतकरी आत्महत्या करीत आहेत, तसे एक दिवस साखर कारखानेवाले आत्महत्या करतील. मी नेहमी गंमतीने म्हणत असतो, जो गेल्या जन्मी पाप करतो, तोच साखर कारखाना काढतो नाहीतर वृत्तपत्र काढतो. तुटवडा आहे तो फक्त





तेलवियांचांचा! आम्ही दीड लाख कोटी रुपयांचे खाद्यतेल आयात केले. आगतिक अर्थव्यवस्थेमुळे आज कोणत्याही पक्षाचे सरकार असले तरी, खाद्यतेलाचे भाव निश्चित करणे हे सरकारचच्या हातात रहिलेले नाही. जर बांगला देशात कापसाची मागणी वाढली तर, कापसाला भाव मिळेल. मागणी कमी झाली की, भाव खाली येतील. त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्था लक्षात घेऊन पीक पद्धतीत योग्य तो बदल करण्याची आवश्यकता आहे. मला तर वाटते की, या देशातला शेतकरी हा अन्नदाता आहे तो आता ऊर्जादाताही बनावा. 'ऊर्जादाता' बनण्यात इथेनॉल हे आहेच. कोणतीही नवीन संकल्पना अंमलात आणताना सरकारला तर अडचणी येतातच. हे जे फ्लेक्स इंजीन जे आहे ते अमेरिका, कॅनडा व ब्राझिलमध्ये तयार होते. शंभर टक्के पेट्रोल व शंभर टक्के बायो-इथेनॉल! इथेनॉलची कॅलरी थोडी कमी आहे. पेट्रोलची थोडी जास्त आहे. पेट्रोलचे अॅव्हरेज जास्त व इथेनॉलचे अॅव्हरेज कमी असते. अलिकडे रशियात शास्त्रज्ञांनी एक प्रयोग केला. त्यांनी इथेनॉलचे अॅलरीमूल्य पेट्रोलच्या बरोबरीने केली. तेव्हा मी रशियन शास्त्रज्ञास भारतात बोलावले. त्यांनी मला प्रेझेन्टेशन दिले. त्यानंतर मी पेट्रोलियम मंत्री पुरी साहेब, इंडियन ऑईलचे चेअरमन श्री. वैद्य साहेब व इंडियन ऑईलमधील शास्त्रज्ञ रामकुमार यांना घरी बोलावले व रशियन शास्त्रज्ञाने सादरीकरण दिले, नंतर, तीन महिन्यांनी रामकुमार यांना त्यात यश आले व त्यास सरकारने मान्यता दिली. इथेनॉलचे अॅव्हरेज पेट्रोलच्या बरोबरीने आले. त्यामुळे तेल कंपन्या जी तक्रार करीत होती, तो प्रश्न राहिला नाही. हे जे फ्लेक्स इंजीन येऊ घातले आहे, ज्याचा वापर करून बजाजने दुचाकी तयार केली आहे. मी पवार साहेबांना सांगू इच्छितो की, पुढील महिन्यात मी 'टीव्हीएस'ची ऑटोरिक्षा, शंभर टक्के बायो-इथेनॉलवर दुचाकी बजाज, टीव्हस व हिरो या तिघांनी तयार केली असून त्याचे उद्घाटन पुण्यात होणार आहे, तेव्हा आपण जरुर यावे. सध्या पुण्यात इथेनॉलचे



तीन पंप आहेत. इथेनॉलचा दर ६२ रुपये लिटर व पेट्रोल १२० रुपये लिटर आहे. निम्म्या किंमतीत. अॅव्हरेज तितकेच मिळेल आणि प्रदूषण नसल्यासारखेच! हे शेतकऱ्यांचे इंधन आहे. आता टोयाटो, ह्युंदाई, विक्रम किर्लोस्कर, सुझुकी हे सगळे माझ्याकडे आले. विक्रमने 'केम्ब्री' नावाची कार तयार केली. त्याचे वैशिष्ट्य असे की, ही कार पेट्रोल टाकल्यावर ६० टक्के

पेट्रोलवर व ४० टक्के विजेवर चालते. ही कार चालू असतानाच वीज तयार करते. आता टोयाटोची विजेवर धावणारी कार येत आहे. त्यात ६२ रुपये लिटरचे शंभर टक्के  इथेनॉल टाका. यात ४० टक्के वीज तयार होईल. ही कार पुढील महिन्यात बाजारात येत आहे. आमच्या बजाजची स्कूटर, ऑटोरिक्षा आलेली आहे. मला एका गोष्टीची खंत वाटते की, पुण्यात हे इथेनॉल तयार होत असताना तिथे पेट्रोल-डिझेल का वापरले जाते? हे पुण्यात सुरू होणे अत्यंत आवश्यक आहे. देशातही होईल. याचा दर्जा उत्तम असल्याचे सिद्धही झालेले आहे. इथेनॉलचे जे अर्थशास्त्र आहे, ते म्हणजे, ४५० कोटी लिटर इथेनॉल आपल्याला मिळते. ते सगळे वापरले तरी आपल्याला दहा टक्केही मिळत नाही.

मी किर्लोस्कर यांच्या मागे लागलो की, मला इथेनॉलवर चालणारा  जनरेटर तयार करून द्या. आता त्यांनी शंभर टक्के बायो इथेनॉलवर चालणारा जनरेटर बनवून दिला. माझ्याच घरी त्यांनी तो जनरेटर बसविला आहे. आमचे जे आयटी टॉवर आहेत, त्याला चार हजार कोटी लिटर डिझेल खर्च होते. त्याने प्रदूषणही होते. व ते आयात केलेले आहेत. हे सगळे इथेनॉलवर परिवर्तीत झाले तर....मी त्या चार कंपन्यांना व आय.टी. मंत्र्यांना घरी बोलावले. मी त्यांना सांगितले की, या कंपन्यांना ते टॉवर एक वर्षांत इथेनॉलवर करणे सक्तीचे करा. आता जेसीबी कंपनी आहे. मी त्यांना 'सीएनजी'वर जा असे सुचविले, ते का कू करू लागताच मी  म्हणालो, ना..,ना..करायचे असेल तर, माझ्याकडे यायचेच नाही. अखेर जेसीबीने तयार केले. मी त्याचे उद्घाटन केले. त्यांना एक जार 'जेसीबी'ची ऑर्डर रशियातून मिळाली. तो जेसीबी ५० टक्के बायो सीएनजीवर आणि ५० टक्के डिझेलवर चालतो.



माझ्याकडे बांधकामासाठी जी मशिनरी आहे, त्यात ८८ टक्के वाढ आहे. मी रस्ते तयार करतो म्हणून त्यांची ही मशिनरी आहे. मी सगळ्यांना सांगितले की, इथेनॉल, सीएनजी, बायो-डिझेल, हायड्रोजन, इलेक्ट्रिक यावर या. अन्यथा मी दुसऱ्यांना काम देईन. आपणास आश्चर्य वाटेल, आजच मी कार्यक्रमाला येण्यापूर्वी अशोक लेलँडचा मला फोन आला. त्यांनी मला निमंत्रण दिले.  मुंबईत १५० दुमजली इलेक्ट्रिक बस सुरू करायच्या आहेत, आपण त्यासाठी वेळ द्यावा. विशाखापट्टणम येथे एक कंपनी आहे, त्यांनी इलेक्ट्रिक ट्रक तयार केला आहे. आता 'ग्रीन हायड्रोजन'ही येईल व तो दिवस फार दूर नाही. आज माझ्यावळ हायड्रोजनवर चालणारी कार आहे. मी संसदेत जाताना वापरतो. लोकांचा अजून या गोष्टीवर विश्वास नाही. हायड्रोजन तीन प्रकारचा आहे. ब्लॅक हायड्रोजन कोळशापासून मिळतो, ब्राऊन हायड्रोजन पेट्रोलियमपासून मिळतो व ग्रीन हायड्रोजन पाण्यापासून मिळतो.

आता आसाममध्ये बांबूपासून इथेनॉल तयार करण्यात आले. कर्नाटकातील जो भीमा बांबू आहे, तो दोन वर्षांत एका एकरात २०० टन येतो आणि पाच हजार भाव मिळाला तर, झाले दहा लाख. मग शेतकऱ्यांनी कशाला गहू, भात लावायचा? ते तर करायचेच, फळेही करायची. पण, मला असे वाटते, जर आपण ऊर्जेच्या क्षेत्रात पाऊल टाकले तर?

विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर करून ही जी नवीन क्रांती अण्णासाहेबांनी सुरु केलेली आहे, त्यात कृषी उत्पन्न हे देशातील एकूण उत्पन्नाच्या ८ ते १२ टक्के आहे. २२ ते २४ टक्के मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्राचे आणि ५२ ते ५४ टक्के योगदान हे सेवा क्षेत्राचे आहे. जर देशात आवांना समृद्ध करायचे असेल व स्थलांतर रोखायचे असेल तर, कृषी क्षेत्राचे योगदान २० टक्के करावे लागेल. मला ठाम विश्वास आहे की, एक दिवस असा येईल की, लोक शहरातून आपल्या गावी जायला लागतील. मी त्याची सुरुवात केली आहे. मी शेतात घर बांधले आहे. मी नेहमी गावाला जाऊन राहतो. तेथील हवाही शुद्ध आहे. गावांची पैसे खर्च करण्याची क्षमता वाढली की, शाळा, कॉलेज तेथे येतील, संस्था येतील, रस्ते होतील. पाणी, बीज, वाहतूक व दळणवळण या ४-५ गोष्टी आल्या की, समृद्धी येईल. उद्योगधंदे वाढतील, रोजगार वाढेल, उत्पादन वाढेल, निर्यात वाढेल, उत्पन्नातही ववाढ होईल. म्हणूनच, मी अण्णासाहेब शिंदे यांच्या स्मृतीस विनम्र श्रद्धांजली अर्पण करतो. जो पाया कृषीला समृद्ध करण्याचा होता, काळानुसार,ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान परिवर्तनाचा उपयोग ग्रामीण व कृषी भारतात करण्यात आला तर, निश्चितपणे त्यांच्या स्वप्नातील भारत साकार झाल्याशिवाय राहणार नाही.

fff

## घंटाकर्ण







# विठ्ठल हरी घोटगे ऊर्फ जे. पी. नाईक यांचे कार्य

प्रा.डॉ. गणेश राऊत

डॉ. जे. पी.नाईक या अखिल वैश्विक पातळीवर नावाजल्या गेलेल्या शिक्षणतज्ञांची कृतज्ञ आठवण आपण या लेखाद्वारे करणार आहोत. ३० ऑगस्ट हा त्यांच्या पुण्यतिथीचा दिवस. त्यांना आपल्यातून जाऊन चार दशके पूर्ण झाली आहेत. ७४ वर्षांच्या आयुष्यात जे.पी. अनेक आयुष्य जगले. 'त्यांचा जीवनपट थोडक्यात अभ्यासून त्यांच्या कार्याचा सखोल वेध आपण घेऊयात.'



जीवनपट – ५ सप्टेंबर १९०७ रोजी त्यांचा जन्म आजच्या कोल्हापूर जिल्ह्यात आणि तेव्हाच्या करवीर संस्थानात झाला. आजरा तालुक्यातील बहिरेवाडी गावी त्यांच्या जन्म झाला. शालेय आयुष्यात इयत्ता चौथीत असतानाच त्यांनी आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक सगळ्यांना दाखवून दिली. ते चौथीची परीक्षा पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. मॅट्रिकनंतर बी. ए. (ऑनर्स) गणित विषयातून त्यांनी पदवीचे शिक्षण पूर्ण केले. देशभरात याच कामात स्वातंत्र्य लढयाचे वातावरण होते. जे.पी. यांनी म. गांधींजीच्या चळवळीत सहभाग घेतला. आणि कर्नाटकातील बेल्लारी तुरुंगात प्रवेश केला. याच काळात त्यांनी धारवाड प्राथमिक शिक्षणप्रसार मंडळाची स्थापना केली. कोल्हापूर संस्थानात कारकीर्द सुरू करून संस्थानच्या विकासाची पंचवार्षिक योजना त्यांनी आखली. भारत स्वतंत्र झाल्यावर 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन' संस्था स्थापली. गारगोटी येथे मौनी विद्यापिठाची स्थापना केली. पुढे भारतीय समाजविज्ञान संशोधन परिषदेची स्थापना केली. शैक्षणिक क्षेत्रातील सेवेबद्दल 'पद्मभूषण' पुरस्काराने त्यांना सम्मानित करण्यात आले. पुणे मुक्कामी ३० ऑगस्ट १९८१ रोजी त्यांचे निधन झाले. पु.ल. देशपांडे यांनी त्यांचे वर्णन 'शिक्षकांचे शिक्षक' असे केले आहे. प्रतिभावंत शिक्षणतज्ज्ञ डॉ.जे.पी. नाईक या सागर देशपांडे संपादित ग्रंथात त्यांनी नाईक यांचे यथार्थ वर्णन केले आहे. "ज्यांच्या रक्तातच तांबडया – पांढऱ्या पेशींबरोबर 'शिक्षण ही देखील एक पेशी असावी' अशा आपल्या चरित्र नायकाची संपूर्ण माहिती आता आपण जाणून घेऊयात. महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष बाबासाहेब कुपेकर यांनी जो अभिप्राय दिला आहे तो यासंदर्भात महत्वाच्या आहे. ते लिहितात– "युनेस्कोने जगातील शंभर शिक्षणतज्ञांची यादी केली. त्या यादीतील तीन भारतीयांमध्ये महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर, यांच्यासमवेत डॉ. जे. पी. नाईक यांचे नाव असणे हे आपल्या सर्वानाच भूषणावह आहे."

जे.पी.नाईक एक असामान्य शिक्षणवेत्ता या होणात डॉ.चित्रा नाईक यांनी जे.पी. नाईक यांचा नामबदलाचा प्रसंग दिला आहे तो मुळापासून वाचण्यासारखा आहे. त्या लिहितात – 'कोल्हापूर जिल्ह्यातील बहिरेवाडी हया लहानशा खेड्यातील घोटगे आडनावाच्या कुटुंबात ५ सप्टेंबर १९०७ रोजी जन्मलेल्या मुलाचे नाव त्याच्यावडिलांनी 'विठ्ठल' ठेवले, त्यांचे स्वत: चे नाव होते 'हरी'. अशारीतीने जो विठ्ठल हरी घोटगे जन्माला आला त्याचे नामांतर पुढे 'जयंत पांडुरंग नाईक' असे झाले.ही नाम बदलाची कथा अशी : हा मुलगा १९३० साली स्वातंत्र्य संग्रामात उतरला तेव्हा पोलिसांनी त्याला पकडून कोर्टात उभा केला. आपल्या स्वातंत्र्यलढ्याचा उपद्रव कुटुंबियांना होऊ नये म्हणून त्याने आपल्या व वडिलांच्या नावाचे भाषांतर केले. 'जयंत' व 'पांडुरंग' आणि 'नाईक' हे आडनाव त्याने धारण केले कारण हे आडनाव भारतात अनेक ठिकाणी आढळते. आणि ते प्रांतवाचक, जातीवाचक, धर्मवाचक किंवा व्यवसायवाचकही नाही. कोर्टात दिलेले हे नाव तुरुंगाच्या नोंदवहीत कायम झाले आणि त्यानंतरच्या सरकारी दप्तरात व गॅझेटमध्ये त्यावर रितसर शिक्कामोर्तब झाले.


नाईक यांचे बालपण त्या काळातील गरिब घराण्यातच गेले. शाळेत जाण्यापूर्वी गुरे राखायचे काम त्यांना करावे लागले. याच वयात त्यांना शाळेत जाण्याची खूप उत्सुकता होती. मोठ्या वयात शाळेत जाण्याची संधी मिळताच त्यांनी चार वर्षांचा अभ्यासक्रम दोन वर्षातच संपविला. अर्थात त्या काळी परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांला बढती देण्याचे अधिकार मुख्याध्यापकांना असत. त्याचा फायदा विठ्ठल उर्फ जयंतास झाला. चौथी पास झाल्यावर पुन्हा एकदा शालेय जीवनात खंड पडला. सुदैवाने घरातील नातेवाईकांमुळे पुन्हा एकदा शाळेशी सांधा जोडला गेला. बैलहोंगल, बेळगाव येथे पुढील शिक्षण झाले. मराठी, इंग्रजी आणि कानडी आशा तीन भाषा अभ्यास झाला. गणितात प्राविण्य मिळवले. मॅट्रिकच्या परीक्षेत अंगभूत हुशारीच्या जोरावरवर नाईक यांनी 'अखबारनवीस' पारितोषिक मिळवले. उच्च शिक्षणासाठी करवीर संस्थानची मदत झाली. कोल्हापूर मधील राजाराम कॉलेजमध्ये विद्यार्थी वसतिगृहात प्रवेश होऊन पुन्हा एकदा शिक्षणासंदर्भात जयंताने 'पुनश्च हरि ***केले'

कोहापूरचे शैक्षणिक, सामाजिक, संकृतिक वातावरणात विठ्ठलराव रमले. गणित या विषयाची मूळची आवड पुन्हा एकदा उफाळून आली. गणिता सारख्या त्यांच्या दृष्टीने सोपा, मनरंजक विषय आणि त्याच्या जोडीला संस्कृत साहित्य, इंग्रजी, इतिहास, सामाजिक शास्त्रे, विज्ञान अशा कितीतरी वेगवेगळ्या परंतु परस्परावलंबी विषयांचा त्यांनी कसून अभ्यास केला. याच वेळेला कॉलेजमध्ये देखील विद्यार्थांना आश्चर्याचे धक्के बसले. कारण खालच्या वर्गात असणारे विठ्ठलराव वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांचे इंग्रजीचे तास घेऊ लागले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे अधिकृत वर्गापेक्षा याच वर्गात जास्त गर्दी व्हायची. याला पूरक अशी गोष्ट महाराष्ट्रातील ख्यातनाम वक्ते आणि लेखक पु.ल.देशपांडे यांनी आपल्या 'शिक्षकांचा शिक्षक' या लेखात दिली आहे.

एकदा पु.ल. सुनीताबाई आणि जे.पी.कोल्हापूरहून साताऱ्याकडे येत होते. या प्रवासात प्रख्यात आंग्लकवी रॉबर्ट ब्राउनिंग याचा विषय निघाला. या प्रवासात 'लेटीज ग्लोब' या कवितेवर जे.पी. दीड तास बोलत होते. पु.ल. सारखा 'वक्ता दशसहस्त्रेषु' वक्ता हे सगळे मंत्रमुग्धपणे ऐकत होता. खरं

म्हणजे या सम हा ।

विद्यार्थी दशेतच जे.पींनी भावी आयुष्याची तयारी करवून घेतली. कविता लेखन, काव्यवाचन, संस्कृत-इंग्लिश भाषेवर प्रभुत्व मिळविणे, व्याख्याने देणे यामुळे विनोद - गणिती काटेकोरपना - साहित्य या त्रिगुणी युक्त भाषणांची मेजवानी श्रोत्यांना मिळू लागली.तत्कालीन कालखंडात नोकरी मिळणे सोपे असायचे. बी.ए. झाल्याबरोबर संस्थानात विशेषत ; राजाराम महाविद्यालयात नोकरीची संधी असताना सुध्दा जे.पी. स्वातंत्र्य चळवळीत उतरले. १९३० ते ३७ हा वादळी कालखंड त्यांच्या आयुष्यात आला . ही सात वर्षे म्हणजे कशासाठी? कोणासाठी? या प्रश्नांना देशासाठी' हे उत्तर देणारी होती. स्वातंत्र्य लढा, नेते, सामान्य माणसे या सगळ्या गोष्टी त्यांनी अगदी जावळून पाहिल्या. असहकार लढा सहभागाबद्दल त्यांना दोन वर्ष सक्तमजुरीची बक्षिसी मिळाली.



कर्नाटकातील बेल्लारीच्या तुरुंगात त्यांना रहावे लागले, या तुरूंगात त्यांनी जो समाजसेवेचा आदर्श केला त्याला तोड नाही. तुरुंगातील वयोवृद्ध कैदी, रुग्ण यांच्या वैयक्तिक सेवेचे कार्य त्यांनी हाती घेतले. नाईक यानी त्या रुग्णांना बरे केले. तुरुंगातील ब्रिटिश डॉक्टरच्या मदतीने त्यांनी रुग्णतपासणी, रोगनिदान, औषधोपचार यांचा त्यांनी विशेष अभ्यास केला. जे.पी. लवकरच तुरुंगातील सगळ्यांचे डॉक्टर झाले. तुरूंगात त्यांना दारिद्र आणि अशिक्षितपणा व अनारोग्य यांचे दर्शन झाले. यावर मात करायची असेल तर आपण स्वतःला विधायक कामात गुंतवून घेतले पाहिजे अशा निष्कर्षाला ते आले. या तुरुंगात त्यांना आपल्या आयुष्याचे ध्येय सापडले ते म्हणजे 'शैक्षणिक कार्याद्वारे जनसेवा'.

आयुष्याचे उद्दिष्ट्य सापडले तरी पुढचा प्रवास सोपा नव्हता. तुरुंगातील अनुभवांच्या जोरावर वर एखाद्या प्रयोगशाळेत स्वत:ला गुंतवून घेऊन तेथे प्रयोग करणे. जे.पी. यांना आवश्यक वाटू लागले. यातूनच ते उप्पीनबेटीगेरी या विणकरांच्या गावात दाखल झाले. भारतातल्या सगळ्याच प्रतिकूल गोष्टी या गावात एकत्र झालेल्या होत्या. गावात शाळा आणि दवाखाना सुरु करून नाईकांनी सामाजिक कार्याची मुहूर्तमेढ रोवली. एकशिक्षकी शाळा, प्रौढ साक्षरता वर्ग, दवाखाना सुरू झाल्याने गाव नाईकांचे ऐकू लागले. या गावाला आठवडे बाजारचा प्रश्न होता. ते गाव प्रवासासाठी लांबवर होते. नाईकांनी धारवाडच्या ग्रंथालयात जाऊन अभियांत्रिकीचा अभ्यास केला आणि टेकडी फोडून काढली. विकासाचा मार्ग खुला झाला. यामुळे शेतमाल खरेदी-विक्री सोपी झाली. या सगळ्या वार्ता इंग्रज सरकारपर्यंत पोहोचल्या. धारवाडचे सरकारी अधिकारी येऊन पाहणी करून गेले.

उच्च अधिकाऱ्यांपर्यंत अहवाल गेले. इंग्रज सरकारने चक्क त्यांचे कौतुक करायचे ठरविले गुणग्राहकतेत दाद द्यायचे ठरविले. मुंबई प्रांताचे गव्हर्नर सर फ्रेडरिक साईक्स यांच्या सन्मानार्थ ठेवलेली. ग्रामीण सुधारणा ढाल या गावाला बक्षीस मिळाली. या सगळ्या अनुभवांच्या फायदा त्यांना आयुष्यभर झाला.या सगळ्या प्रयोगाचे सार सांगताना जे.पी.नाईक यांच्या पत्नी आणि ख्यातनामशिक्षणतज्ञ डॉ.चित्रा नाईक यांनी लिहिले आहे की -"समाजपरिवर्तन हे एकट्यादुकट्या नेतृत्वाने होत नसते. विकासाची उर्मी जेव्हा उच्चशिक्षित विचारवंत व सामान्य जनता यांच्या परस्पर संवादामुळे व सहकार्यामुळे सलग्नतेने निर्माण होते तेव्हाच परिवर्तनाचा प्रवाह सुरु होतो. दृश्य स्वरूप घेऊ शकतो. "तर याच कामाबद्दल स्वतः नाईक म्हणतात "बेल्लारीचा तुरुंगवास आणि उप्पीनबेटीगेरीतील पाच वर्षे या दोन दुर्बिणीतून मला भारताचे खरे दर्शन झाले. मी देशासाठी काय करायचे ते मला समजले.

गावात हे काम चालू असतानाच धारवाडमध्ये विविध विषयावर व्याख्याने देण्याचे काम चालू होतेच, लेखन -वाचन, व्याख्यान यावरही त्यांनी लक्ष केंद्रित केले होते. आशातच १९३५ च्या कायद्याने भारतभर विविध इलाख्यांमध्ये राज्य सरकारे अस्तित्वात आली. १९३७ मध्ये मुंबई इलाख्याचे पंतप्रधान बाळासाहेब खेर ( तेव्हाच्या काळी मुख्यमंत्र्याना पंतप्रधान म्हणायचे) यांनी नाईक यांना 'राज्य' प्राथमिक शिक्षण मंडळ आणि 'राज्य प्रौढशिक्षण मंडळ' यांवर सदस्य म्हणून निमंत्रितकेले. शिक्षण आणि अर्थशास्त्र विषयातील अभ्यासु आणि समविचारी लोकांशी नाईक यांनी संपर्क साधला. या सर्वांशी वैचारिक देवाणघेवाण सुरु झाली. अशातच त्यांनी

'धारवाड प्राथमिक शिक्षण प्रसार मंडळ' संस्थेची स्थापना करून मागास भागात ३० शाळा सुरू केल्या. स्वयंसेवी प्राथमिक शाळांचा' हा पहिलाच आशा रितीचा प्रयोग होता. शैक्षणिक नियोजनावर त्यांनी भर दिला. मुंबई इलाख्यात हे काम चालू असतानाच करवीर संस्थानातून त्यांना बोलावणे आले. मातृभूमीची हाक स्वस्थ बसू देत नव्हती.संस्थानात ते 'विकासकार्य सचिव' पदावर रुजू झाले.कामाचा व्याप वाढून त्यांनी क्रीडांगण, रस्ता, बागा, पाणीपुरवठा यात लक्ष घातले. कोल्हापूरचा कायापालट केला. १९४४ मध्ये त्यांनी 'उद्याचे कोल्हापूर' हा ग्रंथ लिहिला. १९४६ मध्ये 'कोल्हापूरच्या विकासाची पंचवार्षिक योजना तयार केली.पंचवार्षिक योजने संदर्भात त्यांनी 'डेव्हलपमेंट प्लॅन फॉर द कोल्हापूर स्टेट' ग्रंथ लिहिला. कोल्हापूर संस्थानचे पुनःरचनेचे काम चालू असतानाच संस्थान भारतात विलीन झाले. नाईक मुंबईच्या दिशेने झेपावले.



इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन - मुंबईत आल्यावर इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन ची स्थापना हा त्यांच्या आयुष्यातील एक टर्निंग पॉईंट होता. संस्थेच्या माध्यमातून एम.एड. चे वर्ग, पीएच.डीचे वर्ग सुरू झाले.१९५२ मध्ये त्यांनी युनेस्कोच्या परिषदेत 'भारतातील सक्तीचे प्राथमिक शिक्षण' यावर शोधनिबंध सादर केला. नाईक यांचे कार्य चौफेर वाढत चाललेले असले तरी ते आपले मूळ गाव विसरले नव्हते; यातूनच 'मौनी विद्यापीठ' या संस्थेचा जन्म झाला. शिक्षणातून पुनर्रचना व पुनर्रचनेतून 'शिक्षण' हे विद्यापिठाचे ध्येय होते. ज्ञान,सेवा आणि त्याग यावर भर देण्याचे ठरले.

भारतात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावयाचे असेल तर त्यासाठी अगोदर प्राथमिक शिक्षणाची माहिती, आकडेवारी गोळा करणे आवश्यक होते. यासाठी भारत सरकारच्या पंचवार्षिक शैक्षणिक सर्वेक्षणाला १९५७ मध्ये सुरुवात झाली. हे सर्वेक्षण नाईक यांच्या अध्यक्षतेखाली सुरु झाले. प्राथमिक शिक्षणाचे सांखिकी नियोजन, प्रशासकीय नियोजन, अर्थसहाय्य योजना, अधिकारी प्रशिक्षण, शिक्षण संचालक व शिक्षण विभाग सचिव यांची चर्चासत्रे, शिक्षणमंत्र्यांशी चर्चा याद्वारे नाईक यांनी अखिल भारतीय कामाला सुरुवात केली.

केंद्रिय पातळीवर प्राथमिक शिक्षण सल्लागार' या पदावर कार्यरत असतानाच युनेस्कोने त्यांना आशिया खंडातील प्राथमिक शिक्षण प्रसाराची योजना तयार करण्यासाठी बोलविले. पाकिस्तान, जपान,आदीस अबाबा, बैरुत येथे त्यांनी भेटी दिल्या. वरिल सर्व पदांवर कार्यरत असताना त्यांनी भारत सरकार कडून फक्त एक रुपया मासिक मानधन घेतले होते. १९६४ मध्ये शिक्षणमंत्री एम.सी.छगला यांच्या सुचनेनुसार भारतीय शिक्षण आयोगाची स्थापना झाली. आयोगाचे अध्यक्ष डॉ. डी. एस. कोठारी आणि सदस्य सचिव म्हणून जे.पी. नाईक यांची नियुक्ती झाली. या आयोगाने 'शिक्षण आणि राष्ट्रीय विकास' हा अहवाल सरकारला सादर केला. हा अहवाल अत्यंत क्रांतिकारी होता. याचे संपूर्ण लेखन नाईक यांनी केले होते. हा अहवाल आणि त्यातील शिफारशी कधीच फारशा अस्तित्वात आल्या नाहीत. हे असे का झाले? याचा सविस्तर आढावा त्यांनी "एज्युकेशन अँड आफ्टर' ग्रंथात घेतला आहे.

अर्थतज्ञ व्ही.के.आर.व्ही. राव शिक्षणमंत्री झाल्यावर त्यांच्या काळात नाईक यांनी 'भारतीय समाजविज्ञान संशोधन परिषद (ICSSR) संस्थेचे प्रारूप तयार केले. नाईक या संस्थेचे सचिव झाले. या संस्थेला त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत मान्यता मिळवून दिली. यातूनच त्यांनी 'इ.स.२००० पर्यंत सर्वांसाठी आरोग्यः पर्यायी नीती' हा अहवाल तयार केला.

१९७७ मध्ये चंडीगढ येथे अखिल भारतीय वैदक शिक्षण विकास संघटनेने आयोजित केलेल्या राष्ट्रीय परिषदेत 'लक्ष्मणस्वामी मुदलियार व्याख्यान' देण्यासाठी नाईक यांना निमंत्रित करण्यात आले. डॉक्टर नसताना सुध्दा त्यांचे व्याख्यान ठेवण्यात आले होते हे विशेष.

याच दरम्यान त्यांनी आरोग्यसेवा विषयावरील 'श्रीवास्तव समिती,'' अमली पदार्थ व्यसन या विषयावरील 'गोपालन समिती'यांचे अहवाल तयार करण्यात मुख्य भूमिका बजावली. ग्रामीण आरोग्य शिक्षण यावरचा अहवाल एवढा एवढा प्रभावी होता की युनेस्कोने तो सर्व राष्ट्रांसाठी प्रसिद्ध केला.

त्यांच्या ग्रंथलेखनाविषयी चित्रा नाईक लिहितात-

"त्यांनी १९५९ मध्ये दुर्गाबाई देशमुख समितीचा स्त्री – शिक्षणावरील अहवाल लिहिला आणि त्याच वर्षी मुंबई राज्यातील शिक्षणखात्याचा १८५८ते १९५८ ह्या काळाचा शतसांवरसिक इतिहास तयार केला. एन.सी.ई.आर.टी. या संस्थेच्या स्थापनेसाठी केलेली टिपणे, त्यानंतरचे अहवाल, पूर्वप्राथमिक शिक्षण समितीचा १९७४ चा अहवाल हे त्यांनी सहजपणे तयार केले. आजच्या अंगणवाड्या त्यांनी १९७४ मध्ये केलेल्या शिफारशींचा परिपाक आहेत. नाईकांचा भारतीय समाजविज्ञान संशोधन परिषदेच्या आरंभीचा धोरणात्मक अहवाल, १९४७ते ६१ पर्यंतचा भारतीय शिक्षणाचा राज्यवारीने लिहिलेला प्रचंड ग्रंथ, १९७७ ते १९७९ च्या दरम्यान लिहिलेले साक्षरता व अनौपचारिक शिक्षणाविषयीचे अहवाल ह्यांतून शिक्षणाच्या विविध विकासयोजना त्यांनी देशासमोर मांडल्या. १८३७ ते ७७ या काळात त्यांच्या पुस्तक व पुस्तिकांची संख्या ४० च्या वर गेली.

लेखनाच्या धबडग्यात त्यांची संस्था उभारणीकडे सुध्दा लक्ष दिले. प्राथमिक शिक्षणाच्या योजना तयार करण्याच्या कौशल्याचा विकास व्हावा म्हणून 'एशियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन प्लॅनिंग' संस्था सुरु केली. पुढे या संस्थेचे रुपांतर 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन प्लॅनिंग' अँड अँडमिनिस्ट्रेशन मध्ये झाले. जवाहरलाल नेहरू विद्यापीठ स्थापन करतानाच तेथे नाईक यांनी 'झाकीर हुसेन सेंटर फॉर एज्युकेशन स्टडीज' स्थापले. एनसीआरटी, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण मंडळ' त्यांनी स्थापले.

याच दरम्यान नाईक पॅरिसच्या इंटरनॅशनल इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन प्लॉनिंगच्या व्यवस्थापन मंडळाचे सदस्य,स्वीडनच्या दाग हैमरशोल्ड फौंडेशनचे सल्लागार, कॅनडाच्या इंटरनॅशनल डेव्हलपमेंट रिसर्च सेंटरचे संशोधक लेखक झाले. १९८० मध्ये युनेस्कोने बँकॉक येथे शैक्षणिक नियोजनाच्या चर्चासत्राचे मार्गदर्शन करण्यासाठी निमंत्रित केले असता त्यांचे भाषण शिक्षण क्षेत्रातील इतिहासात अप्रतिम ठरले.भारतात परतल्यावर डिसेंबर महिन्यात कॅन्सरचे निदान झाले. ज्या पुण्यात त्यांनी भारतीय शिक्षण संस्थेची स्थापना केली त्याच पुण्यात त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

## डॉ. जे. पी. नाईक यांची ग्रंथसंपदा

१)Grant to District Local Boards (१९४१)
२) History of the Local Fund Cess (१९४१)
३) Studies in Primary Education (१९४२)
४) History of Education in India (१९४३) with Narullah (Enlarged and revised in १९५१)
५) उद्याचे कोल्हापूर ( १९४४ )
६) कोल्हापूर नगरपालिकेचा इतिहास (१९४४)
७) Training of Educational Administration (१९५२)
८) Compulsory Education in India (१९५२) with Saiyidain
९) Research and Experiment in Rural Education (१९५५)
१०) Review of Education in Bombay State (१९५८)
११) Agra University Extension Series
१२) Single Teacher School (१९६३)
१३) Role of Government of India in Education (१९६४)
१४) Enrolement Policy in Indian Education (१९६५)
१५) Educational Planning in India (१९६५)
१६) Grant-in-aid to Educational Institutions (१९६५)
१७) Elementary Education in India: The Unfinished Business (१९६६)
१८)The Role of Teacher in Educational Planning (१९६८)
१९) Education in the Fourth Plan (१९६८)
२०) Educational Planning in a District (१९६९)
२१) Institutional Planning (१९६९)
२२) Education of the Scheduled Cast (१९७१)
२३) Role, Responsibilities, Functions and Organisation of the ICSSR (१९७१)
२४) Access, Structure and Quality in Higher Education(१९७२)
२५) Some Aspects of Post-Independent Development in India (१९७४)
२६) Elementary Education in India - a Promise to Keep (१९७५)
२७) Equality, Quality and Quantity: The Elusive Triangle in Indian Education (१९७५)
२८) Policy and Performance in Indian Education (१९७५)
२९) Development of Educational Service (१९७६) with Ghosh (१९७७)
३०) Alternative System of Health Care Services in India
३१) Some Perspective on Non-Formal Education (१९७७)
३२) Reflections on the Future Development of Education (१९७७)
३३) Educational Reforms in India (१९७८)
३४) National Policy in Education (१९८०)
३५) The Education Commission and After (१९८०)

# Nanded City, Pune

The Maximum City

Sinhagad Road, Pune

A 700 Acre Mega Township on Sinhagad Road, Pune.

# प्रत्येक घराला एक मन असतं.
# प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.

आमच्या प्रत्येक घराचं मन आहे उत्साही, चैतन्यशील, आशावादी, जगण्याच्या ऊर्जेने पुरेपूर भरलेलं, आणि आमच्या शहराचं व्यक्तिमत्व आहे अभिरूचिसंपन्न, सुसंस्कृत, सर्वसमावेशक, निसर्गप्रेमी आणि भविष्यसन्मुख. कारण आम्ही आहोत नांदेड सिटी, ७०० एकर्सचं अतुलनीय जग, जिथे आहे संपूर्ण कुटुंबाच्या आणि कुटुंबातल्या प्रत्येकाच्या सुखाचा, सुरक्षिततेचा, आरोग्याचा आणि आनंदाचा सखोल विचार.

## आनंदी संकुल



**कुटुंबासाठी प्रफुल्लित, प्रदूषणमुक्त पर्यावरण**

- इको पार्क व ऑक्सिझोन
- १३,२०० पेक्षा जास्त झाडांची लागवड
- १२० एकर्सची हिरवाई

## CBSE व ICSE शाळा



**विद्यार्थ्यांसाठी प्रगतीशील वातावरण**

- CBSE व ICSE बोर्डाच्या शाळा
- दर्जेदार शिक्षण
- वॉक-टू-स्कूल मॉडेल

## जिमखाना



**तरूणाईसाठी अगदी आदर्श सिटी**

- सायकलिंग व जॉगिंग ट्रॅक्स
- २४,००० स्क्वे. फूट जिम्नॅशियम
- क्रीडांगण-द स्पोर्टस् कॉम्प्लेस (प्रस्तावित)
- विविध खेळांच्या स्पर्धा व कोचिंग

**नांदेड सिटी, उत्साही मन आणि उमदं व्यक्तिमत्व यांचा देखणा मिलाफ!**

tempestadvertising.com

A project by MAGARPATTA CITY ©
The pride of Pune

Call: 020-67275300 / 1 / 2

CREDAI PUNE METRO

www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com
An ISO 9001:2008, ISO 14001:2004, OHSAS 18001:2007 certified company.



# । एका सायकलची गोष्ट ।

## शेवटचे पान



देशामध्ये Right to Education Act कायदा अस्तित्वात आल्यापासून शिक्षण क्षेत्रामध्ये फार मोठे परिवर्तन होण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. महाराष्ट्राचा विचार केला तर मोठी शहरे वगळता अजूनही ग्रामीण भागामध्ये शालेय शिक्षण घेणारे असंख्य विद्यार्थी, विद्यार्थिनी आहेत. ही सगळी मुले छोट्या खेड्यांमध्ये वाड्या - वस्त्यांमध्ये सुद्धा राहत आहेत. त्यांच्यासाठी शाळा बऱ्याच वेळा घरापासून लांब अंतरावर असते. काही ठिकाणी तर मुलांना २-३ किलोमीटर चालत शाळेत यावे लागते त्यामुळे ते शाळेला महत्व देत नाहीत. रोजची पायपीट करावी लागल्यामुळे शाळेबद्दल किंवा शिक्षणबद्दल ओढ वाटावी अशी परिस्थिती त्यांची नसते. त्यांच्या पालकांचे उत्पन्न अल्प असल्यामुळे त्यांना मुलांसाठीचे गणवेष , पुस्तके, दप्तर याची पूर्तता करतानाच खूप अडचणींना सामोरे जावे लागते. ही मुले शाळेत नियमित जावीत यासाठी त्यांना जर सायकली पुरविण्यात आल्या तर नक्कीच ही पिढी उत्साहाने शाळेत जाऊन शिकायला लागेल. मला नुकतीच अशा एक व्यक्तीची ओळख झाली की जो मुळात पालघर जिल्ह्यातील एक छोट्याश्या गावातल्या वस्तीवर राहून शाळा शिकला. ज्याच्या घरची परिस्थिती सायकल घेण्यासारखी नव्हती. तरीही त्याने जिद्दीने शिक्षण पूर्ण करून मुंबईमध्ये व्यवसाय सुरू केला. गावाकडे वडिलांची छोटीशी शेती होती मग केव्हातरी तो गावी शेती बघायला सुद्धा जायचा. त्यासाठी आता त्याची स्वतःची चार चाकी गाडी होती. असाच एक दिवशी तो गावी गेला असताना त्याने पाहिले की आज देखील त्याच्या गावातील मुले शिक्षणासाठी पायी जात होती. मग त्याने ठरविले की आपण ह्या मुलांना सायकली घेऊन द्यायच्या. सायकलींची किंमत आणि लागणारी संख्या हे गणित मांडल्यावर तेवढे पैसे तर त्याच्याजवळ नव्हते. मग त्याला कल्पना सुचली सध्याच्या इंटरनेटच्या माध्यमातून आपण मुंबईतल्या आपल्या सोसायटीमध्ये जर आवाहन केले तर. त्याप्रमाणे 'तुमच्या घरातील जुन्या न वापरण्यात असलेल्या सायकली असतील तर अगदी मोडकळीस आलेल्या असतील तरी चालतील, तुम्ही मला द्याव्यात. त्या दुरुस्त करून शिक्षणासाठी गरीब विद्यार्थ्यांना देण्यात येतील '. त्याला अपेक्षेहूनही अधिक असा प्रतिसाद रहिवाश्यांनी दिला आणि बघता बघता ४० सायकली जमा झाल्या. मग त्याने एक सायकल रीपेअर दुकानदार शोधला आणि त्याला सायकल दुरुस्तीची विनंती केली 'पण तुझे नेहमीचे पैसे न लावता विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी म्हणून सवलतीच्या दरात करून दे'. सायकल दुकानदाराने देखील ही जबाबदारी आनंदाने स्वीकारली. माझ्या या मित्राने विचार केला की नेहमीच्या काळ्या रंगाच्या सायकली असण्याऐवजी स्प्रे पेंटिंग ने रंगीत सायकली जर मुलांना दिल्या तर त्या मुलांना अधिक आवडतील. त्याप्रमाणे तो ह्या सायकली घेऊन गावी गेला व वाटप केले. महिन्याभराने ही योजना कशी राबविली जाते हे बघण्यासाठी तो गावी गेला असता तेथे सुमारे ३०० विद्यार्थी त्याची वाट बघत होते कारण त्यांनादेखील सायकली हव्या होत्या. पुन्हा मुंबईत जाऊन पहिल्याप्रमाणे त्याने सायकली जमा करून त्या गावात वितरित केल्या. मुंबईत पालघर जिल्ह्यात राबविलेल्या या उपक्रमाची माहिती त्याने पुण्यात असलेल्या त्याच्या एका मित्राला कळविली. मग पुण्यातही 'एक सायकल शिक्षणासाठी' हा उपक्रम सुरू झाला. त्यानंतर गुगलवरून दिल्ली येथील एक तरुणाने पुणे येथील या योजनेची माहिती मिळविली आणि त्याने देखील दिल्लीच्या शेजारील गावामध्ये ही योजना राबवली.

एका छोट्याश्या कल्पनेतून सुरू झालेली ही सामाजिक चळवळ कुठल्याही भांडवलाशिवाय, कुठल्याही प्रशासकीय चौकटीत न राहता खूप मोठे कार्य सुरू झाले. मला तर वाटते आपल्या पक्षाच्या विद्यार्थी आणि युवक विभागांनी या योजनेचे पालकत्व घेऊन संपूर्ण राज्यभर सायकल प्रत्येक घरी, शिक्षणाची मोठी भरारी हा उपक्रम राबवावा.